# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

### मा. महासभा दि. १४/०२/२०१९ (दि. १९/०१/२०१९ व १३/०२/२०१९ रोजीची तहकुब सभा)

मा. महासभा शुक्रवार दि. १९/१०/२०१८ रोजी ठिक सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबीत विषय क्र. ११२ ते १३५ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा बुधवार, दिनांक १३/०२/२०१९ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबीत विषय क्र. १२७ ते १३५ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा गुरुवार, दिनांक १४/०२/२०१९ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता महापालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | **डिम्पल विनोद मेहता** | **महापौर** |
| २) | **चंद्रकांत सिताराम वैती** | **उपमहापौर** |
| ३) | **व्यास रवि वासुदेव** | **सभापती, स्थायी समिती** |
| ४) | **पाटील रोहिदास शंकर** | **सभागृह नेता** |
| ५) | **भोईर राजू यशवंत** | **विरोधी पक्षनेता** |
| ६) | **शाह रिटा सुभाष** | **सदस्या** |
| ७) | **तिवारी अशोक सूर्यदेव** | **सदस्य** |
| ८) | **पांडेय पंकज सूर्यमणि** | **सदस्य** |
| ९) | **गोहिल शानू जोरावर सिंह** | **सदस्या** |
| १०) | **कांगणे मीना यशवंत** | **सदस्या** |
| ११) | **सिंह मदन उदितनारायण** | **सदस्य** |
| १२) | **कदम अर्चना अरुण** | **सदस्या** |
| १३) | **भोईर गणेश गजानन** | **सदस्य** |
| १४) | **पाटील धनेश परशुराम** | **सदस्य** |
| १५) | **पाटील वंदना मंगेश** | **सदस्या** |
| १६) | **सिंग श्रीप्रकाश जिलेदार** | **सदस्य** |
| १७) | **धृवकिशोर मन्साराम पाटील** | **सदस्य** |
| १८) | **जैन गीता भरत** | **सदस्या** |
| १९) | **भूप्ताणी रक्षा सतीश (शाह)** | **सदस्या** |
| २०) | **मोकाशी दिपाली आनंदराव** | **सदस्या** |
| २१) | **रकवी वैशाली गजेंद्र** | **सदस्य** |
| २२) | **अग्रवाल सुशील गोपीकिशन** | **सदस्य** |
| २३) | **खंडेलवाल सुरेश जगदीश** | **सदस्य** |
| २४) | **परदेशी गिता हरीश** | **सदस्या** |
| २५) | **पाटील जयंतीलाल गुरूनाथ** | **सदस्य** |
| २६) | **आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र** | **सदस्य** |
| २७) | **शिर्के अनंत गेणू** | **सदस्य** |
| २८) | **पाटील संध्या प्रफुल्ल** | **सदस्या** |
| २९) | **पाटील प्रविण मोरेश्वर** | **सदस्य** |
| ३०) | **डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश** | **सदस्या** |

| | | |
|---|---|---|
| ३१) | गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ३२) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ३३) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ३४) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ३५) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ३६) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ३७) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ३८) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ३९) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ४०) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| ४१) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ४२) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ४३) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ४४) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ४५) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ४६) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ४७) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ४८) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ४९) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ५०) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ५१) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ५२) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| ५३) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| ५४) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ५५) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ५६) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ५७) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ५८) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ५९) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ६०) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ६१) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ६२) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |
| ६३) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ६४) | भानुशाली वर्षा गिरधर | सदस्या |
| ६५) | बांड्या एलायस दुमिंग | सदस्य |

<u>गैरहजर सदस्य -</u>

| | | |
|---|---|---|
| १) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| २) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| ३) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| ४) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| ५) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |

६) रावल मेघना दिपक सदस्या
७) शाह राकेश रतिशचंद्र सदस्य
८) जैन सुनिता रमेश सदस्या
९) जैन राजेंद्र भवरलाल सदस्य
१०) रॉड्रीकस मोरस जोसेफ सदस्य
११) परेरा कॅटलीन एन्थोनी सदस्या
१२) सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन सदस्या
१३) पाटील नरेश तुकाराम सदस्य
१४) शेख अमजद गफार सदस्य
१५) घरत तारा विनायक सदस्या
१६) पांडे स्नेहा शैलेश सदस्या
१७) पाटील वंदना विकास सदस्या
१८) शेट्टी अरविंद आनंद सदस्य
१९) हसनाळे ज्योत्सना जालींदर सदस्या
२०) यादव मिरादेवी रामलाल सदस्या
२१) भोईर कमलेश यशवंत सदस्य
२२) पाटील अनिता जयवंत सदस्या
२३) भोईर भावना राजू सदस्या
२४) दळवी प्रशांत ज्ञानदेव सदस्य
२५) शेख रुबीना फिरोझ सदस्या
२६) अहमद साराह अकरम सदस्या
२७) म्हात्रे विनोद काशिनाथ सदस्य
२८) गोविंद हेलन जॉर्जी सदस्या
२९) बगाजी शर्मिला विन्सन्ट सदस्या

**रजेचा अर्ज - निरंक**

**१) नलावडे दिनेश दगडु सदस्य**

**रोहिदास पाटील :-**

सभागृहाचे कामकाज चालू करावे. आणि पिठासीन अधिकारी म्हणून उपमहापौरांनी बसावे अशी विनंती करतो.

**मा. उपमहापौर :-**

सचिव कामकाजाला सुरुवात करा.

**नगरसचिव :-**

मा. पिठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने दि. १९/०१/२०१९ रोजीची तहकुब महासभा दि. १३/०२/२०१९ रोजीची वेळे अभावी तहकुब झालेली महासभा आज तहकुब महासभेच्या कामकाजाला सुरुवात करत आहे. प्रकरण क्र. १२७, **मिरा भाईंदर महानगरपालिकेकरीता वाहने वाहनचालकासह इंधनासह (संपूर्ण सेवा) भाड्याने घेणे कामी नविन निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

**मदन उदितनारायण सिंह :-**

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता ठेका पध्दतीने वाहने वाहनचालकासह इंधनासह (संपूर्ण सेवा) भाडयाने घेणे कामी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेस व नविन निविदा मागविणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**शानु गोहिल :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

मा. पिठासीन अधिकारी साहेब हा जो गोषवारा आलेला आहे. त्या गोषवाऱ्यात त्यांनी शेवटचे वाचतो सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता ठेका पध्दतीने वाहने वाहनचालकासह इंधनासह संपूर्ण सेवा भाड्याने देणेकामी निविदा मागविणेस त्यांनी मागितलेली आहे आणि आपला ठराव झालेला आता २०१९-२० साठी मग हा गोषवारा चुकीचा आहे की, ठराव चुकीचा आहे?

**धृवकिशोर पाटील :-**

आयुक्त साहेब १९ जानेवारी २०१८ चा गोषवारा आहे आणि २०१८-१९ चे आर्थिक वर्ष जवळ जवळ संपत आलेले आहे आणि म्हणून २०१९-२० ह्या आर्थिक वर्षाकरिता ठेका पध्दतीने वाहन चालक ठराव मांडलेला आहे.

**मा. उपमहापौर :-**

सावंत साहेब साधारणपणे आपल्याकडे प्रथा अशी आहे की जी वाहने वापरत असतो आणि याच्यासाठी.

**अनिल सावंत :-**

साहेब प्रशासन ज्यावेळी गोषवारा देतो आयुक्तांसारखे जबाबदार अधिकारी त्याच्यावर सही करतात आणि हा गोषवारा चुकीचा दिला जातो. सदस्यांना २०१८-१९ साठी आर्थिक प्रशासकीय मंजुरी मागत आहेत.

**मा. उपमहापौर :-**

ती चुक दुरुस्ती करुन घ्यावी. ठराव सर्वानुमते मंजूर. सचिव पुढील विषय घ्या.

**प्रकरण क्र. १२७ :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेकरीता वाहने वाहनचालकासह इंधनासह (संपूर्ण सेवा) भाड्याने घेणे कामी नविन निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. १२३ :-**

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता ठेका पध्दतीने वाहने वाहनचालकासह इंधनासह (संपूर्ण सेवा) भाडयाने घेणे कामी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेस व नविन निविदा मागविणेस ही मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. मदन उदितनारायण सिंह अनुमोदन :- श्रीम. शानु गोहिल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२८, **मनपा वाहनांची दुरुस्ती/देखभाल करणेकरीता वार्षिक निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

**हसमुख गेहलोत :-**

शासन निर्णयानुसार विहित केलेल्या खर्चाच्या मर्यादेत राहुन वाहनाची देखभाल दुरुस्ती कामे पार पाडण्याकरिता सन २०१८-१९ या अर्थसंकल्पीय तरतूदी नुसार मनपा वाहनांसाठी स्पेअरपार्टस पुरवठा करुन दुरुस्ती करणे कामी ३ वर्षाकरीता आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देवून निविदा मागविणेस हि सभा मंजुरी देत आहे.

**सिमा शहा :-**

माझे अनुमोदन आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब ठराव काय झाला काही कळले नाही. गोषवाऱ्याप्रमाणे तुम्ही मान्यता दिली आहे की साहेब ह्या विभागाचे अधिकारी कोण आहेत.

**मा. उपमहापौर :-**

म्हसाळ साहेब आलेले नाहीत.

**अनिल सावंत :-**

आलेले आहेत. साहेब याच्यामध्ये गोषवाऱ्याप्रमाणे जनरली कसे असते की, आपण एका वर्षाकरिता देतो. जो ठेका असतो रिकरिंगचे वगैरे मग याच्यामध्ये ३ वर्षाकरिता तुम्ही काय मागत आहात आणि राज्य शासनाच्या निर्देशापेक्षा जास्त खर्च होणार आहे. ते ही खर्च करणेची महापालिकेला परवानगी आहे का?

**नरेंद्र पाटील :-**

आपत्कालीन सेवेमध्ये ॲम्ब्युलन्स वगैरे असतात. त्याच्यासाठी जर झाले तर आपल्याला करावे लागतात.

**अनिल सावंत :-**

आपत्कालीन सेवेसाठी तुम्ही करा आपल्या किती ॲम्ब्युलन्स आहेत?

**नरेंद्र पाटील :-**

२२ आहेत.

**अनिल सावंत :-**

मग त्याच्यासाठी काय करावे लागते?

**नरेंद्र पाटील :-**

कधीकधी त्याची दुरुस्ती येते.

**अनिल सावंत :-**

दुरुस्ती द्या मंजुरी तर दिलेलीच आहे. मग तुम्ही ३ वर्षासाठी का मागत आहात? याच्यामध्ये काय विशेष आहे.

**नरेंद्र पाटील :-**

३ वर्षासाठी मागितलेली आहे. एक वर्षासाठी आपण दरवेळी मागतो तर ३ वर्षासाठी आता आपण केले म्हणजे यापुढे त्याच्यात काम अडवू नये म्हणून त्याच्यासाठी आपण ते............

**अनिल सावंत :-**

कसे काय काम अडणार एक वर्षासाठी जनरली निविदा मागवली जाते त्यासाठी उद्या ३० वर्षासाठी तुम्ही मागाल.

**नरेंद्र पाटील :-**

एका वर्षासाठी मंजुरी दिली तरी काही प्रॉब्लेम येणार नाही.

**अनिल सावंत :-**

तुम्ही गोषवारा तसा द्यायचा. आमच्याकडून का चुकीचे करुन घेता त्यांनी तुमच्या गोषवाऱ्याप्रमाणे दिला त्यांनी ठराव मांडला आणि राज्य शासनाचे दरापेक्षा जास्त खर्च करणेची आपल्याला परवानगी आहे का?

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

आपण एक वर्षासाठी साधारण निविदा प्रक्रिया करतो. परंतु आपल्याकडे काय होत आहे की, निविदा मागवली निविदेला प्रतिसाद मिळत नाही. २-२, ३-३ वेळेस निविदा मागविली जाते आणि त्याच्यानंतर सर्व मंजुरी वगैरे प्रोसेस होऊन वर्क ऑर्डर देतो त्याच्यानंतर लगेच पुढचे वर्षाचे होते. साधारण त्याच्यामध्ये पुन्हा गॅप राहतो. शववाहीनी किंवा ॲम्ब्युलन्स वगैरे यासाठी किंवा इतर आपले जे वाहन आहेत फायर वगैरे ह्या संपूर्ण याच्यासाठी अतीमहत्वाची आणि आपत्कालीन यासंदर्भातली वाहने यासाठी..................

**अनिल सावंत :-**

निविदेला प्रतिसाद मिळत नाही हे कारण होऊ शकत नाही. तुम्ही आता एका वर्षासाठी निविदा मंजूर करुन घ्या. पुढची निविदा ४ महिने अगोदर ती नविन प्रक्रिया तुम्ही चालू करा.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

ठिक आहे आपण एक वर्षाची देऊ. आमचा प्रस्ताव तसा होता.

**जुबेर इनामदार :-**

साहेब याच्यामागे तुम्ही वाहन चालकासाठी मुदतवाढ घेता प्रत्येक विषयामध्ये निविदा प्रक्रिया पूर्ण झाली नाहीतर मुदतवाढ आहे. तुम्ही ६ महिने आधीच सुरु करा ना. ६ महिने आधी सुरु करायला तुम्हाला कोणी अडविलेले आहे?

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

ठिक आहे तुम्ही मंजुरी एका वर्षाची दिली. आम्हाला प्रॉब्लेम नाही.

**अनिल सावंत :-**

कारण कसे आहे आज तीन वर्षाची मागत आहात. उद्या ३० वर्षाची मागाल. याच्यात माझा दुसरा प्रश्न राहीला राज्य शासनाचे जे दर आहेत पेट्रोल आणि डिझेल वाहनासाठी त्यापेक्षा जास्त खर्च करणेची पालिकेला मंजुरी आहे का? पालिका खर्च करु शकते का? इथे राज्य शासनाने दर दिलेले आहेत ६६ हजार आणि ५० हजार आणि गोषवाऱ्यामध्ये म्हणत आहेत की शासन मर्यादेपेक्षा जास्त होणेची शक्यता आहे. दुरुस्ती खर्च.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

अत्यावश्यक सेवा आपण बंद ठेवत नाही. त्याच्यासाठी आपल्याला म्हणून जास्तीचा खर्च झाला तरी आपणास तो करावा लागतो.

**अनिल सावंत :-**

ह्या तुमच्या ज्या गाड्या आहेत त्या सर्वांचे इन्शुरन्स आहेत.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

इन्शुरन्स आहेत.

**अनिल सावंत :-**

सध्या असे आहे आमच्या पण गाड्या आहेत. दुरुस्ती खर्चासाठी आपल्याला खर्च करायची गरज नाही. इन्शुरन्स कंपनी आहे.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

अपघात झाला तरच इन्शुरन्स होते. इतर वेळेला नॉर्मल रुटींग मेन्टनन्सला काही इन्शुरन्स नाही.

**अनिल सावंत :-**

मेन्टनन्स ठिक आहे. हा जो तुम्ही खर्च दाखविलेला आहे ९५ लाख रुपये त्याच्यात म्हणत आहात की त्याच्यापेक्षा जास्त होणार आहे.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

आपल्या गाड्यांची संख्या पण तेवढीच आहे ना.

**अनिल सावंत :-**

गाड्यांची संख्या ६६ आहे. एक लाखापेक्षा जास्त खर्च झाला. एका गाडीवर फक्त मेन्टनन्स.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

गाड्यांची आपली दुरुस्तीची जी मर्यादा आहे त्या प्रत्येक गाड्यांचे आपण रजिस्टर ठेवलेले आहे. एस.टी. शिट ठेवलेले आहे त्या एस.टी. शिटमध्ये नमुद जो खर्च आहे तर त्याच्या मर्यादेपर्यंत आला तर आपल्याकडे ती फाईल वरती मुलेपपर्यंत जेव्हा फाईल जाते तेव्हा हे सर्व तपासूनच आपण हे करतो. त्याचेवरती आपण जाऊ देत नाही.

**अनिल सावंत :-**

ते तर तुम्हाला करावेच लागणार आहे. पण याच्यामध्ये तुम्ही जे गोषवाऱ्यामध्ये काय म्हटलेले आहे. शासन मर्यादेपेक्षा जास्त खर्च होणेची शक्यता आहे. मग ती खर्च करायची आपल्याला परवानगी आहे का?

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

इंधन खर्च जो आहे तो वाढला तर आपण वॉक करतो ना.

**अनिल सावंत :-**

परत तुम्ही तेच उत्तर देत आहेत. खर्च वाढला तर करा पण ती आपल्याला परवानगी आहे का? राज्य शासनाचे जे रुल आहेत ६० हजार आणि ५० हजार त्या वरती जर वाढला तर महापालिका करु शकते का फक्त तेच मी विचारत आहे.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

आपल्याला शासनाचे जे बदल आहेत शासनाकडे सुध्दा ह्याप्रकारे होतेच ना. त्याच्यामध्ये जर शासनामध्ये झाले ह्या मर्यादेपर्यंत होते असे नाही. त्या मर्यादेच्या बाहेर असेल तरी शासन अत्यावश्यक बाब हे बघुन त्याचेकडे खर्च होत असतो.

**अनिल सावंत :-**

पालिका करु शकते.

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

करु शकणार.

**जुबेर इनामदार :-**

शासनाने दिलेल्या डायरेक्शनला.............

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

ह्या ६६ वाहनातले सगळी वाहने त्याच्यामध्ये जात नाही. एखाद्या वाहनाला काही झाले तरच जाते. आपल्याकडे तशी दृष्टी नाही फक्त आपण एक माहिती दिली.

**जुबेर इनामदार :-**

साहेब तुमच्याकडे ६६ वाहने आहेत. संपूर्ण सेवेमध्ये आहेत का? ६६ वाहनांची सेवा चालू आहे का?

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

चालू आहे.

**जुबेर इनामदार :-**

सेवा घेतली जाते का?

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

हो.

**जुबेर इनामदार :-**

बरेच पदाधिकारी अधिकारी प्रतिपुर्ती भत्ता घेत आहेत. बरोबर आहे का?

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

हो.

**जुबेर इनामदार :-**

त्यांना हे.............

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

ते वगळून आहे.

**जुबेर इनामदार :-**

ते ६६ वगळून आहे का?

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

ते वगळून आहेत.

**अनिल सावंत :-**

असिस्टंट कमिशनर साहेब माझी आपल्याला विनंती आहे की, ह्या पूर्ण गेल्या वर्षाची एका वर्षाची पूर्ण चौकशी ह्या डिपार्टमेंटची आणि ह्या वाहन मेन्टनन्सवर किती खर्च झालेला आहे, किती वाहने आहेत, किती वाहने चालू कंडीशनमध्ये आहेत त्याची पूर्ण चौकशी करुन याच्यात जर कोणी आहेत त्याची पूर्ण चौकशी करुन याच्यात जर कोणी दोषी आढळले तर त्यांच्यावर कारवाई करावी.

**मा. उपमहापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर. पुढील ठराव घ्या.

**जुबेर इनामदार :-**

ठरावामध्ये काय केलेले आहे? एका वर्षाचे घेतलेले आहे का ३ वर्षाचे याच्यामध्ये तुम्ही.................

**विजयकुमार म्हसाळ (मा. उपायुक्त मु.) :-**

तीन वर्षाची मागणी केलेली आहे. तुम्ही द्याल ते आम्ही घेऊ.

**मा. उपमहापौर :-**

तुमचा ठराव असेल तर द्या. ३ वर्षाचे आहे तुम्ही ठराव द्या.

**जुबेर इनामदार :-**

मी ठराव करतो.

**मा. उपमहापौर :-**

सावंत साहेब त्याच्यामध्ये फार काही शोधण्याचे कारण नाही. आपण काही नियमांचे उल्लंघन त्याच्यात होणार नाही. त्याची काळजी घ्यायला तुम्ही आम्ही सक्षम आहोत.

**अनिल सावंत :-**

साहेब चुकीची प्रथा पडेल. प्रत्येक गोष्टीमध्ये ३-३, ५-५ वर्षाची मंजुरी घेऊन टाकतील.

**मा. उपमहापौर :-**

ठिक आहे तुमचा ठराव द्या.

**धृवकिशोर पाटील :-**

माझी विनंती आहे गटनेते जुबेर इनामदार आणि अनिल सावंत यांना सदरचा जो विषय आहे त्या विषयामध्ये आरोग्य विभागाची वाहने आहेत. उद्यान वृक्षप्राधिकरणाची वाहने आहेत. वाहने आहेत. अग्निशमनची वाहने आहेत. एक वर्षापासून टेंडर काढले पुन्हा आचारसंहिता कधी येईल पुन्हा त्याची वेळ निघुन जाईल. त्याच्यामुळे ती वाहने दुरुस्ती करिता थोडे डिफिकल्ट पडते म्हणून त्यांनी ३ वर्षाचा प्रस्ताव ठेवलेला आहे आणि अत्यावश्यक बाब म्हणून आपण ह्यावेळी देऊन टाकू.

**जुबेर इनामदार :-**

आपण मुदतवाढ देतो कोणतेही विभागातून आलेल्या अधिकाऱ्यांनी आम्हाला ३-३ वर्षाच्या.

**मा. उपमहापौर :-**

आतापर्यंत असे मुदतवाढीने चाललेले असताना नव्याने प्रस्ताव घेतला आणि तुम्ही मान्यता द्यायला पाहिजे अशी माझी विनंती राहील.

**जुबेर इनामदार :-**

वैती साहेब अडचण सांगत आहे कुठे आहे. आपल्याकडे प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिकारी अशाप्रकारे आपल्याकडून ठराव करुन निघून जातो. नविन आलेला बोलतो मला काही माहीत नाही. त्याने काय करुन गेला.

**मा. उपमहापौर :-**

असे नसते.

**जुबेर इनामदार :-**

असेच आहे. असेच झालेले आहे. हे आयुक्त पासून झालेले आहे. अधिकारी तर नंतरचा विषय येतो.

**मा. उपमहापौर :-**

आतापर्यंत आपण ह्याच प्रोसेसने गेलेलो आहोत आणि तुम्ही सगळे जण वाहनाचे तुमची सर्वांची वाहने आहेत. आपल्याला तो खर्च असतो आणि महापालिका ही सार्वजनिक हितासाठी महापालिकेच्या वेगवेगळे वर्कसाठी सर्वच वाहने वापरत असतो आणि त्यावेळेला असे करणे काही चुकीचे असे मला वाटत नाही. तुमचा ठराव असेल तर तुम्ही मांडा. माझी तुम्हाला विनंती आहे की तुम्ही याला मान्यता द्यावी.

**जुबेर इनामदार :-**

आमची मान्यता आहे एका वर्षासाठी.

**मा. उपमहापौर :-**

मग तुम्ही ठराव ठेवा.

**जुबेर इनामदार :-**

चालेल.

**अनिल सावंत :-**

आयुक्त साहेब विषय तोच आहे.

**मा. आयुक्त :-**

मागच्याच सभेला काल बोललात मुदत संपली की परत मुदवाढीला येते. त्या एक नगरसेविकाही बोलल्या. तर आपल्याला दरवर्षी करायचेच आहे तर ते लॉंग टर्म क्वालीटीमध्ये केले तर अजून कॉलीटी भेटेल आणि चांगले दर्जेदार ठेकेदार भेटतील आणि परसिस्टन खर्च आहे ते करावेच लागणार.

**अनिल सावंत :-**

ते करायलाच पाहिजे. ते सुध्दा बरोबरच आहे. ६६ वाहने आहेत त्यातली किती चालू कंडीशनमध्ये आहेत.

**मा. आयुक्त :-**

विषय तो वेगळा आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब त्याच्यामध्ये ९५ लाख रुपयेपेक्षा जास्त खर्च होणार आहे. म्हणजे एका वाहनाला साधारण टक्के १.२५ लाख रुपये आपण फक्त मेन्टनन्सचा खर्च करत आहोत आणि त्याठिकाणी मेन्टनन्ससाठी किंवा रिपेअरींगसाठी किंवा अपघात झाला तर इन्शुरन्स पॉलिसी असते. आपली काही थर्ड पार्टी इन्शुरन्स नाही. कन्सल्टन्ट जे इन्शुरन्स आहेत आणि आजकालचे इन्शुरन्स कंपन्या ज्या क्लेम देतात ते जरुरी नाही ते फक्त अपघात झाला तरच देतात.

**मा. आयुक्त :-**

आपला मुद्दा थर्ड पार्टी इन्शुरन्स नसेल तर ते आपण काढायला सांगु कारण थर्ड पार्टी इन्शुरन्स आता अपेक्षितच आहे. डे बाय डे एवढी ट्राफीक वाढलेली आहे. कुणा लोकांचे नुकसान होऊ नये आपण ती नोंद घ्या. त्यांच्या सुचनेनुसार आणि चांगल्या कंपनीची ऑफर मागवून सगळ्या व्हेईकलचे थर्ड पार्टी इन्शुरन्स आणि व्हेईकल इन्शुरन्स घ्या ह्या दोन्ही बाबी केल्या पाहिजेत.

**अनिल सावंत :-**

थर्डपार्टी नाही काढायचे साहेब कॉम्प्रेन्सीव्ह काढायचे कॉम्प्रेन्सीव्हमध्ये तुमचे रिपेअरींग.......

**मा. आयुक्त :-**

कॉम्प्रेन्सीव्ह म्हणजे थर्ड पार्टी आलाच.

**अनिल सावंत :-**

थर्ड पार्टीवर केला तर त्याच्यावर येत नाही. मेजर कॉम्प्रेन्सीव्ह काढा आणि गेल्या वर्षभरात जो खर्च झाला त्याची जरा चौकशी करा.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे.

**अनिल सावंत :-**

सदर विषय एक वर्षासाठी निविदा प्रक्रिया करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच राज्य शासनाने दिलेल्या / ठरवलेल्या मर्यादेत राहूनच खर्च करावा असा मी ठराव मांडत आहे.

**प्रविण पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. उपमहापौर :-**

सचिव दोन ठराव आलेले आहेत. दोन्ही ठराव मतदानाला घ्या.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२८ करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्री. हसमुख गेहलोत, अनुमोदन श्रीम. सिमा शहा. दुसरा ठराव सुचक श्री. अनिल सावंत, अनुमोदन श्री. प्रविण पाटील. प्रथम दुसरा ठराव मतदानास पुकारतो. सुचक श्री. अनिल सावंत ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहे. सुचक श्री. हसमुख गेहलोत ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. उपमहापौर :-**

सुचक श्री. हसमुख गेहलोत यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४२, विरोधात १६, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. सुचक श्री. हसमुख गेहलोत यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करणेत येत आहे.

**प्रकरण क्र. १२८ :-**

**मनपा वाहनांची दुरुस्ती /देखभाल करणेकरीता वार्षिक निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. १२४ :-**

शासन निर्णयानुसार विहित केलेल्या खर्चाच्या मर्यादेत राहुन वाहनाची देखभाल दुरुस्ती कामे पार पाडण्याकरिता सन २०१८-१९ या अर्थसंकल्पीय तरतूदी नुसार मनपा वाहनांसाठी स्पेअरपार्टस पुरवठा करुन दुरुस्ती करणे कामी ३ वर्षाकरीता आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देवून निविदा मागविणेस हि सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हसमुख गेहलोत अनुमोदक :- श्रीम. सिमा शाह**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | वैती चंद्रकांत सिताराम | १ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| २ | पाटील रोहिदास शंकर | २ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ३ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ३ | शिर्के अनंत गेणू | |
| ४ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ४ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ५ | जैन गीता भरत | ५ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | सिंह मदन उदितनारायण | ६ | सावंत अनिल दिवाकर | निरंक |
| ७ | भानुशाली वर्षा गिरधर | ७ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ८ | शाह रिटा सुभाष | ८ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ९ | गोहिल शानू जोरावर सिंह | ९ | कदम अर्चना अरुण | |
| १० | पाटील वंदना मंगेश | १० | भट दिप्ती शेखर | |
| ११ | मोकाशी दिपाली आनंदराव | ११ | पाटील धनेश परशुराम | |
| १२ | अरोरा दीपिका पंकज | १२ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १३ | नाईक विविता विवेक | १३ | सपार उमा विश्वनाथ | |
| १४ | भावसार वंदना संजय | १४ | परदेशी गिता हरीश | |
| १५ | बेलानी हेमा राजेश | १५ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १६ | भोईर विणा सुर्यकांत | १६ | बांड्या एलायस दुमिंग | |
| १७ | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| १८ | मुखर्जी अनिता बबलू | | | |
| १९ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | | | |
| २० | म्हात्रे परशुराम पद्माकर | | | |
| २१ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| २२ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| २३ | तिवारी अशोक सुर्यदेव | | | |
| २४ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | | |
| २५ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| २६ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| २७ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| २८ | परमार हेतल रतिलाल | | | |
| २९ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ३० | थेराडे संजय अनंत | | | |
| ३१ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ३२ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ३३ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ३४ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ३५ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ३६ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ३७ | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ३८ | व्यास रवि वासुदेव | | | |
| ३९ | खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ४० | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ४१ | भोईर गणेश गजानन | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

सही/-
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२९, **विविध वार्षिक दराच्या निविदा मागविणे कामी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे.**

**धृवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तांची देखभाल व दुरूस्तीसाठी कंत्राटदार यांचे जिल्हा दरसुचीतील दरानूसार वार्षिक मुदतीसाठी दर मागवून आवश्यकतेनूसार वेळोवेळी कंत्राटदार यांना मंजूर दराने कार्यादेश देऊन कामे करून घेण्यात येतात. या विभागातंर्गत खालील कामांसाठी वार्षिक दराच्या निविदा मागविण्यात येत असून अर्थसंकल्पीय तरतुदीच्या मर्यादेत कामे करून घेण्यात येतात

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| **१** | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध आरक्षणाच्या ताब्यात असलेल्या व येणाऱ्या जागांना, कुंपणभिंती बांधणे | रु.**1,50,00,000/-** |
| **२** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गटारे, नाले यावर विविध झाकणे बसविणे (वार्षिक निविदा) | रु.**1,50,00,000/-** |
| **३** | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील शौचालये वार्षिक मुदतीने स्थापत्य विषयक कामे देखभाल दुरूस्ती व आवश्यक कामे करणे **प्रायोगिक तत्वा वर नवघर , गोडदेव, घोडबंदर, भागातील शौचालये संचलन देखभाल दुरुस्तीसाठी पैसे दया व वापरा तत्वावर चालविणेसाठी देण्यात यावेत.** | रू.**2,00,00,000/-** |
| **४** | मनपा क्षेत्रातील स्लॅब, गटारे, फुटपाथ देखभाल दुरूस्ती करणे (वार्षिक निविदा) | रू.**2,00,00,000/-** |
| **५** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते दुरूस्ती, पूर्नपृष्ठीकरण वार्षिक मुदतीने देखभाल दुरूस्ती करणे | रु.**35,00,00,000/-** |
| **६** | **मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील अंतर्गत सजावटीचे , इतर पडलेली माती , साहित्य इ. उचलुन वाहतुक करण्यासाठी प्रभाग समिती निहाय मनुष्यबळ व डंपर इ.भाडयाने घेणे. (वार्षिक निविदा)** | रु.**2,00,00,000/-** |
| **७** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने सार्व. इमारती, स्मशानभुमी, शाळा इमारती, दफनभुमी, वार्षीक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणे. | रु.**2,00,00,000/-** |
| **८** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मनपा मालकीचे स्ट्रीट लाईट पोल वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे | रु.**1,15,00,000/-** |

**वरील कामांच्या तसेच सोबत जोडलेल्या वार्षिक देखभाल व दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांना व सोबतच्या सुधारीत खर्चाच्या यादीस प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.**

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

महासभेमध्ये विकासाचे कामासंदर्भात बराच काही उहापोह करण्यात आला तर ३५ कोटी रुपये रस्ते दुरुस्ती पुर्नपृष्ठीकरण वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणे याची मंजुरी घेतली जाते. यादी २५,३०,३५ कोटी रुपये मी देत होतो. कारण लागायचे आता तर तुमचे सी.सी. चे रस्ते झाले यू.टी.डब्ल्यू चे आता नविन रस्ते होणार आहेत. मग ३५ कोटी रुपये तुम्हाला वर्षभरामध्ये लागतील का? कारण सी.सी. चे रस्ते तुम्ही परत खोदणार नाही ना. २५ वर्षाची तुमची गॅरंटी आहे.

**मा. उपमहापौर :-**

इनामदार साहेब हे फक्त सी.सी. रस्त्यांसाठी नाही. तर स्मशानभूमी आहेत.......

**जुबेर इनामदार :-**

साहेब मी ३५ कोटी रुपये वर चर्चा करत आहे.

**मा. उपमहापौर :-**

३५ कोटी रुपये वरतीच आणि आपल्या शहरातील सर्व रस्ते की सी.सी. चे झालेले नाहीत. आपण निश्चितपणे ह्या वर्षभरात मॅक्झीमम रस्ते सी.सी. रोड होतील हा आमचा प्रयत्न आहे. परंतु ज्या ठिकाणी आपल्याला सी.सी. रोडच नाहीत त्याठिकाणी हे करावेच लागणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब कशी अडचण होते. एकदा त्याची मान्यता प्राप्त झाली. हा पैसा इथे ब्लॉक झाला ना सभागृहनेते साहेब हा पैसा दुसरी कुठेतरी वर्ग करुन काम करता आम्हाला येणार नाही.

**मा. उपमहापौर :-**

सार्वजनिक बांधकाम खुलासा करत आहेत.

**दिपक खांबित :-**

आपल्याकडे जे रस्ते आहेत रस्त्यावरुन सगळ्या युटीलीटीच्या लाईन गेलेल्या आहेत. जशी गॅसची लाईन इलेक्ट्रीकल केबल आहे. इंटरनेटचे केबल आहेत. आपले जास्त पाईप लाईन आहेत. सिव्हरेज लाईन सर्व गेलेले आहेत आणि ह्या दुरुस्ती करीता नविन टाकण्याकरिता संबंधीत एजन्सी मार्फत आपल्याकडे जे आपण दर ठरविलेले आहेत त्यानुसार पैसे भरणे जवळ जवळ दरवर्षी सुमारे आपल्याकडे ४० कोटी रुपये जमा करतात आणि त्यापैशामधूनच आपण हे खोदलेले रस्ते तसेच काही पुर्नपृष्ठीकरण करायचे रस्ते हे सुध्दा आपण ह्या ठेकेदाराकडून म्हणजे ह्या पैशातून करुन घेतो. आपल्या रस्ते दुरुस्ती वरती कुठलाही एक रुपये सुध्दा खर्च होत नाही. पैसे उरतात त्यामधून आपण पुर्नपृष्ठीकरण नविन वगैरे असे कामे करतो.

**जुबेर इनामदार :-**

खांबित साहेब तुमचा संशय हा विषय नाही आहे. चांगले आहे तुम्ही ४०-४५-५० कोटी रुपये जमवा. त्याच्यातुन तुम्ही आता ३५ कोटी रुपये फक्त खर्च करणार असे तुमचे मत आहे. होईल खर्च असा खर्च पडेल. आता कसे झाले आपल्याकडे बाकीचे जे काम आहे खोदकाम जो होता त्याचे पैसे तुम्ही घेत होता. म्हणजे एम.टी.एन.एल. गॅस, एम.जी.एल. ह्या एजन्सीकडून तुम्ही पैसे खोदकामाचे पैसे रस्ते दुरुस्तीचे पैसे तुम्ही ४० कोटी रुपये घेत आहात. पण आता तुमचा तिथे खर्च पडणार नाही कारण तुमचे रस्ते झाले आहेत.

**दिपक खांबित :-**

मागचा आपला एरिया वाढतो अजून गॅस लाईन बाहेरुन.............

**जुबेर इनामदार :-**

पुर्नपृष्ठीकरण आपण काय करायचो. साहेब याच दुरुस्तीमधून पुर्नपृष्ठीकरण पूर्ण रस्ते सुध्दा आपण करत आलो. आजपर्यंत आणि आजही करत आहोत. त्यात काही वाद नाही. तुमच्यावरती त्या विषयावर संशय येत नाही. एवढा पैसा काही तुम्हाला ३५ कोटी रुपये कारण आता तुमचे रस्ते झालेले आहेत. आयुक्त महोदय विषय कसा आहे ३५ कोटी रुपयेची मंजुरी दिली की ३५ कोटी रुपये तुमचे एका हेडमध्ये अडकले.

**धृवकिशोर पाटील :-**

सर यांची भुमिका रास्त आहे. यांचा संशय पण रास्त आहे. फक्त मिरा भाईंदर शहरामध्ये तुमच्या माहितीप्रमाणे किती रस्ते आहेत साहेब? जवळ जवळ ३०० ते ४०० रस्ते आहेत.

**दिपक खांबित :-**

३०० ते ४०० म्हणजे ३०० कि.मी रस्ते आपले सगळे होतात.

**धृवकिशोर पाटील :-**

किती.

**दिपक खांबित :-**

३०० कि.मी.

**धृवकिशोर पाटील :-**

साहेब ३०० कि.मी. चे रस्ते आहेत. ती शंका आम्हाला पण होती. आम्ही याच्यातली माहिती घेतली. आपले अप्रॉक्सीमेटली ३०० मीटर रस्ते आहेत आणि आपण ते सी.सी. रोड करत आहोत ते हार्डली मला वाटते काहीतरी ५० ते ७५ कि.मी. करत आहोत आणि उरलेले २०० ते २५० कि.मी. रस्ते अजूनही डांबरी आहेत. हळूहळू आपण ते पण करु.

**दिपक खांबित :-**

त्याची ती साईट पट्टी आपण ...............

**धृवकिशोर पाटील :-**

साईटपट्टी पण आपण डांबरची मारत आहोत. ही फक्त प्रोव्हिजन आहे. सदर याच्यात खर्च जर कमी पडला तर पैसे कमी होतील.

**जुबेर इनामदार :-**

मी सभागृहाच्या निदर्शनास विषय आणून दिलेला आहे. आयुक्तांनी त्याच्यावरती योग्य निर्णय घ्यावा.

**धृवकिशोर पाटील :-**

आयुक्त साहेब तुम्ही याच्यावर योग्य तो निर्णय घ्या.

**मा. उपमहापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर. सचिव पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १२९ :-**

**विविध वार्षिक दराच्या निविदा मागविणे कामी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे**

**ठराव क्र. १२५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्तांची देखभाल व दुरूस्तीसाठी कंत्राटदार यांचे जिल्हा दरसुचीतील दरानूसार वार्षिक मुदतीसाठी दर मागवून आवश्यकतेनूसार वेळोवेळी कंत्राटदार यांना मंजूर दराने कार्यादेश देऊन कामे करून घेण्यात येतात. या विभागातंर्गत खालील कामांसाठी वार्षिक दराच्या निविदा मागविण्यात येत असून अर्थसंकल्पीय तरतुदीच्या मर्यादेत कामे करून घेण्यात येतात

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध आरक्षणाच्या ताब्यात असलेल्या व येणाऱ्या जागांना, कुंपणभिंती बांधणे | रु.1,50,00,000/- |
| २ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील गटारे, नाले यावर विविध झाकणे बसविणे (वार्षिक निविदा) | रु.1,50,00,000/- |
| ३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील शौचालये वार्षिक मुदतीने स्थापत्य विषयक कामे देखभाल दुरूस्ती व आवश्यक कामे करणे **प्रायोगिक तत्त्वावर नवघर , गोडदेव, घोडबंदर, भागातील शौचालये संचलन देखभाल दुरुस्तीसाठी पैसे दया व वापरा तत्त्वावर चालविणेसाठी देण्यात यावेत.** | रू.2,00,00,000/- |
| ४ | मनपा क्षेत्रातील स्लॅब, गटारे, फुटपाथ देखभाल दुरूस्ती करणे (वार्षिक निविदा) | रू.2,00,00,000/- |
| ५ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते दुरूस्ती, पूर्नपृष्ठीकरण वार्षिक मुदतीने देखभाल दुरूस्ती करणे | रु.35,00,00,000/- |
| ६ | **मिरा-भाईदर महानगरपालिका क्षेत्रातील अंतर्गत सजावटीचे , इतर पडलेली माती , साहित्य इ. उचलुन वाहतुक करण्यासाठी प्रभाग समिती निहाय मनुष्यबळ व डंपर इ.भाडयाने घेणे. (वार्षिक निविदा)** | रु.2,00,00,000/- |
| ७ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील उद्याने, मैदाने सार्व. इमारती, स्मशानभुमी, शाळा इमारती, दफनभुमी, वार्षीक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणे. | रु.2,00,00,000/- |
| ८ | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मनपा मालकीचे स्ट्रीट लाईट पोल वार्षिक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे | रु.1,15,00,000/- |

**वरील कामांच्या तसेच सोबत जोडलेल्या वार्षिक देखभाल व दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांना व सोबतच्या सुधारीत खर्चाच्या यादीस प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात येत आहे.**

| अ.क्र | कामाचेनाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १. | मिरा-भाईंदर महानगरपालिका सार्व.इमारती, प्रभाग कार्यालय, विभागीय कार्यालय, पाण्याची टाकी, सबवे, स्कॉय वॉक, रुग्णालय, आरोग्य केंद्र, समाज मंदिरे व रेंटल हॉऊसींग ठिकाणची विद्युत विषयक कामे तसेच मुख्य कार्यालय इमारत माईक सिस्टम , EPBX System, Intercom System, UPS System वार्षीक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.१,१२,१६,९२५/- |
| २. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुख्यल कार्यालय इमारत, प्रभाग कार्यालय, विभागीय कार्यालय, वाचनालय, अभ्यासिका, इ-लायब्ररी, मा.आयुक्त व मा.महापौर निवास हॉस्पीटल इ. ठिकाणाचे वातानुकुलीत यंत्रे तसेच वॉटर कुलर व पाणी शुध्दीकरण यंत्रणा वार्षीक मुदतीने | रु.२५,००,०००/- |

| अ.क्र | कामाचेनाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| | देखभाल व दुरुस्ती करणे. | |
| ३. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध जंक्शन वरील सिग्नल यंत्रणा , ब्लिंकर वार्षीक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.५६,००,०००/- |
| ४. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध इमारतीमधील उद्वाहक वार्षीक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.५७,६१,०५८/- |
| ५. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध इमारतीमधील जनरेटर वार्षीक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.३२,७५,०७५/- |
| ६. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध सार्व .शौचालय येथील विद्युत विषयक कामे वार्षीक मुदतीत देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.५०,००,०००/- |
| ७. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील काशिमिरावबंदरवाडी स्मशानभुमी येथील Air Exahust System वार्षीक मुदतीने देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.४७,७६,२५०/- |
| ८. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध उद्याने / तलाव येथील विद्युत विषयक तसेच मोटार पंप व प्लंबींग विषयक कामे वार्षीक मुदतीत देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.३२,२२,०५०/- |
| ९. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणाचे आदीवासी पाडे व इतर ठिकाणचे सौरऊर्जा दिवे वार्षीक मुदतीत देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.१६,१७,५९३/- |
| १०. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विविध शाळा, अंगनवाडी, स्मशानभुमी व दफनभुमी येथील विद्युत विषयक कामे वार्षीक मुदतीत देखभाल व दुरुस्ती करणे. | रु.२१,५२,२२६/- |
| ११. | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते , लेन मार्कींग , झेब्राक्रॉसिंग, स्टॉप, लाईनथर्मो प्लास्टीक पट्टे मारणे, दुभाजक, फुटपाथ रंग काम इ. कामे करणे रस्ते मुख्यलेखापरीक्षण करुन अंमलबजावणी करणे रस्त्यालगतचा परीसर सुशोभिकरण करणे. | रु.२,००,००,०००/- |
| १२. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.), मिरारोड (पूर्व), भाईंदर (पूर्व) बंदरवाडी, काशिमिरा व पेणकरपाडा इ . ठिकाणच्या स्मशानभूमीमधील एल .पी.जी. शवदाहीनी वार्षिक मुदतीने देखभाल दुरुस्ती करणे. | रु.३०,००,०००/- |
| १३. | मिरारोड स्टेशन शांती शॉपिंग सेंटरते भक्ती वेंदान्त पर्यंतचा रस्ताUTWTकरणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.२१,८८,१९,८४२/-<br>रु.२७,७०,२५,९२०/- |
| १४. | मिरारोड (पुर्व) शांतीनगर सर्कलतेकुणाल शॉपिंग सेंटर (नयानगर पोलिसचौकी) पर्यंतUTWTकरणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.३,१३,३५,६०७/-<br>रु.३,९२,६३,५१६/- |
| १५. | मिरारोड (पुर्व) नरेंद्र पार्कते उड्डाणपुल पर्यंतचा रस्ता पर्यंतUTWTकरणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.१०,२७,९६,१९२/-<br>रु.१३,२०,९३,१०७/- |
| १६. | मिरारोड (पुर्व) सिल्व्हर पार्क रस्ता सृष्टी पर्यंतUTWTकरणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.१३,२७,८०,०१२/-<br>रु.१७,२०,८२,८९६/- |
| १७. | मिरारोड (पुर्व) साईबाबा नगरतेशितलनगर पर्यंत रस्ताUTWTकरणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.१३,२९,७२,५९४/-<br>रु.१६,४२,२१,१५४/- |
| १८. | भाईंदर (पुर्व) दिपक हॉस्पीटलते सेव्हन ईलेव्हन हॉस्पीटल रस्ताUTWTकरणे. | |

| अ.क्र | कामाचेनाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| | **अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.४,३७,३६,८४४/-<br>रु.५,६४,२०,५२८/- |
| १९. | भाईंदर (पुर्व) गोल्डननेस्ट रोडवरील स्पोर्ट्सकॉम्पलेक्सते ७/११ हॉस्पीटल पर्यंत रस्ताUTWTकरणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.२,९४,२२,२७३/-<br>रु.३,६०,८६,४१८/- |
| २०. | भाईंदर (पुर्व) प्रफुल्ल पाटीलचौकते विमल डेअरी रस्ता UTWT करणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.३,२९,७९,८४०/-<br>रु.४,२८,४०,८१२/- |
| २१. | घोडबंदर रस्ता (गोवळा देवी मंदिरते वर्सोवानाका) UTWTकरणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.२८,६९,९२,८८८/-<br>रु.३५,३१,१६,०४९/- |
| २२. | राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८ वर सर्व्हीस रस्त्यालगत काशिगाव नाका एच.पी. पेट्रोल पंप ते दाराज धाबा ते ६०.०० मी. डी.पी. रस्त्यापर्यंतनाला बांधणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.१५,८९,७४,७५१/-<br>रु.१७,४७,२४,८३८/- |
| २३. | भाईंदर (पूर्व) आराधनाइमारतते आराधना इंडस्ट्रीपर्यंत व चंद्रकला इमारती पासून खाडीपर्यंत (आराधना नाल्याची) पुर्नःबांधणीकरणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.३,८१,४२,२५०/-<br>रु.४,११,९३,६३०/- |
| २४. | मिरारोड (पुर्व) पय्याडे हॉटेल ते लोढा रोडपर्यंत सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे (विशेष निधी) (फेरनिविदा)<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.२,००,००,०००/-<br>रु.२,६२,८३,६०२/- |
| २५. | मिरारोड (पुर्व) शांतीपार्क बालाजी हॉटेल ते देना बँक पर्यंतचा रस्तासिमेंट कॉंक्रीटचा तयार करणे. (विशेष निधी) (फेरनिविदा)<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.६,८१,१७,६००/-<br>रु.८,१३,३३,०७६/- |
| २६. | मिरारोड (पुर्व) हैदरी चौक ते नरेंद्र पार्क सर्कल पर्यंत कॉक्रीट रस्ता तयार करणे (विशेष निधी) (फेरनिविदा)<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.२,६२,५२,४००/-<br>रु.३,०५,५४,२७९/- |
| २७. | रा.म.क्र.८ वरील काशिमीरा उड्डाणपुला खालील जागेमध्ये उद्याने विकसित, सुशोभिकरण करणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.६,७५,६३,८००/-<br>रु.७,६५,७२,८५४/- |
| २८. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पुर्व) नयानगर आरक्षण क्र.१७८ येथील इमारतीवर पहिल्या मजल्याचे व तळ मजल्या वरील उर्वरित कामे करणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.२,०४,२५,९६७/-<br>रु.२,५८,९६,१७१/- |
| २९. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राई आरक्षण क्र. ५६ सी बहुउद्देशीय इमारतीत पहिल्या मजल्याचे बांधकाम करणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.२,०१,२०,०२४/-<br>रु.२,४७,७७,८१०/- |

| अ.क्र | कामाचेनाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| ३०. | मिरा भाईंदर महानगरपालिकाक्षेत्रात मेडीटेशन सेंटर बांधणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.४,४८,५७,२१७/-<br>रु.४,७९,९८,२७९/- |
| ३१. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मौजे महाजनवाडी येथे तरणतलाव बांधणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.३,११,२७,१००/-<br>रु.३,३९,५३,४४०/- |
| ३२. | भाईंदर (पूर्व) आरक्षणक्र.241 कम्युनिटी हॉल विकसित करणे<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.१६,८८,६७,०००/-<br>रु.२०,०८,६७,२९६/- |
| ३३. | घोडबंदर आरक्षण क्र.326 अये थेबसडे पोबांधणे. (भाग 1)<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.१४,३९,६३,०००/-<br>रु.१८,६८,६३,९७४/- |
| ३४. | घोडबंदर आरक्षण क्र.326 अ येथे बस डेपो बांधणे. (भाग 2)<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.२२,७२,४४,५००/-<br>रु.२४,२०,१५,३९२/- |
| ३५. | भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. 121 येथे वाचनालय बांधणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.२,७८,३०,०००/-<br>रु.३,४३,९५,०९७/- |
| ३६. | भाईंदर (पूर्व) गोल्डन नेस्ट येथे गोल्डन नेस्ट चौकी ते हनुमान मंदीरपर्यंत रस्ता सिमेंट कॉक्रीटकरणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.१०,४५,२२,८५०/-<br>रु.१३,७१,६५,३३६/- |
| ३७. | भाईंदर (पूर्व) आरक्षणक्र. 108 विकास योजनेतील मार्केट विकसित करणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.३,८९,६२,८५०/-<br>रु.४,२६,४८,७३५/- |
| ३८. | भाईंदर (प.) येथील वालचंद प्लाझा ते अरीहंत दर्शन (90 फुटीरोड) पर्यंत स्ताकॉक्रीटीकरण करणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.३,७८,२०,०५०/-<br>रु.३,९८,२४,५१३/- |
| ३९. | भाईंदर (प.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग रस्ता कॉक्रीटीकरण करणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.७,८७,२४,६००/-<br>रु.९,३१,३१,२०२/- |
| ४०. | भाईंदर (पूर्व) खारीगाव येथील मासळी मार्केटची पुर्ण:बांधणी करणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.६४,३९,५४२/-<br>रु.६७,६०,४७५/- |
| ४१. | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टरनं. 6 या आर.जी. जागेत Multipurpose Hall बांधणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.२,००,२०,६६०/-<br>रु.२,४६,३५,४२२/- |
| ४२. | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टरनं. 9 या आर.जी. जागेत Multipurpose Hall बांधणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.२,००,००,०००/-<br>रु.२,४५,९०,०००/- |
| ४३. | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील चौक येथील शाळेची पुर्न:बांधणी करणे. | |

| अ.क्र | कामाचेनाव | अंदाजित खर्च |
| --- | --- | --- |
| | **अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.२,८३,५३,५४७/-<br>रु.३,२२,४९,३२४/- |
| ४४. | काजुपाडा येथील शाळेची पुर्न:बांधणी करणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.२,२२,९४,१४९/-<br>रु.२,५३,५५,१३६/- |
| ४५. | भाईंदर (पूर्व) जैसलपार्क येथील ओस्तवाल ऑरनेट ते ओत्सवाल ऑनेक्सपर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.३,९८,६५,४००/-<br>रु.५,१५,६९,८८१/- |
| ४६. | मिरारोड (पूर्व) उमांकात मिश्रा चौक ते सृष्टी जुना ब्रिजपर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.३,५२,९२,३००/-<br>रु.४,६०,०३,५१३/- |
| ४७. | काशिमिरा हॉटेल ते राष्ट्रीय महामार्ग क्र . 8 आणि सनराईज ते नाईट मिटींगपर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे.<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.३,३९,६२,७५०/-<br>रु.४,०७,२१,३३७/- |
| ४८. | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात उत्तन पोलिस चौकी ते उत्तन बसस्टॉपपर्यंत पालीरोडचे रस्तारुंदीकरण करणे<br>**अंदाजपत्रकीय खर्च**<br>**मंजूर निविदानूसार अपेक्षित खर्च** | रु.२,९३,११,०००/-<br>रु.३,२२,४२,१००/- |
| ४९. | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील राई तलाव , जरीमरी तलाव, साईदत्त तलाव, सातकरी तलाव, गावदेवी तलाव, मोर्वा तलाव, नवघर जुना तलाव, राव तलाव, शिवार तलाव, एस.एन. कॉलेज समोरील तलाव , नास्का तलाव , गोडदेव, मांडली तलावातील मुर्ती विसर्जनासाठी वेगळी उपाययोजना करणे. | रु.३,२१,३४,६००/- |
| ५०. | बी.एस.यु.पी. संक्रमण शिबीरातील खोल्यांची दुरूस्ती करणे | रु.७५,००,०००/- |
| ५१. | भाईंदर (पू.) आ.क्र.241 काम्यूनिटी सेंटर अंतर्गत सजावट करणे. | रु.४,७२,१८,०००/- |
| ५२. | भाईंदर (पू.) आ.क्र.242 विद्युत विषयक व इतर कामे करणे. | रु.४२,७२,४००/- |
| ५२. | घोडबंदर बस डेपो अंतर्गत सजावट, फर्निचर कामे करणे. | रु.२,७७,००,०००/- |
| ५३. | महानगरपालिका मुख्य कार्यालय इमारत फर्निचर, नूतनीकरण कामे करणे. | रु.२,४२,२५,०००/- |
| ५४. | मनपा क्षेत्रातील अमृत अभियान अंतर्गत आ .क्र. 368,305,230,261, 273, 255, 335, 196 मध्ये विविध कामे करणे.<br>स्थापत्यकामे<br>विद्युतकामे | रु.१३,७०,४४,८००/-<br>रु.२,१०,५०,४००/- |
| ५५. | मिरारोड (पूर्व) आरक्षणक्र. 178 येथे विद्युत विषयक कामे करणे. | रु.१६,१७,६८०/- |
| ५६. | मिरारोड (पूर्व) आरक्षणक्र. 178 येथे वातानुकुलिन यंत्रणा बसविणे. | रु.१२,२०,०००/- |

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३०, **संत शिरोमणी सावतामाळी शेतकरी आठवडे बाजार अभियान राबविणेसाठी जागा उपलब्ध करुन मिळणेबाबत.**

**शानु गोहिल :-**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राज्य शासनाच्या धोरणानुसार संत शिरोमणी सावतामाळी शेतकरी आठवडे बाजार मिरारोड आरक्षण क्र . 231 रामदेव पार्क येथील स्व . मिनाताई ठाकरे मार्केट इमारतीमधील व भाईंदर (प.), एल.बी.टी. कार्यलयामध्ये सुरु होता.**

**परंतु याठिकाणी मिरा भाईंदर महापालिकेचे मार्केट सुरु होत असल्याने सदर ठिकाणी आठवडे बाजार बंद करून संबंधीतांनी मागितलेली पर्यायी जागा शिवार गार्डन शेजारी सर्व्हे क्र. 61/62 (आरक्षण क्र. 259) यामध्ये सुरु करावा. तसेच त्याठिकाणी शेतकऱ्यांनी शेतात पिकविलेला मालच विकणे बंधनकारक राहील असे हमीपत्र घेण्यात यावे व भाईंदर पश्चिम करीता मा . आयुक्त यांनी जागा निश्चित करु न त्याठिकाणी बाजार सुरु करण्याचे आदेश देण्यात यावेत असा मी ठराव मांडत आहे.**

**हेतल परमार :-**

माझे अनुमोदन आहे.

**गिता जैन :-**

साहेब सर्वप्रथम सावतामाळी शेतकरी संस्थांनी शिवार गार्डनची जागा मागितली नाही. तर तुमच्याकडे कोणी दुसरा अर्ज केला असेल. दुसरे हे जे आठवडे बाजार तिथे चालू केला तेव्हापासून आपण त्यांना ती जागा शेतक-यांना दिलेली आहे आणि मला वाटते आपण जे हॉल दिलेला आहे मिनाताई ठाकरे आपण फक्त त्यांना तो हॉल दिलेला आहे कॉन्ट्रॅक्टरला. आपण ती जागा बहुतेक दिली नसेल कारण ते मार्केट आरक्षित जागा आहे. आपण तिथे हॉल बांधलेला आहे. म्हणजे ती जागा त्यांनी मागितलीच नाही. ती जागा त्यांना हवीच आहे आणि तरी जर तुम्हाला बदल करायचा असेल तर आपण जे त्यांना हैराणगीरी केली त्या संस्थेला पण ती मान्यता आहे का? जे काही तुमच्याकडे आलेले आहे शेतकरी बाजारसाठी सगळ्यात पहिला पणन मान्यता असणे गरजेचे आहे. ते आहे का पहिला ते आपण चेक केले का? इथे पणन रजिस्ट्रेशन व्हायचे गरजेचे आहे. शेतकरी बाजारासाठी.

**दिपक खांबित :-**

साहेब एकतर ते मार्केट आरक्षण आहे त्याच्यात आपण खाली मार्केट आणि वरती हॉल बांधलेला आहे. ते त्यांना तात्पुरत्या स्वरुपात मार्केटचे काम सुरु होते तेव्हा ते दिलेले होते. आता तिथे मार्केट झालेले आहे. आणि आपले वरती हॉल आहेत त्यामुळे कसे आहे की तिकडे लग्नकार्य वगैरे असतात आणि पार्किंगसाठी साहेब अडचण निर्माण होते म्हणून आपण त्यांना दुसरी जागा देऊ या. म्हणून हा विषय आणलेला आहे. आम्ही दुस-या दोन जागा सुचविलेल्या आहेत.

**गिता जैन :-**

साहेब तुम्ही सूचवून चालत नाही. तुम्ही दिड वर्षांनी शेतकरी जिथे बसतात आपण एखाद्या रात्री अडीच वाजता दार बंद करुन टाकतात. त्यांना बाहेर बसावे लागते. हे का बरोबर आहे. त्यांना आपण काही सुचना देत नाही की उद्या तुम्हाला यायचे नाही वगैरे. काहीच सुचना द्यायची नाही आणि रात्री बाहेर बसायचे १८ तास ते मुसाफरी करुन येतात. तुम्ही रात्री त्यांना बाहेर बसवतात. ज्या राज्यात मुख्यमंत्री सांगतात शेतक-यांना मदत करा आणि त्या राज्यात आपण आपल्याकडे शेतकरी बरोबर काय करत आहोत.

**धृवकिशोर पाटील :-**

मा. मुख्यमंत्र्यांच्या आदेशान्वये मिरा भाईंदर महापालिकेने त्या शेतक-यांना जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. त्या शेतक-यांना त्यांचा माल विकण्याकरिता एक चांगले व्यासपीठ चांगली बाजारपेठ आपण त्यांना उपलब्ध करुन देत आहोत. परंतु महापालिकेने एवढे पैसे खर्च करुन एक चांगली वास्तु निर्माण केलेली आहे आणि ती वास्तू मिरा भाईंदर शहराच्या नागरिकांकरिता आपण ओपन करुन दिलेली आहे आणि त्या नागरिकांना ह्या मार्केटमुळे थोडासा त्रास होत असेल त्यामुळे आपण तिकडून त्यांना थोडेसे शिफ्ट करुन जर दुसरीकडे येत असेल तर आपण कोणाचाही अनादर किंवा चुकीचे काही करत नाही. आपण दोघांना संधी दिलेली आहे. आपल्या मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना पण आपण त्यांची सोय करायचा प्रयत्न करत आहोत आणि तसेच त्या शेतक-यांना एक चांगली जागा सुध्दा दुसरी आपण उपलब्ध करुन देत आहोत. याचा अर्थ असा नाही की आपण एकदा त्यांना जागा दिली की त्यांची परमनन्ट आहे.

आपण सुध्दा रोड वाईंडींग करतो. फॅनिंग करतो किंवा एखादे आरक्षण डेव्हलप करतो त्यावेळी जिथे जे लोक असतात त्यांना आपण स्थलांतरीत करतो. शिफ्ट करतो, दुसरी जागा देतो. त्याचप्रमाणे आपण ह्या लोकांना ह्या शेतकऱ्यांना दुसरी जागा दिलेली आहे. त्याच्यामध्ये मॅडम त्यांना त्यांच्यावरती अन्याय किंवा अत्याचार असे काही होत नाही.

**गिता जैन :-**

साहेब रात्री अडीच वाजता रस्त्यावर थांबायचे तो अन्याय नाही तर दुसरे काय आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

ठिक आहे जर समजा अशी काही चुकी असेल तर ते अक्षम्य आहे. ती अशी चुकी पुन्हा प्रशासनाने करु नये. आणि त्यांना व्यवस्थित ऑर्डर देऊन त्यांना मुदत देऊन दुसरी पर्यायी व्यवस्था करावी.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम मुळात आयुक्त साहेब ते मार्केटचे आरक्षण आपण तिथे मार्केट बांधले. अपेक्षा ही होती की फुलफीलमध्ये तिथे मार्केट चालेल. वस्ती वाढत आहे. तिथे हॉल बांधला. हॉल आपण कॉन्ट्रॅक्टरला चालवायला दिला आणि आता त्या कॉन्ट्रॅक्टरला फायदा व्हावा तिथे लग्नसमारंभ व्हावेत म्हणून मार्केटच आपण हटवत आहोत आणि रोडवर आणतो. ह्या जागा तुम्ही ज्या निश्चित केलेल्या आहेत ते शिवार गार्डनच्या बाजूला साहेब आज जाऊन तिथे परिस्थिती बघा.

**मा. आयुक्त :-**

मुद्दा समजून घ्यायचा आहे होते काय विषय बाजूला राहतो आणि आपली चर्चा दुसरीच होते. मला ह्या भाईंदरमध्ये नविन प्रथा बघायला आता मिळत आहे. विषय असा आहे शेतकऱ्यांसाठी टेम्पररी मार्केट आहे. आपले मार्केट शेतकऱ्यांना देणे हे अपेक्षित नाही. मार्केटचा समोरचा भाग तिथे वापरला जात होता. आता ती वास्तु खांबितने सांगितले की चांगल्या पध्दतीने कार्यान्वित झाली आणि त्याचे पर्पज सर होत आहे. तर आपण समजा असे दोन मार्केटचे...............

**अनिल सावंत :-**

मार्केटचा परपज सर होत नाही त्यांना.

**मा. आयुक्त :-**

बाहेरुन जे शेतकरी येतात त्यांना जागा निश्चित करायचे आहे. पूर्वी दोन जागा निश्चित केल्या होत्या तिथे गैरसोय होऊ लागले वाद होऊ लागले, तसे न होता फुलप्लेस शेतकऱ्याला न्याय भेटला पाहिजे.

**अनिल सावंत :-**

साहेब विषयांतर होत नाही. तुम्ही शिवार गार्डनच्या शेजारी ही जागा दिलेली आहे. आज साहेब एस.के. स्टोनच्या बाजूला जो ओपन प्लॉट होता तिथे जाऊन परिस्थिती बघा. तिथे पहिल्यांदा तुम्ही मच्छी मार्केट बसविले. आता भाजी मार्केट सुरु झाले त्याठिकाणी एवढी वाईट परिस्थिती आहे.

**मा. आयुक्त :-**

सावंत साहेब हे मार्केट फार टेम्पररी चालतो. सकाळच्या सत्रामध्ये २ ते अडीच तास चालतो आणि आठवड्यातून एक दिवस चालतो.

**अनिल सावंत :-**

साहेब फेरिवाले कधी टेम्पररी नसतात. एक दिवस बाजार लागले. दुसऱ्या दिवशी तिथे गाड्या लागतील. त्या शेतकऱ्यांचे नसणार दुसऱ्यांचे असणार. हे एस.के. स्टोनच्या बाजूचे मार्केटची परिस्थिती तुम्ही तिथे जाऊन बघा. मेन रोड आहे. मिरा भाईंदरचा मेन रोड आहे. छत्रपती शिवाजी महाराज मेन रोड तिथे एस.के.स्टोनच्या पूढे आपण सकाळी गाडी घेऊन येऊ शकत नाही. एवढी वाईट परिस्थिती आहे.

**मा. उपमहापौर :-**

सातत्याने त्याच्यावरती कारवाई करणेचे काम देखील चालू आहे.

**अनिल सावंत :-**

तुम्ही कारवाई करणार का त्याच्यावर?

**मा. उपमहापौर :-**

कारवाई चालू आहे.

**अनिल सावंत :-**

ते पण टेम्पररी होते. आज परमनन्ट झाले. मेन हायवेवर ३-३, ४-४ गाड्या लागत आहेत.

**मा. उपमहापौर :-**

आपण त्यांचा माल देखील जप्त केलेला आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

आयुक्त साहेब हा मुद्दा अतिशय योग्य आहे. हा फक्त एस.के. स्टोनचा नाही. संपूर्ण मिरा भाईंदर शहरामध्ये साहेब हे झालेले आहे. आपण रोड वाईंडींग केले, रोड मोठे केले, फॅनिंग केले. तिथे साहेब आता फेरिवाले बसायला लागले. एवढी संख्या वाढली. सकाळी आम्ही जेसल पार्कच्या रस्त्यावरती गेलो पूर्ण ट्राफीक जाम होती हॉकर्स आणि याच्यामुळे......

**मा. आयुक्त :-**

ग्रामीण भागातून शेतकरी माल पिकवून शहरात येतात त्यांना २-४ जागा आपण दिल्या पाहिजेत.

**धृवकिशोर पाटील :-**

हो.

**अनिल सावंत :-**

त्यांना द्या साहेब मी दोन नाही म्हणत आणखी ४ द्या.

**मा. उपमहापौर :-**

तुम्हाला एखादी जागा सुचवायची असेल तर सूचवू शकता. ती जागा तुम्ही सुचवा.

**मा. आयुक्त :-**

आमची अपेक्षा तीच आहे. तुम्ही जे म्हणतात ते मान्य आहे तिथे आपण विचार करु म्हणजे शिवार गार्डनचे त्याशिवाय आपण................

**गिता जैन :-**

सगळे फेरिवाला बदल बोलत आहेत. मी फक्त शेतकरी बाजार बोलत आहे. आपल्या मंत्रालयात पण आपल्याला माहीत असेल मुख्यमंत्रींनी उद्घाटन केलेले आणि आजही मंत्रालयाच्या परिसरात शेतकरी बाजार लागतो. दर रविवारी हा पण फक्त दिवसाचा रविवार अर्धा रविवार त्यांना पाहिजे. दोन वाजेपर्यंत तेवढेच पाहिजे त्यापेक्षा ते जास्त घेत नाही.

**मा. आयुक्त :-**

मला काय म्हणायचे आहे अशा काही दोन तीन जागा अजून सांगा.

**गिता जैन :-**

ठिक आहे साहेब पण त्यांनी दोन जागा तेही तुमचीही अडचण लक्षात घेऊन या संस्थेने जे दोन जागा सुचविलेल्या आहेत ते त्यांना द्या. आपण काय करतो दुसरी जी संस्था आली त्यांनी सुचविलेली जागा त्यांना देत आहात.

**मा. महापौर :-**

कोणती जागा आहे ती तुम्ही बघुन घ्या.

**मा. उपमहापौर :-**

तुमच्याकडे एखादा स्पॉट असेल तर द्या.

**गिता जैन :-**

शेतकरीसाठी पणन रजिस्ट्रेशन आवश्यकता आहे. दुसरी संस्था ह्या शहरात जी नाही आली त्याला पणन रजिस्ट्रेशन आहे का?

**मा. उपमहापौर :-**

ह्या संदर्भात आम्ही आयुक्तांना मागच्या ठरावात आयुक्त साहेब आपल्याला अधिकार दिले आहेत.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

महापौर मॅडम २४६ मध्ये आपल्याकडे जागा आहे ना तिथे पण ते आरक्षण आहे ना २४६ मध्ये घ्या ना.

**मा. महापौर :-**

बघुन घ्या ना.

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे.

**मा. उपमहापौर :-**

आयुक्त साहेब यांच्याही स्पॉटची नोंद घ्यावी.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

महापौर मॅडम साहेब माझा एक विषय आहे. प्रमोद महाजन हॉल आणि मिनाताई ठाकरे हॉल. ह्या ठिकाणी महापालिकेच्या माध्यमातून जे ठरलेले रेट हे पण चेक करायचे ते गोरगरिबांसाठी महापालिकेने बांधलेले हॉल आहेत आणि तिथे अंधाधुंदी मनमानी चाललेली आहे. रेट, कॅटरर्स रेट वगैरे जास्त आहेत. त्यांची पूर्ण मोनोपॉली चालू आहेत. तुम्ही ह्यावरती गांर्भियाने लक्ष द्यावे. महापालिकेने ठरविलेल्या रेटप्रमाणे साहेब त्या ठिकाणी गोरगरिब जर महापालिकेचा हॉल घ्यायला जातो. तिथे यांचे मोनोपॉली चालू आहे. त्याठिकाणी कॅटरींग त्यांनी स्वतःचे द्यायचे. तुमचे आणू शकत नाही असे काही ठिकाणी प्रॉब्लेम चालू आहेत. तुम्ही त्याचेवर लक्ष द्यायचे आहे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे त्याची नोंद घेण्यात येईल.

**गिता जैन :-**

साहेब मी जे संस्थेचे विचारले त्यांचे पणन रजिस्ट्रेशन चेक करुन घ्या. शेतकरी बाजारसाठी पणन रजिस्ट्रेशन अतिआवश्यक आहे. ते जी.आर मध्ये लिहीलेले आहे. मी माझ्या मनाने सांगत नाही. साहेब जर त्या दुस-या संस्थेने मागितले असेल तर हे आपण दिड वर्षांनी आपल्याकडे दोघी ठिकाणी शेतकरी लावत आहेत. त्याच्यावर अन्याय होऊ नये तशी जागा त्यांनी आपल्याला लेटर दिलेले आहे. तुम्हाला ती जागा मोकळी करुन पाहिजे.

**दिपक खांबित :-**

आता विषय जो आहे त्या ज्या संस्थेने दिले त्याला फक्त जागा बदलून द्यायचा विषय आहे. नविनला द्यायचा विषय नाही. आता जे करत आहेत त्यांनाच फक्त जागा.

**गिता जैन :-**

मी नविन जागा सांगत नाही. नविन म्हणजे जे तुम्ही बदलून द्यायचे............

**दिपक खांबित :-**

नविन संस्था नाही जी संस्था आता काम करत आहे त्याला जागा त्या ऐवजी बदलून द्यायचा विषय आहे.

**गिता जैन :-**

तोच विषय सांगते. त्यांनी आपल्याला लेटर दिलेले आहे.

**जयंतीलाल पाटील :-**

खांबित साहेब बदलून द्यायचे कारण काय. शेतक-यांचे देशामध्ये हाल चालू आहेत. इथे सुध्दा तुम्ही त्यांचे तेच हाल करत आहात. इथून तिकडे इकडे तिकडे हाल करता तुम्ही. म्हणजे तुमची मनमानी चालू आहे का. ठेकेदाराला तुम्ही बळी पडता सगळीकडे हॉलची मनमानी चालू आहे. गरिबांचे हॉल पूर्ण मिळायला पाहिजे. ते तुम्ही ठेकेदाराला दिले आहेत. शेतक-यांचे हाल तुम्ही लोकांनी लावलेले आहेत.
(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

जयंतीलाल पाटील साहेब ऐकून घ्या ही तहकूब सभा आहे.............

**जयंतीलाल पाटील :-**

आठवड्याचा बाजार तुम्ही हलवता............

**मा. उपमहापौर :-**

तो हलविला नाही. आपल्या सर्व सदस्यांचा सुचना आयुक्तांकडे द्या.

**जयंतीलाल पाटील :-**

तुम्ही जो आता आठवडे बाजार हलवता हा ठेकेदारासाठी हलवता. मिनाताई ठाकरे जो हॉल आहे हा ठेकेदाराला देणेत आलेला आहे.
(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

तुमच्या ज्या सुचना असतील हे अधिकार आपण आयुक्त साहेबांना दिलेले आहेत ज्या सुचना असतील त्या सुचना करा त्या मान्य केल्या जातील.

**जयंतीलाल पाटील :-**

महापौर मॅडम ठेकेदाराला बळी पडू नका. माझे एकच म्हणणे आहे शेतक-यांचे तुम्ही हाल करु नका.

**मा. महापौर :-**

शेतक-यांचे आपण हाल करत नाही आहोत. पण त्यांना पर्यायी जागा देत आहोत.

**जयंतीलाल पाटील :-**

तुमचे मुख्यमंत्री साहेब बोलतात शेतक-यांना आठवडे बाजार द्यायचे आणि तुम्ही आठवडे बाजार हटवता.

**मा. महापौर :-**

आपण हटवत नाही. आपण बसवतो.

**अनिल सावंत :-**

आमचा ठराव आहे.

**गिता जैन :-**

साहेब आता हे अन्नपूर्णाचं ज्याचे शेतकरी बाजार चालू आहे. जेव्हा त्यांना ही अडचण कळाली आणि जेव्हा आपण त्यांना रात्री बाहेर ठेवले. दुस-या रविवारी बाहेर बसावे लागले. साहेब त्यांचे मार्केट अफेक्ट झालेली आहे. १५ टक्के आणि ते नुकसान आपण भरु शकणार नाही. पण जरी त्यांनी आपल्याला एक लेटर दिलेले आहे. त्यांनी दोन जागा सुचविलेल्या आहेत. तर तुम्ही बदल्यात कुठली जागा देऊ शकतात. मी नविन जागेचे बोलत नाही.

**मा. आयुक्त :-**

त्यांनी कोणत्या दोन जागा सुचविलेल्या आहेत?

**गिता जैन :-**

मॅक्सेस मॉल वरील समोरील फुटपाथ आणि लक्ष्मी पार्क कनकिया रोड म्हणजे त्या हॉलचे ऐवजी कनकिया रोड म्हणजे त्याच परिसरात पार्क व्ह्यू हॉटेलच्या विरुध्द दिशेला फुटपाथ हे लेटर त्यांनी आपल्याला त्याच दिवशी दिले. ज्या दिवशी ही सगळी अडचण झालेली.......

**मा. उपमहापौर :-**

आता आपल्या ठरावात आयुक्त साहेबांना याच्यावर निर्णय घेतील.

**गिता जैन :-**

ते लेटर दिल्याप्रमाणे साहेब तुम्ही ते अलाऊड करा. नाही तर जिथे आहेत तिथेच बसु द्या. दोघांमधून एक तुमचा अधिकार आहे. पण शेतक-यांचा विचार करुन करावे. नयना ताई सांगते तसे शेतक-यांचा विचार इथे नाही तर आपण शेतक-यांनी पिकविलेले सर्व इथे खातो.

**मा. महापौर :-**

एक जागा नक्की करुन घ्या. दोन जागा नक्की करा आणि त्यांना द्या.

**अनिल सावंत :-**

आठवडे बाजारासाठी आरक्षण क्र. २३१ येथेच ठेवण्यात यावे. या व्यतिरिक्त शेतक-यांनी मागीतलेली जागा देण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

**माझे अनुमोदन आहे.**

**मा. महापौर :-**

सचिव साहेब दोन ठराव आलेले आहेत. मतदान करा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३० करिता दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. शानु गोहिल, अनुमोदन श्रीम. हेतल परमार. दुसरा ठराव सुचक श्री. अनिल सावंत, अनुमोदन श्री. हरिश्चंद्र आमगावकर. प्रथम दुसरा ठराव मतदानास पुकारतो. सुचक श्री. अनिल सावंत ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्री. शानु गोहिल ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्रीम. शानु गोहिल यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४५, विरोधात १७, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. सुचक श्रीम. शानू गोहिल यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करण्यात येत आहे.

प्रकरण क्र. १३० :-

संत शिरोमणी सावतामाळी शेतकरी आठवडे बाजार अभियान राबविणेसाठी जागा उपलब्ध करुन मिळणेबाबत.

ठराव क्र. १२६ :-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राज्य शासनाच्या धोरणानुसार संत शिरोमणी सावतामाळी शेतकरी आठवडे बाजार मिरारोड आरक्षण क्र . 231 रामदेव पार्क येथील स्व . मिनाताई ठाकरे मार्केट इमारतीमधील व भाईंदर (प.), एल.बी.टी. कार्यलयामध्ये सुरु होता.

परंतु याठिकाणी मिरा भाईंदर महापालिकेचे मार्केट सुरु होत असल्याने सदर ठिकाणी आठवडे बाजार बंद करून संबंधीतांनी मागितलेली पर्यायी जागा शिवार गार्डन शेजारी सर्व्हे क्र. 61/62 (आरक्षण क्र. 259) यामध्ये सुरु करावा . तसेच त्याठिकाणी शेतकऱ्यांनी शेतात पिकविलेला मालच विकणे बंधनकारक राहील असे हमीपत्र घेण्यात यावे व भाईंदर पश्चिम करीता मा . आयुक्त यांनी जागा निश्चित करुन त्याठिकाणी बाजार सुरु करण्याचे आदेश देण्यात यावेत असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. शानु गोहिल अनुमोदक :- श्रीम. हेतल परमार

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजु यशवंत | |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | निरंक |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | शिर्के अनंत गेणू | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ६ | जैन गीता भरत | ६ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |
| ७ | सिंह मदन उदितनारायण | ७ | सावंत अनिल दिवाकर | |
| ८ | भानुशाली वर्षा गिरधर | ८ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ९ | गोहिल शानू जोरावर सिंह | ९ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| १० | पाटील वंदना मंगेश | १० | कदम अर्चना अरुण | |
| ११ | सोंस निला बर्नाड | ११ | भट दिप्ती शेखर | |
| १२ | मोकाशी दिपाली आनंदराव | १२ | पाटील धनेश परशुराम | |
| १३ | अरोरा दीपिका पंकज | १३ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १४ | नाईक विविता विवेक | १४ | सपार उमा विश्वनाथ | |
| १५ | भावसार वंदना संजय | १५ | परदेशी गिता हरीश | |
| १६ | बेलानी हेमा राजेश | १६ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १७ | भोईर विणा सुर्यकांत | १७ | बांड्या एलायस दुमिंग | |
| १८ | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| १९ | मुखर्जी अनिता बबलू | | | |
| २० | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | | | |
| २१ | म्हात्रे परशुराम पद्माकर | | | |
| २२ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| २३ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| २४ | तिवारी अशोक सुर्यदेव | | | |
| २५ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | | |
| २६ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| २७ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| २८ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २९ | कांगणे मिना यशवंत | | | |
| ३० | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३१ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ३२ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ३३ | थेराडे संजय अनंत | | | |
| ३४ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ३५ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ३६ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ३७ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ३८ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ३९ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ४० | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४१ | व्यास रवि वासुदेव | | | |
| ४२ | खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ४३ | पांडेय पंकज सूर्यमणि | | | |
| ४४ | भोईर गणेश गजानन | | | |
| ४५ | पारधी सुजाता यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

सही/-

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

नगरसचिव :-

प्रकरण क्र. १३१, **भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. ११९ (मैदान) मधील जागेत फुटबॉल मैदान तयार करणेबाबत.**

**धृवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मिरा भाईंदरच्या विकासामध्ये आपण आणखीन एक भर टाकली. खेळाडूंसाठी एक चांगले फुटबॉल मैदान तयार करणेचा विषय आपण महासभेमध्ये आणला. त्याबद्दल आपले खुप खुप अभिनंदन. स्पोर्ट कॉम्पलेक्सच्या बाजूला जी ओपन जागा आहे. त्या ओपन जागेमध्ये आपण फुटबॉलपटूंसाठी एक चांगले फुटबॉल मैदान तयार करत आहोत आणि हा जो विचार आणला त्याबद्दल आपले खुप खुप हार्दिक अभिनंदन. ठरावाचे वाचन करतो. **मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र .119 मैदानासाठी राखीव असुन सदर जागेत अनुज्ञेय क्षेत्रात क्रिडा संकुलनाची इमारत बांधुन क्रिडा संकुल सुरु करण्यात आलेले आहे . सदर जागेचे एकुण क्षेत्र 16800 चौ.मीटर असुन त्यापैकी 14922.98 चौ.मीटर क्षे त्र महानगरपालिकेकडे हस्तांतर झालेले आहे . सदर क्रिडा संकुलना व्यतिरिक्त जागेत फुटबॉल मैदान बांधण्याची खेळाडूंनी मागणी केलेली आहे . तथापि, सदर फुटबॉल कोर्ट बांधणे व संचलन करणेस बी .ओ.टी तत्वावर दिल्यास महानगरपालिकेच्या निधीची बचत होऊन आरक्षण विकसित होवून शहरातील फुटबॉल पटूंना चांगले सुसज्ज मैदान उपलब्ध होईल.**

**तरी सदर कामासाठी निविदा प्रक्रीया करण्यास मान्यता देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**अश्विन कासोदरीया :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर.

**मा. उपमहापौर :-**

यासंदर्भात आणखीन एक आपल्याला काही सभागृहासमोर माहिती आणु इच्छितो की, रिझर्व्हेशन नंबर २९९, ३०१ रिझर्व्हेशन नं.२५५ रिझर्व्हेशन नं. १६९ ह्या सर्व रिझर्व्हेशनची कामे सामाजिक वनिकरणातुन आणि खेळाच्या मैदानातून जॉगिंग ट्रॅकच्या माध्यमातून सुरु आहेत. मला सांगताना गर्व वाटत आहे की, रिझर्व्हेशन नं. ३०१ आणि २५५ एक १८ नंबरमध्ये आणि एक १३ नंबरमध्ये आहे. हे येणा-या ८ दिवसात आपण लोकार्पण करणार आहोत. ही माहिती एवढ्यासाठी की, काही मॅसेज व्हायरल होत आहे की मैदाने ताब्यात घेणार आहोत. आणि एकाच वेळेला ४८३ रिझर्व्हेशन ताब्यात घेणेसाठी आपण हूळदंग माजवत राहिलो तर ह्या महापालिकेत असलेल्या गोष्टीला ५ वर्षाचा बजेट फक्त ह्या मैदाने किंवा रिझर्व्हेशनला विकासासाठी लागणार आहे. दरवर्षी आपण आपल्या ठरल्याप्रमाणे आपली एक विशिष्ठ रक्कम ठरते त्या रक्कमेमधून ही मॅक्झीमम गार्डन आणि विशेष निधी वापरुन रिझर्व्हेशन नं. ३००,३०१,२५५,१६९ मध्ये आपण २५-२५ लाखाचा अतिरिक्त निधी दिलेला आहे.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब हे आपण मैदान डेव्हलप करतो कोणासाठी? आज आपण खेळाचे मैदान फुटबॉल ग्राऊंड बी.ओ.टी. वर देत आहोत. म्हणजे उद्या बी.ओ.टी. वर दिल्यानंतर तो आपले रेट तिथे लावणार. त्यामध्ये गरीब मुले खेळू शकणार नाहीत. आज जे स्पोर्ट कॉम्पलेक्सची जी हालत झालेली आहे. १०-१०, १५-१५ हजार रुपये सिविंगसाठी भरावे लागतात. सामान्य माणूस तिथे जाऊ शकत नाही. महापालिकेच्या लोकांचा, राज्यसरकारचा, केंद्रसरकारचा ज्यावेळी पैसा लागतो त्यावेळी तिथे अपेक्षा ही असते की, शहरातील जे गरिबांत गरिब जी मुले आहेत. ज्यांना त्याचा उपभोग घेता यावा आणि आज आपण सर्व खेळाचे मैदान बी.ओ.टी. वर म्हणजे ही मालकी कोणाची तरी दुस-याची तो आपल्या हिशोबाने चालवणार आज स्पोर्ट कॉम्पलेक्समध्ये बघा. मेन रोडला त्याने हॉटेल काढलेले आहे. ती परमिशन पण नाही. तिथे कॅन्टींगची परमिशन होती. फुलफीलमध्ये जाऊन मेन रोडला हॉटेल काढलेले आहे आणि तो क्लब तो फाईव्ह स्टार क्लब स्पोर्टस क्लब झालेला आहे. सामान्य माणसाला त्याचा उपभोगच घेता येणार नाही. मग आपण आज नक्की काय करत आहोत.

**मा. आयुक्त :-**

याचे तुम्ही दर पण निश्चित करुन द्या ना. गरिबांना काय दर असावेत. काय नाही सगळ्या चर्चा होऊन त्याच्यावर चांगला प्रस्ताव आपल्याकडे फुटबॉलचे ग्राऊंड नाहीत. आपण फुटबॉल ग्राऊंड मेन्टेन केले तर टिकणार नाही. आपण त्यांना ग्राऊंड मालकी देत नाही.

**अनिल सावंत :-**

साहेब बी.ओ.टी. वर दिले म्हणजे तो मालकच झाला.

**मा. आयुक्त :-**

जागेची मालकी नाही.

**मा. आयुक्त :-**

आपण मॅक्सेस मॉल बी.ओ.टी वर दिला त्याचे ग्राऊंड याला सुप्रिम कोर्टापर्यंत जाऊन आले. शिवार गार्डनचे काय झाले, वर्धमान फॅन्टासी. आज तो लाखो करोडो रुपये कमवतो. पालिकेला एक पैसा मिळत नाही. आणि त्या ठिकाणी लोकांना जॉगिंगला जायचे असेल तर त्याठिकाणी फी भरावी लागते. तो जॉगिंग करु शकत नाही. शिवार गार्डनची अशी परिस्थिती आहे.

**दिपक खांबित :-**

साहेब ११९ चे जे रिझर्व्हेशन आहे. त्याच्यामध्ये १५ टक्के जागेत आपण स्पोर्टस कॉम्पलेक्स बांधकाम सुरु केलेले आहे. त्याच्या पाठीमागे ही जागा आहे. ती महत्वाची जागा आपल्या ताब्यात आलेली आहे. त्याच्यामध्ये आपले फुटबॉल ग्राऊंड करायचे आहे. फुटबॉल ग्राऊंड हे कार्पोरेशनने करणे त्यावर खर्च करणे आणि मेन्टेन करणे हे कार्पोरेशन असे म्हणत नाही.

**जुबेर इनामदार :-**

साहेब हे ग्राऊंड टर्फ करत आहात की फुटबॉल ग्राऊंड करत आहात.

**दिपक खांबित :-**

फुटबॉल ग्राऊंड.

**जुबेर इनामदार :-**

फुटबॉल ग्राऊंड करायला तुम्हाला कोणाची गरज काय दोन्ही बाजूला एक मैदान करायचे आहे आणि दोन बाजूला गोल गोल पोस्ट.

**जुबेर इनामदार :-**

साहेब मी फुटबॉल प्लेअर आहे. मला सांगा मी देतो निःशुल्क.

**मा. आयुक्त :-**

टेंडर भरा तुमच्या संस्थेला भरायला सांगा. आपली मान्यता झाल्यानंतर आपण त्याचे टेंडर काढले जाईल.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय मला एक सांगा. याच्यामध्ये टेंडर आणि ठेकेदाराची गरज काय पालिका दोन गोल पोस्ट उभे करु शकत नाही.

**दिपक खांबित :-**

गोल पोस्ट करायला पूर्ण कम्पाऊंड करायचे माती भराव करायचे...............

(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, फुटबॉल ग्राऊंड म्हणजे फक्त दोन गोल पोल उभे केले आणि खेळले असे नाही. त्याच्यामध्ये बसण्याची पण व्यवस्था केली पाहिजे. फुटबॉल पटूंसाठी सुध्दा तिथे त्यांची व्यवस्था केली पाहिजे आणि आज आपण सुभाषचंद्र बोस मैदान आपण जे बघतो त्या मैदानाच्या रंगरंगोटीसाठी गार्डनसाठी, लॅन्ड स्किपींगसाठी आपण किती खर्च करत आहोत आणि फुटबॉल ग्राऊंड जे आहे फक्त ओपन आहे. त्याच्यात त्याला मेन्टनन्स पण करावे लागेल आणि आपण हे बी.ओ.टी. वर अशासाठी देत आहोत की हे सांगतात आमचे मित्र अनिल सावंतजी यांनी सांगितले की स्पोर्टस कॉम्पलेक्समध्ये सिव्हींगसाठी १०-१०, १५-१५ हजार साहेब चुकीची गोष्ट आहे. महापालिकेने जे रेट फिक्स केलेले आहेत त्याच रेटप्रमाणे ती व्यक्ती तिथे घेते आणि जर ती जास्त पैसे घेत असेल तर इमिजेटली त्याच्यावरती कारवाई केली पाहिजे आणि दुसरी गोष्ट त्यांनी जी कॅन्टींग उभारलेली आहे...........

**जयंतीलाल पाटील :-**

धृवकिशोर पाटील साहेब इंटरनॅशनल ग्राऊंड बनवत आहेत का?

**धृवकिशोर पाटील :-**

ती कॅन्टींग त्यांनी अप्रतिम केलेली आहे. त्याची जागा त्याने उपलब्ध केलेली आहे. जे आपल्या महापालिकेचे ॲग्रीमेंट झालेले आहे आणि ॲग्रीमेंटच्या व्यतिरिक्त काम जर होत असेल तर साहेब ते काम प्रशासनाचे आहे. त्याचा आरोप महासभेमध्ये करुन बदनामीचा हे चुकीचे आहे. आणि जर हे होत असेल त्याचे वरती कारवाई केली पाहिजे. आणि आज जर फुटबॉलचे जे ग्राऊंड आपण बघत आहोत. आज तुम्ही जर वानखेडे आणि ब्रेबॉन स्टेडीयम तिकडे तुम्ही जा ते फुटबॉलचे ग्राऊंड व्यवस्थित केलेले आहे. साहेब आपल्याला त्याचप्रमाणे करायचे आहे. आणि ती निविदा प्रक्रिया झाल्यानंतर तो विषय सुध्दा महासभेमध्ये येणार आहे की त्याचे ग्राऊंडचे भाडे काय फिक्स करायचे आहे. त्यांचा रेट काय फिक्स करायचा आहे त्याचेनंतर.....

**जुबेर इनामदार :-**

जो फुटबॉल खेळतो त्याला विचारा. टी.व्हीमध्ये आपण सॉकर्स मध्ये बघताना ते ग्राऊंड आपल्याला हिरवेगार दिसते. तसे तो ग्राऊंड कधीच मेन्टेन होत नाही. त्याला ६ महिने तसेच सोडावे लागते. तेव्हा त्याच्यावर ते गवत येते. तिथे रोज खेळणारी मुले असतील तिथे कधी गवत उगवत नाही. प्लास्टिकचा कोट असतो.

**मा. आयुक्त :-**

हा धोरणात्मक जर महासभेने निर्णय घेतला हा ग्राऊंड फुटबॉल त्याचेसाठी डेव्हलप करायचे. मग याचा यु.आय काढला जाईल आणि वेगवेगळ्या ऑपरेटरकडून त्याच्यांकडून तो कन्सेप्ट मागविला जाईल आणि त्याला किती खर्च करणार त्याचे दर काय असावेत आणि ते महापालिकेसमोर परत ठेवले जाईल. आणि तुमच्या संस्थेने जर भाग घेऊन त्याचा कन्सेशन प्लान दिला आणि त्यांची इन्व्हेस्टमेंट दिली आणि त्याचे दर दिले मग त्याचेवर तुम्ही निर्णय घ्या. द्यायचे किंवा नाही द्यायचे.

**अनिल सावंत :-**

साहेब त्याच्यात शहरातील मुलांना फ्रीमध्ये तिथे खेळायला मिळणार आहे की नाही?

**मा. आयुक्त :-**

तुम्ही ठरवू शकता ना.

**मा. उपमहापौर :-**

महासभेने निर्णय घेतला तर पुढे होईल.

**अनिल सावंत :-**

साहेब आता तुम्ही बी.ओ.टी. वर देत आहात. तुमची मेजोरीटी आहे महासभा म्हणजे तुम्हीच निर्णय घेणार आहत.

**मा. उपमहापौर :-**

ह्या शहरामध्ये फुटबॉल खेळणाऱ्या खेळाडूंची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. फुटबॉल ग्राऊंड बनू नये ह्या मताचे नाही. नसलेली वास्तु ह्या शहरात जर येत असेल तर सुरुवातीला त्याची अडवणूक करु नका. आपण चांगले चांगले करण्याचा नक्की प्रयत्न करु. आणि तुमच्या वेळोवेळी ज्या सुचना येतील त्यांचा आदर केला जाईल. कारण हे फुटबॉलचे ग्राऊंड सर्व शहरवासियांसाठी असेल.

**अनिल सावंत :-**

तुम्ही बी.ओ.टी. शब्द काढून टाका. महापालिकेने डेव्हलप करावे. आमचे समर्थन आहे.

**मा. उपमहापौर :-**

शहराच्या हितामध्ये आम्ही कुठलाही निर्णय घेत नाही. तुम्हाला प्रत्येक विषयात विरोधात बोलले पाहिजे. ही भुमिका आहे तुम्हाला ठराव मांडायचा असेल ठराव मांडा. तुमचे मत ठेवा. परंतु ह्या ठरावामध्ये बी.ओ.टी. शब्द वगळला जाणार नाही.

**अनिल सावंत :-**

आम्ही नकार करत नाही. हे तुम्ही बी.ओ.टी वर देत आहात याची मालकी दुसऱ्याला देत आहात.

**मा. उपमहापौर :-**

मालकी होणार नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

ग्राऊंड तयार आहे आणि लगेच दिले अशातला भाग नाही. हे तयार करायला किती वेळ लागेल आणि हे आपल्या ताब्यातले रिझर्व्हेशन आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

आपल्या ताब्यात आलेली जागा दुसऱ्याकडे कशाला देता. आपल्या पालिकेच्या माध्यमातून करा ना.

**मा. उपमहापौर :-**

होणार निविदा तुम्ही ही भरा. एखाद्या संस्थेने भरली तर त्यालाही नाकारणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय आपण दिलेला गोषवारा आहे. फुटबॉल मैदान बांधणे याचा अर्थ काय? कुंपणभिंत घालणे.

**मा. आयुक्त :-**

याच्यात दोन गोष्टी आहेत जे ग्राऊंड आहे ते ग्राऊंड फुटबॉल खेळासाठी ऑपरेटमध्ये आणण्याचे कन्सेप्ट आहे. प्रोव्हाईडेड दोन बाबी आहेत. तुम्ही म्हणणे सारखे काही शॉर्ट कालावधीसाठी थर्ड पार्टी ऑपरेटर नेमून तिथे फॅसिलिटी डेव्हलप करता येते किंवा महापालिकेतर्फे करता येते. तर आमची अपेक्षा ही आहे की पहिला करणेसाठी मान्यता असावी. आणि त्याची निविदा काढून एकतर महापालिका खर्च करुन करायचा निर्णय झाला तर महापालिका करेल किंवा थर्ड पार्टी कडून आपण घेऊ.

**जुबेर इनामदार :-**

ठराव बी.ओ.टी वर झालेला आहे. बील आपल्याकडून द्यायचे आहे.

**मा. उपमहापौर :-**

आमच्या सभागृहाचा अधिकार आहे. सभागृहाने ठराव मांडलेला आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

आपण ज्या गोषवाऱ्यामध्ये नमुद केलेले आहे. त्याच्यामध्ये आपण सरळ म्हटलेले आहे. क्रिडा संकुल व्यतिरिक्त जागेत फुटबॉल मैदान बांधण्याची मागणी आहे. तथा सदर फुटबॉल कोर्ट बांधणे व संचालनाचे काम निविदा पध्दतीने खाजगी संस्थेस दिल्यास महापालिकेच्या निधीची बचत होऊन आरक्षण विकसित होणार आहे.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यामध्ये आपला निधी वाचेल.

**जुबेर इनामदार :-**

साहेब तो निधी लावल्यानंतर तो निशुल्क देणार आहे का वापरायला?

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

साहेब त्या जागेवर तुम्ही पाहणी केली का. पाहणी केली तर तिथे काय आहे? फक्त मातीचा भराव आहे. ओबडधोबड आहे. मग तिथे आपल्याला पालिकेला किती खर्च येणार आहे. पालिकेने केले तर काय फरक पडणार आहे?

**मा. आयुक्त :-**

परत त्याचे मेन्टेन करणे, त्याचे............

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

पहिला आपण पालिकेच्या माध्यमातून तयार करत होतो.

**मा. उपमहापौर :-**

ते पालिकेतर्फे काम होणार नाही. आपल्या अपेक्षित मिसगाईड ठेवणार नाही.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

साहेब ५-५ करोडो रुपयाचे वायफर टेंडर आहेत. तिथे तुम्ही पैसे टाकता. याला ठिक करायला आपण.......

**मा. उपमहापौर :-**

तुमची भावना आम्ही समजू शकतो. परंतु सभागृहामध्ये जबाबदारीने हा ठराव आम्ही मांडलेला आहे. आम्ही कुठचेही यांच्याने ठराव मांडलेला नाही. आम्ही आमचा ठराव जबाबदारीने मांडलेला आहे आणि तुम्हाला जर त्याव्यतिरिक्त ठराव असेल तर तुमचे म्हणणे मांडण्याचा तुम्हाला अधिकार आहे. ह्या ठरावात आम्ही बदल करत नाही.

**अनिल सावंत :-**

साहेब हे आरक्षण ताब्यात घेतेवेळी मातीभराव आणि कुंपणभिंतचे पैसे आपण विकासकाजवळून ऑलरेडी घेतलेले आहेत. मग ते मातीभराव आणि कुंपणभिंत का बनवली मग ते पैसे डायव्हर्ट करायचे.

**मा. उपमहापौर :-**

मला वाटते सभागृहामध्ये दुसरा ठराव नाही.

**अनिल सावंत :-**

ठराव आहे.

**मा. उपमहापौर :-**

मग मांडा ना.

**अनिल सावंत :-**

साहेब असे नाही. तुम्ही बोलता काय आणि करता दुसरं.

**जुबेर इनामदार :-**

हा विषय सभागृहामध्ये ह्याच्यावर चर्चा करुन लोकांच्या समोर आणावे लागेल ना. खरी परिस्थिती काय आहे.

**मा. उपमहापौर :-**

आम्ही याच्यावर काहीच केले नाही की याच्यावरती चर्चा घडवायची याच्यावर निर्णयाप्रत ही महासभा आलेली आहे आणि हे पहिल्यांदा ह्या मिरा भाईंदरचे पहिले फुटबॉल ग्राऊंड महापालिकेच्या माध्यमातून ह्या शहरातल्या खेळाडूंसाठी विकसित होणेचा निर्णय होत आहे.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

याच्यात ठेकेदार कशाला पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

प्रत्येक विषयामध्ये निविदा प्रत्येक विषयामध्ये ठेकेदार याच्यात कोणाचा वेस्टेज इंट्रेस्ट आहे.

**मा. उपमहापौर :-**

याच्यामध्ये कुठचाही वाईट हेतु नाही.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

असा ठराव करा की, निशुल्क ह्या शहराच्या मुलांना तिथे खेळता येईल असा ठराव करा. ठेकेदार फुकट देणार आहे का तो शुल्क आकारणार नाही का खेळाडूंकडून खेळण्यासाठी सुध्दा पैसे भरायचे. तशा प्रायव्हेट सपोर्ट भरपूर आहेत या शहरामध्ये.

**दिप्ती भट :-**

महापौर मॅडम, आयुक्त साहेब आपल्या परवानगीने बोलते, गेल्या वर्षी माझ्या नगरसेवक निधीमधून मी टफ बनविलेले आहे. फुटबॉल टप बनविलेले आहे. सेक्टर नं. २ मध्ये ही परिस्थिती झाली की जे मी टफ बनविलेले तिकडे कोणी सांभाळायला घेतले नाही आणि ते टफ तोडून टाकले. म्हणून मी आता पर ते टफ मुलांना खेळण्यासाठी माझ्या प्रभाग निधीमधून परत बनविले. आपल्याला विनंती आहे की जे टफ बनविलेले आहे त्याला भाडे कमी आहे. पण जी मुले स्टेट लेव्हलला कारण तुमचे जे क्लब आहेत ते लांब आहेत. तर २५ रु., ३० रुपये रोजचे खर्च करुन आमची मुले तिथे जाऊ शकत नाही. तर आमच्या मुलांना एक क्रिकेटचे आणि एक टफ दोन्ही बनविलेले आहेत. तर आपल्याला विनंती आहे की ते कमी रेटवरती महापालिकेने देण्यात यावे.

**मा. आयुक्त :-**

आम्ही ते मान्य केलेले आहे.

**दिप्ती भट :-**

मानलेले आहे साहेब तर ते याच्यात माझे घेण्यात यावे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**मा. आयुक्त :-**

ते ऑलरेडी मंजूर केलेले आहे.

**दिप्ती भट :-**

साहेब वॉचमन, सिक्युरीटी एवढी लापरवाह आहे. जरा पण लक्ष ठेवत नाही.

**मा. आयुक्त :-**

शहरामध्ये खेळाचे ॲकेडमी झाल्या पाहिजे, कुस्ती आहे, कब्बडी आहे, फुटबॉल आहे, क्रिकेट आहे. लोकांना याचे फॅसिलिटी भेटल्या पाहिजे.

**जयंतीलाल पाटील :-**

सर्वप्रथम तुम्हाला माझे अभिनंदन. हा विषय सर्वांच्या वतीने मंजूर होऊ शकतो. पण बी.ओ.टी हा शब्द काढला तर चांगले आहे. जर तुमच्याकडे निधी नसेल तर आमचे ४ नगरसेवक आहेत.

**मा. उपमहापौर :-**

तुमची सहकारी नगरसेविका काय बोलली माहिती आहे का त्यांच्यासाठी त्यांच्या वॉर्डमध्ये जे टफचे ग्राऊंड बनविलेले आहे. ते पूर्ण मोडकळीस आलेले आहे. तुटलेले आहे. जर महापालिकेने ते ताब्यात ठेवले असते तर ते आपल्याला मेन्टेन करता येणार नाही.

**गिता जैन :-**

वैती साहेब ते सांगायची गर्व करायची गोष्ट नाही. जर आपली महापालिका तेवढी सक्षम नाही तर सगळे टेंडर रद्द करुन टाका.

**अनिल सावंत :-**

सर्वांकडे ठेकेदाराला ठेवा.

**मा.** उपमहापौर :-

ह्या शहरासाठीच निर्णय होत आहे याची जाणीव तुम्ही ठेवा. शहराच्या हितामध्ये आम्ही निर्णय घेणार नाही.

**अनिल सावंत :-**

तुमचा निर्णय शहराच्या हितामध्ये नक्कीच नाही.

**जयंतीलाल पाटील :-**

हे जेव्हा फुटबॉलचे ग्राऊंड करत आहेत कशासाठी करत आहोत. आपल्या शहरातला मुलगा नितीन म्हात्रे हा बाहेर देशामध्ये जाऊन तिरंगा दोन वेळा फडकविलेला आहे. त्या व्यक्तीला आपण काय देऊ शकलो? ना नोकरी देऊ शकलो ना मानधन देऊ शकलो. मग अशा मुलांसाठी तुम्ही काही करु शकत नाही. तर ग्राऊंड करायची तुम्हाला गरज काय?

**मा. महापौर :-**

ते विद्यार्थीसाठी आहे असे बोलू नका. त्यांच्यासाठी ३० हजार निधी आहे.

**जयंतीलाल पाटील :-**

मॅडम तुम्हाला फुटबॉलचे ग्राऊंड जर करायचे असेल तर माझा २५ लाखाचा निधी मी द्यायला तयार आहे. आमचे चारही नगरसेवक द्यायला तयार आहेत. परंतु बी.ओ.टी. ला देऊ नका. आजपर्यंत मिरा भाईंदरचे बी.ओ.टी. ने पूर्ण आपला मिरा भाईंदरला पोखरलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

एक खाजगी संस्था म्हणजे ठेकेदार माझा गोषवाऱ्यात अपेक्षित नाही. माझ्या मताने खाजगी संस्था म्हणजे ह्या शहरात आता मी एका कुस्ती ॲकेडमीला गेलेलो उत्कृष्ठरित्या तिथे कुस्तीचे कार्यपालन होते. आपल्या सुभाषचंद्र बोस मैदानाच्या बाजूला तशा प्रकारची शहरातली एखादी फुटबॉलची संस्था असेल किंवा मोठी संघटना असेल तर त्याने हे चालवू शकतो आणि तुम्हाला जे अपेक्षित आहे. काही खेळाडूंना निशुल्क पाहिजे तर त्याचे आपण धोरण निश्चित केले पाहिजे. सविस्तर मोठा आणि कशा पध्दतीने संस्था मिरा भाईंदर वासियांची जी विद्यार्थ्यांसाठी काम करते त्या संस्थेला आपण हे देऊ शकतो.

**जयंतीलाल पाटील :-**

आयुक्त साहेब एक असे काम करुन जा की तुम्हाला स्वतःला अभिमान वाटेल. त्यांनी चांगले काम करुन गेलेले आहेत. सत्ताधारी काय करतात याच्यावर जाऊ नका.

**सुरेश खंडेलवाल :-**

आयुक्तांनी चांगले काम केलेले आहे. तुम्ही आयुक्तांवर असे का आरोप करत आहेत. शहरासाठी एवढे चांगले काम करत आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

आप ठराव के माध्यम से ृमांडीए काका आप बोलिए।

**सुरेश खंडेलवाल :-**

मॅडम उनको बोलने का अवसर दिजीए लेकिन ऐसा नही है की माईक उठाए कुछ भी बोलना चालू कर दिया। हम महासभा में इसके लिए नही आए है। सबको सुनने के लिए।

**गिता जैन :-**

खंडेलवालजी आप क्या कर रहे है माईक उठाया और कुछ भी बोलना चालू किया।

**सुरेश खंडेलवाल :-**

मॅडम ऐसा है की, मैंने निवेदन किया है की, आप पुछके १-१ जन को बोलने के लिए दिजीए। लेकिन ऐसा नही कुछ भी उठाया और कुछ भी बोल रहे हो। विषय पे आप बोलो ना।

**मा. महापौर :-**

ठिक है काका आप अपना मत मांडीए बाकी सर्व सदस्य खाली बसा.

**रोहिदास पाटील :-**

महापौर मॅडम, आपण एकदा महासभेमध्ये विषय काढला होता. ह्या महापालिकेचे नक्की धोरण तरी काय प्रशासन काय करते. परत त्याने त्याची ऐवत काढलेली आहे. जेसलपार्क चौपाटी, धारावी मंदिर हे काय आहे. आम्ही लोकांमध्ये आहोत साहेब. आम्ही लोकांच्यामध्ये लोक आम्हाला प्रश्न विचारतात.

**मा. महापौर :-**

काका तुमचा कोणता विषय आहे.

**रोहिदास पाटील :-**

किती रुपयाचे उत्पन्न.

**मा. आयुक्त :-**

काका आपल्याशी चर्चा झाल्यानंतरच ही जाहिरात काढली. त्याची तुम्ही गैरअर्थ काढतात. आता ज्या लोकांकडे कार्यान्वित आहे त्यांनी अर्ज करायचे आणि त्या संस्थेचे अर्ज आम्ही स्टॅन्डिंगला देऊन त्याच्या ताब्यात देणार आहोत.

**रोहिदास पाटील :-**

म्हणजे पैसे देणार तुम्ही?

**मा. आयुक्त :-**

हो त्याच्यात काही बाजारीकरण किंवा महापालिकेला फायदा व्हावा हा उद्देश नाही.

**रोहिदास पाटील :-**

मग तुम्हाला काय करायचे आहे?

**मा. आयुक्त :-**

आता ज्या संस्थेकडे आहे धारावी मंदिर कुस्ती आखाडा आहे. त्यांनी ते अर्ज देऊन ते स्टॅन्डिंगला आम्ही सबमिट करणार.

**रोहिदास पाटील :-**

म्हणजे आम्ही अर्ज दिलेच नव्हते. आमचे ॲग्रीमेंट अजून ३-३ वर्ष.................

**मा. आयुक्त :-**

हे प्रोसेसने केले पाहिजे. ऑडीट काय म्हणते शेवटी पब्लीसिटी केली होती का याचे अर्ज घेतले होते का? असे पॅरे निघु नये म्हणून हे प्रोसेस आहे.

**रोहिदास पाटील :-**

मग त्यातुन आम्हाला वगळायला पाहिजे ना. खांबित साहेब तुम्ही निट माहिती द्या. त्याचे ॲग्रीमेंट अजून ३ वर्ष.................

**मा. आयुक्त :-**

विदाऊट पब्लीसिटी एका संस्थेला दिले तर त्याला शासनाची विशेष मान्यता पाहिजे. तर जे धोरण कायद्यात आहे त्याचे कार्यपालन करुन त्या संस्थेला द्यायला पाहिजे.

**गिता जैन :-**

त्याचे ॲग्रीमेंट अजून जिवंत आहे.

**प्रविण पाटील :-**

ॲग्रीमेंट ५-५ वर्षाचे बंद असताना ३ वर्षाच्या आतमध्ये तुम्ही रद्द कसे करणार.

**दिपक खांबित :-**

ते ॲग्रीमेंट कधीच रद्द केलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

पैसे परत दिले?

**दिपक खांबित :-**

परत तुम्हाला मिळतील.

**रोहिदास पाटील :-**

असे होते का.

(सभागृहात गोंधळ)

**रोहिदास पाटील :-**

आयुक्त साहेब कार्यकारी अभियंताच्या अकलेवर जर महापालिका चालेल तर हे दुर्दैव आहे. असे होऊ शकत नाही. नियम तुम्हाला माहित आहेत. नियम आम्हाला पण माहित आहे ना.

(सभागृहात गोंधळ)

**दिपक खांबित :-**

पहिल्यांदा आपण ही स्किम दिली होती याच्यामध्ये चालु बाजार भावापेक्षा जास्त देता येत नाही. त्यामुळे शासनाने ऑब्जेक्शन घेतल्यावर आपण रद्द केले साहेब आले साहेबांबरोबर मिटींग केली आणि असे ठरले की, ह्या ज्या वास्तु आहेत त्या फक्त देखभालीसाठी त्या संस्थेकडे हॅन्ड ओवर करायच्या भाड्यावर द्यायच्या नाही. त्याचा वाणिज्य वापर करायचा नाही.

**मा. आयुक्त :-**

त्या फ्री राहतील.

**रोहिदास पाटील :-**

त्याचा वाणिज्य वापर होतच नाही.

**मा. आयुक्त :-**

तेच आम्ही करत आहोत.

**दिपक खांबित :-**

तुमचे एक होत नाही बाकीचे सगळे होत आहे काका.

**रोहिदास पाटील :-**

आमचे ॲग्रीमेंट होते. आमची ५ वर्षाची डिपॉझिट घेतली. पूर्ण ५ वर्ष पैसे घेतले. त्या प्रक्रियेतून साहेब बाहेर ठेवायला पाहिजे होते. लोकांमध्ये मॅसेज काय जात आहेत. आज लोकांमध्ये असा मॅसेज जात आहे की हेतु पुरस्कर मी तुम्हाला सांगतो हे त्यामागे षडयंत्र आहे. आम्ही लोकांमध्ये तोंड दाखवू शकत नाही. असे प्रशासनाचे काम चाललेले आहे. अशा पध्दतीचे शडयंत्र आहे.

**मा. आयुक्त :-**

देखभाल वापरासाठी जाहिरात काढलेली आहे. कार्यान्वीत संस्थेने अर्ज करायला त्यांना काय दिक्कत आहे. त्यांच्या कार्यक्षमतेने अर्ज केले पाहिजे. आम्ही इतक्या वर्षापासून वापरतो आणि ह्या पध्दतीने वापरणार तसा तुम्ही अर्ज द्या.

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

प्रशासनाला कोणतीही वास्तु सोमोटो कोणाच्या ताब्यात देता येत नाही. ते ॲड केले पाहिजे. पब्लिसिटी दिली पाहिजे आणि ते अर्ज घेतले पाहिजे आणि त्याच्यावर निर्णय केला पाहिजे.

**प्रविण पाटील :-**

साहेब ज्यावेळी ५ वर्षापूर्वी ॲग्रीमेंट झाले.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही मागच्या गोष्टीला आक्षेप येत आहे. तेच तुम्हाला आम्ही सांगत आहोत.

**प्रविण पाटील :-**

ह्या गोष्टी केल्या होत्या आणि तुम्ही रेडी रेकनरच्या हिशोबानेच तो भाव ठरविला होता. ते ॲग्रीमेंट आता रद्द करत आहोत.

**धृवकिशोर पाटील :-**

त्याच्यात एकच ॲडिशन करा. तुम्ही जी तीन वर्ष काढली. त्या तीन वर्षाच्या ऐवजी कमीत कमी ५ ते ७ वर्ष करा.

**रोहिदास पाटील :-**

पुन्हा पुन्हा हा विषय चर्चेला येत आहे. कशासाठी येत आहे...............

**मा. आयुक्त :-**

शहरामध्ये चांगल्या संस्था वापर करत आहेत. त्यांना माझी विनंती राहील. त्यांनी अर्ज करावे आणि तो आलेला प्रस्ताव आम्ही स्टॅन्डिंगमध्ये पाठवतो.

(सभागृहात गोंधळ)

**रोहिदास पाटील :-**

३ च्या ऐवजी १० वर्षाचे करा.

**धृवकिशोर पाटील :-**

ठराव तसा करा. त्याच्यात दुरुस्ती करुन टाका.

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

रंगमंचाला भाडे कोण देणार? हा रंगमंच आहे. विधी शेड आहेत त्यांचे भाडे कोण देणार आहेत.

**धृवकिशोर पाटील :-**

भाडे नाही २५ टक्के डिपॉझिट आहे.

**दिपक खांबित :-**

भाड्याचा विषयच नाही.

**मा. उपमहापौर :-**

भाड्याचा विषय नाही. अत्यावश्यक बाबी आहेत. त्या भाड्यातुन वगळलेल्या आहेत. फक्त मेन्टेन करणेचा प्रस्ताव आहे.

(सभागृहात गोंधळ)

**वंदना पाटील :-**

साहेब त्या संस्थेला तुम्ही देणार आहात. त्याला फ्रीमध्ये संस्थेला चालवायला देणार आहेत का?

**मा. उपमहापौर :-**

विधी शेडसाठी कुठच्याही प्रकारचे भाडे आकारले जाणार नाही. तो काही करमणुकीचे साधन नाही.

**दिपक खांबित :-**

डिपॉझिट घेणार.

**प्रविण पाटील :-**

उपमहापौर साहेब काही गावामध्ये रंगमंच बांधलेले आहेत. आता एखाद्या संस्थेने भाड्याने घेतले. तुम्ही दिले नियमानुसार मग समजा खारी गावातला रंगमंच आहे, मिरा गावातला रंगमंच आहे. हे एका संस्थेने घेतले की आपल्याकडून आता भाडे घेणार का?

**मा. उपमहापौर :-**

याच्याआधी नाममात्र भाड्याने आपण घेत होतो. ज्या वेळेला तत्कालीन आयुक्त विक्रमकुमार साहेबांनी याच्यावरती म्हणजे त्याचा भुर्दंड मलाही भरावा लागला. एक व्यायाम शाळा जी मंडळाच्या नावाने होती त्यांना १८ हजार रुपये भाडे आले आणि त्या ४ वर्षाचे भाडे मी प्रत्येक वर्षाचे भाडे भरले. मग आम्ही सांगितले भाडे तरी कमी करा तर त्यांनी सांगितले ते शासकीय दराप्रमाणे आहे. परंतु इथे ज्या आवश्यक बाबी आहेत ज्या जनहिताच्या आहेत. आवश्यक बाबी म्हणजे आपल्या जीवन मरणाशी संबंधित आहेत. त्या ठिकाणी आपण भाडे आकारणार नाहीत.

**प्रविण पाटील :-**

आयुक्त साहेब हा विषय ज्या-ज्या वास्तु झालेल्या आहेत. त्यांचा तुम्ही खरोखर विचार करा. खरोखर कोणाला काहीही त्याचा विशेष असा फायदा होत नाही. याच्यापुढे याच्यातून काही उत्पन्न होते. अशातला भाग नाही. उगाच त्याच्यामध्ये काकाने सांगितल्याप्रमाणे समाजामध्ये वेगळा मॅसेज जात आहे. तुम्ही हा निर्णय घेतला त्याच्यावर परत फेरविचार करावा साहेब.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

महापौर मॅडम खारी गाव में रंगमंच है। उसको सिल किया हुआ था अभी तो वह खुला नही उसका क्या कारण?

**दिपक खांबित :-**

उसका भी तो ॲड आया है ना। उसका भी ॲप्लीकेशन १८ तारीख तक भरना है।

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

१८ तारीख तक?

**दिपक खांबित :-**

हा खाली ॲप्लीकेशन देना है और २५ हजार डिपॉझिट रखा है।

(सभागृहात गोंधळ)

**वंदना पाटील :-**

खारीगावचा रंगमंच आहे. तिथे वर्षाला एकदा नाटक होते. कोणाचे लग्न त्या पटांगणात होतात. ते भाड्याने कसे देणार.

**मा. उपमहापौर :-**

कमिशनर साहेब आपल्याला आजच्या मिटींगच्या माध्यमातून एक गोष्ट मी स्वयंस्पष्ट निर्दशनास आणू इच्छितो की, ह्या शहरातली जी १९ गावे आहेत. त्याच्यामध्ये बऱ्याच गावामध्ये त्या-त्या वेळेला यात्रा उत्सव करणेसाठी किंवा आपली कला जपण्यासाठी गावामध्ये नाटक नृत्य आदी कलाप्रकार सादर केले जायचे. त्याच्यासाठी हे ग्रामस्थांनी बांधलेले जे रंगमंच आहेत त्याला नंतर मग आपण काय केले. महापालिकेच्या माध्यमातून आपण फक्त त्याला एक शेड टाकली. दोन भिंती बांधल्या. त्याचा अर्थ त्याचा वापर कुठल्याही व्यवसायीक कारणासाठी होत नाही. तर वर्षातून एक ते दोन नाटके तिथे सादर केली जातात. अशा वास्तु त्यातून वगळण्यात याव्या. कारण गावांची संस्कृती जपण्याची आज ह्या जागा आहेत. त्याठिकाणी बाहेरचे कोणी येत नाही. असे नवघरला आहे, खारीगावला आहे, मिरागावात आहे, काशिगावात आहे.

**प्रविण पाटील :-**

उपमहापौर साहेब तुम्ही सांगितले ह्या वास्तु वगळण्यात याव्या. आयुक्तांनी त्याला मान्यता द्यावी अशा वास्तु वगळण्यात याव्या.

**मा. उपमहापौर :-**

आयुक्त साहेबांना विनंती करत आहे.

**प्रविण पाटील :-**

हे वगळता येतील का प्रशासनाने सांगावे.

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

महापालिकेच्या निधीतून झालेल्या वास्तु वगळता येतील का यांनी सांगितल्याप्रमाणे.

**दिपक खांबित :-**

वेळोवेळी वगळून त्याचा अर्थ..................

**मा. उपमहापौर :-**

आता अर्ज केलेले आहेत तो घ्या. आपण परत विषय घेऊ. आजच्या तारखेपर्यंत अर्ज भरा. डिपॉझिटची रक्कम जास्त असेल तर आयुक्त साहेब ती डिपॉझिट रक्कम अशा विशिष्ट ठिकाणी आपण कमी करावी.

**प्रविण पाटील :-**

करायचे असेल तर सर्वांना धोरण निश्चित करा. समाज मंदिर असो, व्यायाम शाळा असो किंवा नाटकाचे स्टेज असो सर्वप्रथम धोरण ठरवा.

**गिता जैन :-**

कमिशनर साहेब समजा एका संस्थेने २५ हजार डिपॉझिट भरली. तुम्ही त्यांना देखभाल दुरुस्ती दिली फक्त देखभाल दुरुस्ती म्हणजे कोणीही जाऊन तिथे काहीही कार्यक्रम करायचे असेल तर करु शकतो का? का त्या संस्थेची परवानगी लागणार?

**दिपक खांबित :-**

ते संस्थेच्या ताब्यात राहणार. संस्थेने लाईट बील, पाणी बील संस्थेने भरायचे आहे.

(सभागृहात गोंधळ)

**गिता जैन :-**

संस्था मागणी करणार. मला आज १० हजार द्या किंवा ५ हजार द्या.

**दिपक खांबित :-**

आम्ही त्याचा वाणिज्य वापर करत आहोत.

**गिता जैन :-**

वाणिज्य वापराची व्याख्या काय आहे? एखादे नाटक आले कमर्शियल आले आम्ही दाखविले की आमच्या कलेसाठी करत आहोत आणि त्याच्याकडून भाडे घेतले तर काय व्याख्या? तुम्ही मला सांगा आम्ही कलाच करतो. तिथे नाटकच करतो. पण कमर्शियल आणले ते तुम्ही आम्ही थोडी तुम्हाला दाखवणार आहोत. एखादी संस्था काय दाखवणार. कुठेतरी एक चांगले असे काही तयार करा यात मिसगाईड आहे. मी त्या बाबतीच्या अगेन्स्ट नाही. ते रंगमंच युज करावे.

**मा. महापौर :-**

आयुक्त साहेब विषय पुरा डायव्हर्ट हो रहा है। हम फुटबॉल के ग्राऊंड पर थे। तो फुटबॉल के ग्राऊंड का आपका ठराव होगा तो मांडीए अभी बहुत चर्चा हो गयी।

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम काकांची शंका होती.

**मा. महापौर :-**

काका आयुक्तांना भेटून त्यांची शंका दूर करतील. तुमचा ठराव असेल तर ठराव मांडावे.

**गिता जैन :-**

मॅडम में फुटबॉल के लिए तो कुछ अभी तक बोली ही नही।

**मा. महापौर :-**

आप खडे रहते हो लेकिन बोलते नही अभी बोलीए।

**गिता जैन :-**

आयुक्त साहेब फुटबॉल ग्राऊंडचे जे तुम्ही बी.ओ.टी वर सांगत आहेत. सभागृहाची भावना आहे. आणि त्यात फक्त माती भराव आणि माती भरावाचे तुम्ही कुंपणभिंत आणि मातीभरावाचे पैसे भरलेले आहेत. ज्यांनी जे रिझर्व्हेशन तुमच्या ताब्यात दिलेले आहे. मी का म्हणून एवढे बोलत आहे. कारण त्यातले एक रिझर्व्हेशन आम्ही हॅन्ड ओव्हर केलेले आहे. १२२ चे एक रिझर्व्हेशन आम्ही हॅन्ड ओव्हर केलेले आहे आम्ही माती भराव करुन दिलेला आहे. माझी विनंती राहणार बी.ओ.टी. काढून एखादे मैदान कारण आपण सुभाषचंद्र बोस आता आपण भाडे वाढविलेले आहे. ठाकरे मैदान भाडे वाढविलेले आहे.

**मा. आयुक्त :-**

महापालिकेने डेव्हलप करावे.

**गिता जैन :-**

महापालिकेने डेव्हलप करावे. साहेब ते मुर्धा गावात तसेही शेतकरी ओरडतात. तिथे माती भराव इललिगल झालेला आहे. ते सांगतात आमची माती उचला. उचला आणि इथे टाका. तुम्हाला माती फ्रीमध्ये

कुठून मिळणार मी सांगते. ते रोज पोलिस स्टेशनमध्ये फिर्याद करायला जातात. माती भराव इललिगल झालेला आहे. त्याच्यावर पेनल्टी लागलेली आहे. ती माती काढा इथे टाका भराव झाला आणि कुंपणभिंत नाही करु शकणार. तेवढी गरीब कार्पोरेशन नाही. आपण सी.सी. रोड करत आहोत. कुंपणभिंत काय मोठी गोष्ट आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. ११९ मैदानासाठी राचीव असून सर जागेत अनुज्ञेय क्षेत्रात क्रिडा संकुलनाची इमारत बांधून क्रिडा संकुल सुरु करण्यात आलेले आहे. सदर जागेचे एकूण क्षेत्र १६८०० चौ. मीटर असून त्यापैकी १४९२२.९८ चौ. मीटर क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतर झालेले आहे. सदर क्रिडा संकुलना व्यतिरिक्त जागेत फुटबॉल मैदान बांधण्याची मागणी आहे. तथापी सदर फुटबॉल फोर्ट महानगरपालिकेने विकसित करावे तसेच शहरातील खेळाडूंना निशुल्क उपलब्ध करुन द्यावे तसेच त्याचे देखरेख महानगरपालिकेच्या माध्यमातुनच करावे असा ठराव मांडत आहे.

**अनिल सावंत :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३१ करिता दोन ठराव आलेले आहेत. सुचक श्री. धृवकिशोर पाटील, अनुमोदन श्री. अश्विन कासोदरिया. दुसरा ठराव सुचक श्री. हरिश्चंद्र आमगावकर, अनुमोदन श्री. अनिल सावंत. प्रथम दुसरा ठराव मतदानास पुकारतो. सुचक श्री. हरिश्चंद्र आमगावकर ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहे. सुचक श्री. धृवकिशोर पाटील ह्यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. उपमहापौर :-**

सुचक श्री. धृवकिशोर पाटील यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४३, विरोधात १७, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. सुचक श्री. धृवकिशोर पाटील यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करणेत येत आहे.

**प्रकरण क्र. १३१ :-**

**भाईंदर (पूर्व) आरक्षण क्र. ११९ (मैदान) मधील जागेत फुटबॉल मैदान तयार करणेबाबत.**

**ठराव क्र. १२७ :-**

**मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र .119 मैदानासाठी राखीव असुन सदर जागेत अनुज्ञेय क्षेत्रात क्रिडा संकुलनाची इमारत बांधुन क्रिडा संकुल सुरु करण्यात आलेले आहे. सदर जागेचे एकुण क्षेत्र 16800 चौ.मीटर असुन त्यापैकी 14922.98 चौ.मीटर क्षेत्र महानगरपालिकेकडे हस्तांतर झालेले आहे. सदर क्रिडा संकुलना व्यतिरिक्त जागेत फुटबॉल मैदान बांधण्याची खेळाडूंनी मागणी केलेली आहे . तथापि, सदर फुटबॉल कोर्ट बांधणे व संचलन करणेस बी .ओ.टी तत्वावर दिल्यास महानगरपालिकेच्या निधीची बचत होऊन आरक्षण विकसित होवून शहरातील फुटबॉल पटूंना चांगले सुसज्ज मैदान उपलब्ध होईल.**

**तरी सदर कामासाठी निविदा प्रक्रीया करण्यास मान्यता देण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्री. धृवकिशोर पाटील** **अनुमोदक :- श्री. अश्विन कासोदरीया**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजु यशवंत | |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | |
| ३ | पाटील रोहिदास शंकर | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ४ | शिर्के अनंत गेणू | |
| ५ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ५ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ६ | सिंह मदन उदितनारायण | ६ | मेहरा राजीव ओमप्रकाश | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | भानुशाली वर्षा गिरधर | ७ | सावंत अनिल दिवाकर | निरंक |
| ८ | गोहिल शानू जोरावर सिंह | ८ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ९ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | ९ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| १० | पाटील वंदना मंगेश | १० | कदम अर्चना अरुण | |
| ११ | सोंस निला बर्नाड | ११ | पाटील धनेश परशुराम | |
| १२ | मोकाशी दिपाली आनंदराव | १२ | डिसा मर्लिन मर्विन | |
| १३ | अरोरा दीपिका पंकज | १३ | सपार उमा विश्वनाथ | |
| १४ | नाईक विविता विवेक | १४ | परदेशी गिता हरीश | |
| १५ | भावसार वंदना संजय | १५ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १६ | बेलानी हेमा राजेश | १६ | बांड्या एलायस दुमिंग | |
| १७ | भोईर विणा सुर्यकांत | १७ | जैन गीता भरत | |
| १८ | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| १९ | मुखर्जी अनिता बबलू | | | |
| २० | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | | | |
| २१ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| २२ | म्हात्रे परशुराम पद्माकर | | | |
| २३ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| २४ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| २५ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | | |
| २६ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| २७ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| २८ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| २९ | कांगणे मिना यशवंत | | | |
| ३० | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३१ | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ३२ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ३३ | थेराडे संजय अनंत | | | |
| ३४ | राय विजयकुमार सिस्थन नारायण | | | |
| ३५ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ३६ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ३७ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ३८ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ३९ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ४० | दुबे मनोज रामनारायण | | | |
| ४१ | व्यास रवि वासुदेव | | | |
| ४२ | खंडेलवाल सुरेश जगदीश | | | |
| ४३ | पारधी सुजाता यशवंत | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

सही/-

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३२, **मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेतील शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित भुखंड विकसित करणेबाबत.**

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम यह प्रकरण क्र. १३२ में चाहूँगा की प्रशासन इसके उपर जरा खुलासा करे। यह विषय क्या है यह विषय क्यों आया है।

**मा. महापौर :-**

शैक्षणिक प्रयोजनासाठी आरक्षित भुखंड.

**दिपक खांबित :-**

आपल्या मंजूर विकास योजनेमध्ये आरक्षण क्र. २६० जे आहे ते शाळेसाठी प्राथमिक शाळा व खेळाचे मैदानासाठी राखीव असून त्याचे एकुण क्षेत्र ४७०० स्क्वेअर मीटर आहे. त्यापैकी आमचा गोषवारा देईपर्यंत ३४०० स्क्वेअर मीटर ताब्यात आले होते आणि आजच्या डेटला प्रत्यक्ष जागा ती ५०७० म्हणजे १०७ टक्के जागा ती आपल्या ताब्यात आहे. आम्ही विषय आणलेला आहे की जी जागा डेव्हलप करण्याकरिता आपल्याकडे एवढे भुखंड आहेत की, हे आपल्याला ह्याची गरजच नाही. ते भुखंड मागे आपण एक प्रस्ताव दिला होता की शैक्षणिक धोरण ठरवून ते डिसकस करुया. पण ते झाले नाही म्हणून आता हा १६० टक्के भुखंड आपल्या ताब्यात आलेला आहे. त्याचा वापर नाही आहे. त्या भागात २-३ शाळा आपल्या आहेत. तर तो पूर्णतः डिसबस करणे करिता हा विषय आणलेला आहे. मार्केट रेटप्रमाणे.

**मा. उपमहापौर :-**

प्रविण पाटील साहेब प्रशासनाने आणलेला विषय आहे. आयुक्त साहेब आपल्याला एक संकल्पना देत आहेत. ते पहिले ऐकून घ्या. आणि आपल्याला हा ठराव करायचा नाही. कारण ते आपल्याला ठरवायचे आहे. परंतु त्यांनी एक नविन प्रपोझल सांगितले आहे. ते पहिला ऐकून घ्या.

**प्रविण पाटील :-**

खरोखर प्रपोजल चांगले आहे. मला फक्त एक माहिती द्या. ह्या जागेवर काही वाद आहेत का? न्यायालयीन काही वाद असतील तर त्यांची माहिती आम्हाला द्यावी.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर महोदय महापालिका अधिनियमामध्ये शासनाने आता विशेष दुरुस्ती केलेली आहे. आणि आपले जे आरक्षण आहेत ते विविध माध्यमातून विकसित करणेची एम.आर.टी.पी च्या अधिनियमात आणि शासनाच्या विविध सर्क्युलरमध्ये तरतूद आहे. आपल्याला ती कल्पना आहे. एक महापालिका विकसित करु शकते. आरक्षण ओनर असेल तर तो समायोजनाच्या घेण्याचा आरक्षणातून विकसित करु शकतो किंवा आपण टी.डी.आर देऊन ती जागा आपल्या ताब्यात घेऊ शकतो आणि नंतर आपण आपल्या अर्थसंकल्पाच्या तरतुदीतून ते विकसित करु शकतो. आता आपल्याकडे मोठ्या प्रमाणात शाळेचे भुखंड उपलब्ध आहेत. आपण मागे एक पॉलिसी केली होती की, ॲडमिशनचा रोशे ठरवून २५ टक्के बेनिफिट तर ते काय होते. भविष्य काळामध्ये त्याचे नियंत्रण करणे फार जिकरीचे होते. न्याय मिळतो की नाही हे क्लिष्ट होते. त्यापेक्षा जो रिझर्व्हेशन आहे त्या पर्पजसाठी डेव्हलप झाला त्याचा सगळ्या लोकांना बेनिफिट होऊ शकतो आणि शाळा ॲडमिशन आणि नियंत्रण त्याच्यासाठी एज्यूकेशन खात्याचे प्रचलित नियम आहेत. त्याच्यामध्ये ते अनुपालन होऊ शकते. तर ही वास्तू डेव्हलप करणेसाठी आपल्याला मोठ्या प्रमाणात निधी लागतो. स्टाफ लागतो ते चालविणे त्यापेक्षा पब्लीक मार्केटमधून जर ती वास्तू डेव्हलप करुन घेतली आणि त्यांना आपण त्यांच्याकडून ती शाळा चालू करून घेतली तर आपला उद्देश साध्य होऊ शकतो. आणि त्यासाठी परसन्टेज ॲडमिशन असे न ठेवता त्या संस्थेला इन्डीपेन्डन्ट राईट्स दिले पाहिजे आणि बाजार भावाचा जो प्लॉटचा भुखंडची किंमत असते ती संस्था महापालिकेला पैसे भरले पाहिजे आणि त्यांनी त्या ठिकाणी आरक्षणाच्या तरतुदीनुसार प्लान मंजूर करुन घेऊन ती शाळा बांधली पाहिजे. म्हणजे ओपन मार्केटमध्ये आणि ह्याच्यासाठी ह्या प्लॉटचा आर.आर बेस व्हॅल्यू बेस ठेऊन त्याची ऑक्शन काढले पाहिजे. ई-टेंडरींग जी संस्था पुढे येईल आणि आपण जसे सिडकोचे प्लान्ट घेऊन किंवा हे घेऊन जे विकसित करतो त्याच पध्दतीने ठाणेमध्ये सुध्दा हा प्रयोग करुन पाहिला आणि ॲक्टमध्ये आपल्याला तसे अधिकार दिलेले आहेत. कन्सेप्ट काय की, तिथे अतिक्रमण होऊ नये त्याचे परपज नागरिकांना भेटावा आणि चांगल्या पध्दतीने शहरातल्या इन्व्हेस्टला ही त्याच्यामध्ये भाग घेऊन बेनिफिट देता येतात. हा एक उदाहरण म्हणून आम्ही आपल्यासमोर आणलेले आहे. तर याच्यावर सभागृहाने विचार केला. आता ह्यामध्ये

जो मी प्रस्तावित केलेली जागा होती. प्रविण पाटील यांनी मुद्दा मांडल्याप्रमाणे श्रीम. तारा विनायक घरत यांनी माझ्याकडे अर्ज दिलेला आहे. त्यामध्ये काही कोर्ट मॅटर आहेत असे त्यांचे म्हणणे आहे. हे आम्ही तपासून घेतो आणि सगळी शहानिशा करुन तो प्लॉट १०० टक्के थर्ड पार्टीला देणेचा लायकीचा असेल त्याच वेळेस त्याची कारवाई केली जाईल. इंटरनल जे काही वाद असतील, कोर्टाचे स्टे असतील ह्या सगळ्या बाबींचा पूर्तता करुन कुठल्याही प्रकारची अडचण न येता हे कामकाज सुरु केले जाईल. हे तपासून घेतले जाईल. याच्यामध्ये स्टे आहे, ओनरशिपचा वाद आहे असा त्यांचा अर्ज आहे. तर संबंधित विधी शाखेतून आणि संबंधित न्यायालयातून याची खातरजमा करुन सगळ्या प्रकारची पूर्तता करुनच पूढची कारवाई केली जाईल.

**प्रविण पाटील :-**

आयुक्त साहेब खरतर तुमचा हा चांगला विषय आहे. मानस पण चांगला आहे. परंतु आमचा एकच विषय आहे की ज्या जागेवर आपण जे करणार आहोत ती जागा तपासून घ्या. आमच्या माहितीप्रमाणे तिथे स्टे आहे. एवढा मोठा तुम्ही विषय आणलेला आहे. तर तो चांगल्या जागेवर या त्या वादग्रस्त जागेवर नका घेऊ.

**मा. आयुक्त :-**

शहरामध्ये आपल्याला २५ मे २०१८ चे शासनाचे निर्णय आहेत. स्थावर मालमत्ता हस्तांतरण संदर्भात मार्गदर्शक सुचना मी सगळ्या सदस्यांना सर्क्युलेट करतो. म्हणजे अशा प्रकारचे निर्णय करण्याचे शासनाने धोरण घेतलेले आहे.

**दिनेश जैन :-**

आयुक्त साहेब आपण जे आता जे रेडी रेकनर प्रमाणे काढणार आहोत. जे शाळेचे आरक्षण तर ह्याच्यासाठी आपले मिरा भाईंदरचे जे स्कुल आहेत त्यांना त्याप्रमाणे आपण देणार आहोत की कोणाला पण देऊ शकतो. त्याच्यामध्ये कसे काय आहे.

**मा. आयुक्त :-**

ती चर्चा होऊन नव्याने प्रपोझल ठरवला पाहिजे. भाईंदर वासियांना द्यायचे की कुठल्या संस्थेला द्यायचा. शैक्षणिक संस्था धारकालाच द्यायचा हे आपण सगळ्यांनी खरतर हे ओपन मार्केट असले पाहिजे.

**गिता जैन :-**

कसे आहे की मला आज शाळा काढायची इच्छा झाली तर मी आज पण करु शकते. त्यासाठी शैक्षणिक संस्थेची काय गरज आहे.

**दिनेश जैन :-**

पहिले कसे होते की त्याला नॉलेज असले पाहिजे. त्या शाळेला इतकी वर्ष झाली पाहिजे नाहीतर कोणी पण आला..........

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

महापौर मॅडम ह्या जागेवर अतिक्रमण बांधकाम पण आहे.

**दिपक खांबित :-**

त्याठिकाणी आपले धोरण ठरलेले आहे.

**दिनेश जैन :-**

काय धोरण आहे.

**मा. आयुक्त :-**

प्रविण पाटील साहेबांनी सांगितल्याप्रमाणे ह्या अर्जाची दखल घेतलेली आहे. प्रशासनाकडून कामकाज केले नाही. मी पहिलाच सांगितले याच्याशिवाय आपले अजून खूप भूखंड आहेत. त्याच्यावर सुध्दा आपल्याला निर्णय घेता येईल.

**दिनेश जैन :-**

खांबित साहेब काय धोरण ठरविलेले आहे?

**दिपक खांबित :-**

२.०५.२०१८ च्या महासभेत ठराव क्र. १२ अन्वये आपण सगळी कार्यपध्दती ठरविलेली आहे. शैक्षणिक भुखंड कुठल्या प्रकारे आणि ते कोणाला द्यायचे आहे. शैक्षणिक संस्थांना.

**गिता जैन :-**

आयुक्त साहेब खुप छान असा हा निर्णय आहे. आय वेलकम इट. फक्त एक सूचना त्यात अशी द्यायची की आपल्या महापालिकेच्या ज्या शाळा आहेत ते ही बरीच अशी शैक्षणिक संस्था आहेत. हे सांगतात की आम्ही चालवू आणि त्यानंतरच्या अवर्समध्ये आम्हाला द्या. मला वाटते कुठेतरी आपण कमी

पडत आहोत. महापालिकेच्या शाळेत शिक्षक कमी आहेत किंवा काही कमी आहे तर त्यांना ही आपण असे काही धोरण ठरवा की त्या संस्थांनी ते ही शाळा चालवायची म्हणजे कसे आहे साहेब, आता बॉम्बेला हॉस्पीटलमध्ये पण तसे करतात चार तास ज्या ज्या हॉस्पीटलला अमूक सोनोग्राफीची अत्याधुनिक कमर्शियल वगैरे नाही ते ४ तासासाठी प्रायव्हेटला देतात आणि त्याच मशिनचा यूज बाकीच्या अवर्समध्ये........

**मा. आयुक्त :-**

आम्ही तपासून घेतो. शासनाचे काही धोरण असतील तशाप्रकारे काही निर्देश असतील तर मग त्याचा अभ्यास करुन विचार करता येईल.

**गिता जैन :-**

बरीच संस्था अशी रेडी आहे साहेब.

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम, आयुक्त साहेब हा जो प्रस्ताव आलेला आहे ६० टक्के ते ७ टक्के जागा ताब्यात आलेली आहे. ती आपण देऊ शकतो का?

**मा. आयुक्त :-**

६० टक्के, ७० टक्केची देऊ शकत नाही. १०० टक्के जागा ताब्यात आलेली आणि कुठलाही डिस्प्यूट नसलेली कोर्ट वगैरे क्लीअर प्लॉट असलेलाच आपण मार्केटला देऊ शकतो. नाहीतर आपला कोणी येणारच नाही.

**अनिल सावंत :-**

आता त्यानंतर मगाशी निविदेत आपण म्हटले की आता जो ठराव सांगितला तो ठराव ह्या शहराच्या हितामध्ये नव्हता आणि त्याच्यामध्ये तो इम्पलीमेंट होऊ शकत नाही.

**मा. आयुक्त :-**

त्याच्यात गैरसमज नको.

**अनिल सावंत :-**

म्हणजे ते इम्पलीमेंट होऊ शकतात.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही केलेले धोरण खुपच चांगले आहे. पण त्यामध्ये आपला प्लॉट एका संस्थेला द्यायचा आणि त्या संस्थेवर लायबलिटी ठेवायची की त्यांनी २५ टक्के ॲडमिशन आपल्या शिफारशीने द्यावेत आणि ते कामकाज आपण पूर्ण त्याचे तपासत राहणे. करत राहणे ही आपली जबाबदारी होऊन बसते आणि ते नियंत्रण करणेसाठी आपल्याकडे तेवढी कार्यप्रणाली सेट करता येणार नाही. त्यापेक्षा त्यालाही इंडीपेन्डन्सी राहिली २५ टक्के ॲडमिशन आपण पुन्हा कायद्यात ठेवणार उद्या शिक्षण खात्याचे जी.आर बदलले आणि ते अधिकार आपले गेले तर आपला प्लॉट त्यांच्या ताब्यात असाच जाईल. म्हणून म्हणतो की आपण मार्केट कॉस्टली ते जागा दिली पाहिजे.

**अनिल सावंत :-**

त्यावेळी साहेब आम्ही तेच सांगत होतो. त्या ठरावाच्या वेळीचे प्रोसेडिंग काढून बघा. आम्ही सुध्दा तेच सांगत होतो. तरी सुध्दा बहुमताचा ज्यावेळी तो ठराव केला............

**मा. आयुक्त :-**

लोकशाहीची हीच बाब आहे. तशी आपण एवढी चर्चा करुन चांगल्या निर्णयाला येणे संबंधित झालेल्या धोरणाच्या अनुषंगाने याला पृष्टी देऊन एक उदाहरण आपण दिले तर चांगले होईल.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय आपले लक्ष वेधू इच्छितो माझी आपल्याला एक विनंती आहे हा विषय तुम्ही आणलेला आहे.

**नयना म्हात्रे :-**

आयुक्त साहेब २०१७ ला इलेक्शन झाले त्यापासून ही महापालिका प्रशिक्षणाला कुठे गेलीच नाही.

**मा. आयुक्त :-**

आम्ही याची नोंद घेतली निश्चित आपण प्रशिक्षणासाठी पाठवू.

**नयना म्हात्रे :-**

आम्हाला अशा ठिकाणी पाठवा जेणेकरुन आम्ही काही बघितले पण नसेल.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय कदाचित तुमची याच्या मागची विचारधारा चांगली असेल. मात्र हा पायंडा शहरामध्ये पाडू नये. जागा म्हणजे आरक्षण हे विकणेसारखे झाले. आमचा भुखंड पालिकेने आरक्षित केलेला भुखंड आम्ही हा विकत आहोत. ही सुरुवात आता तुम्ही केली तर याला तुम्हाला थांबवता येणार नाही. हा विषय शैक्षणिक भुखंडाबद्दल आहे. उद्या काहीतरी नविन स्थावर मालमत्ता पालिकेला आपल्या योग्य त्या प्रमाणे त्यावर निर्णय घेता येतो. या आधीही होता. त्याच्यात काही बदल शासनाने केले असतील. आयुक्त साहेब हे करु नये. कारण हे शहर रोज वेगाने वाढत चाललेले आहे. आम्हालाही हे आरक्षण पाहिजे. विकसित होणार शहर विकसित होत चाललेले आहे. जागा संपत चाललेली आहे. उद्या पालिकेला सुध्दा ही जागा लागेल. उद्या पालिका सुध्दा तिथे शाळा बांधू शकते. गरज लागली तर त्या गावामध्ये कारण गाव विकसित होत चाललेले आहे. उद्या हे गाव रि-डेव्हलपमेंटला गेले तर त्या परिसरातील लोकसंख्या किती वाढेल. खाजगी संस्थेला साहेब ही जागा द्यायची म्हणजे खाजगी शाळाच येणार. हे मिडलक्लासचे शहर आहे. ऐपत नाही लोकांची १०००,१५००,२००० रुपये फी वर्षाला साहेब. २-२ लाख रुपये इथे फी झाली. म्हणून साहेब अशा प्रकारचा नविन पायंडा ह्या शहरामध्ये मेहरबानी करुन तुम्ही घालू नये. आमची तुम्हाला हात जोडून विनंती आहे.

**सुरेश खंडेलवाल :-**

महापौर मॅडम एक अच्छा विषय आयुक्त महोदय ने स्टडी करके उनके अधिकार क्षेत्र में कलम ७९ में उनको अधिकार प्राप्त है। इसके लिए उन्होंने प्रस्ताव लाया। आयुक्त महोदय मेरी इसमें २-३ जो शंका है शंका यह है की, इस रिझर्व्हेशन के अंदर टोटल एरिया है ४७०० और उसमें से ५०७० चौ.मी अपना १०० टक्के ताबे में आ गया है। अच्छा विषय है और मुझे जहाँ तक मेरी नॉलेज है की जिस क्षेत्र का यह विषय है हटकेश से लेके गोल्डन नेस्ट जो एरिया है उसमें १० से १२ स्कुल रिझर्व्हेशन के प्लॉट है। महापौर मॅडम १० से १२ उससे ज्यादा भी होंगे। स्कुल रिझर्व्हेशन प्लॉट है और यह बिलकुल सही है की महापालिका के पास हमारे पास इतना फंड भी नही है की, हम सारे स्कुल रिझर्व्हेशन डेव्हलप कर सके। विषय अच्छा है मैं ठराव करता हूँ। लेकिन मेरी सुचना भी इसके साथ में ऐसा है की यदी जितने भी स्कुल रिझर्व्हेशन के वहाँ पे प्लॉट है ठिक है हम प्रायोगित तत्व के उपर एक हम फिनिशेटीव्ह ले रहे है। इसके अलावा भी जो प्लॉट है यदी आगे आनेवाले डी.पी. में वहाँ पे जरुरत के हिसाब से यदी रिझर्व्हेशन यदी वहाँ पे गार्डन की जरुरत है और वहाँ पे कुछ चिज की जरुरत है तो वह सत्ता उसके उपर भी थोडासा उसको स्टडी करके विचार करके उसमें भी थोडासा रिझर्व्हेशन को लाईएगा और यह जो विषय है में भी इसका ठराव करता हूँ।

**निला सोंस :-**

महापौर महोदया में अपनी बात इसमें चाहती हूँ बाद में ठराव किजीए। सबसे पहले तो कमिशनरजी आप आज यह विषय लेके आए बहुत अच्छा लग रहा है की शिक्षण के उपर कही ठराव हम पहले भी कर चुके है और एज्युकेशन इज मस्ट जिस प्रकार से पॉप्युलेशन बढ रही है सबसे ज्यादा कन्स्ट्रक्शन ज्यादा न्यु बिल्डींग सबसे ज्यादा डेव्हलपमेंट सबसे ज्यादा खाली प्लॉट होने के कारण डेव्हलपमेंट हो रहा है। तो जैसा की खंडेलवालजीने बताया की गोल्डन नेस्ट हटकेश जहाँ पे हमारा प्रभाग है और जिस आरक्षण की बात कर रहे हो वह हमारे प्रभाग में है तो मुझे लगता है वहाँ जिस प्रकार में आबादी बढ रही है तो बी निड रिझर्व्हेशन ॲट द सेम टाईम. आय वूल्ड लाइक टू से की जैसे हमने शैक्षणिक और आरक्षित जगहो पे ठराव किये थे। एक जो आपने बताया की प्रशासन से विखंडीत किया उसी प्रकार दुसरा एक ठराव था जिसमें यह था की जो आरक्षित भुखंड है उनको तीन गुना ॲज पर द रेडी रेकनर थ्री टाईम मोअर ताकी महापालिका में भी ज्यादा से ज्यादा फंड आए। क्योंकी यह फॅक्ट है की हम न्यू डेव्हलपमेंट महापालिका के फंड में नही कर पा रहे है। सो दॅट द रिझन की पब्लिक सफर नही कर रहे है। हम पब्लिक को उसका फॅसिलिटी मिले तो यह भी प्रस्ताव था तो आय जस्ट वॉन्ट टू नाव की यहाँ जो भुखंड की हम बात कर २६० ॲट द सेम टाईम २२० यह भी स्कुल रिझर्व्हेशन है और वह भी १०० टक्के है तो मैं कहना चाहूँगी की दोनो के उपर यह कार्य आप किजीए। २२० भी १०० टक्के है क्योंकी यह १०० टक्के महापालिका के ताबे में है जो १०० टक्के नही है। वहाँ पर जो भी बिल्डर है या जो दुसरे अतिरिक्त इंस्ट्रक्टेड होगे उनको आप ३ गुनक तक दे सकते है। बट यहाँ १०० टक्का को कॅन बी से लाऊड लाईक धिस आय जस्ट वॉन्ट टू नो कॅन बी डू दॅट हम कर सकते है तो फिर बेस्ट रु ॲट क्या है। तीन गुनावाला ठराव पे जा रहे है की हम बेस्ट रिट कुछ और उसके कम में जा रहे है। वॉट इज द बेस्ट रिट वी आर प्लानिंग।

**मा. आयुक्त :-**

तीन गुना का आप क्या बोले मुझे समज में नही आया।

**निला सोंस :-**

एक ठराव पास हुआ था सर यही इसी सभागृह में की आरक्षित भुखंड को हम खाजगी में देंगे अगर वह उसी फॅसिलिटी को जैसे स्कुल है तो स्कुल, मार्केट है तो मार्केट अदर फॅसिलिटी आर देअर लेकिन हम उसे तीन गुना रेडी रेकनर रेट पे आप के रेकॉर्ड में होगा और में यह भी निवेदन करना चाहूँगी।

**मा. आुयक्त :-**

बाय बँक का जो महासभा में हुआ था। एखादा रिझर्व्हेशन है और उसमें से ४०-५० टक्के अपने पास है और प्रायव्हेट के पास ६० टक्के है तो हम बाय बॉक कर सकते है और वह परपज को उसको डेव्हलप करना पडेगा और अपना जो मावेदा है वह मार्केट रेट से अपने को देना पडेगा। वह ठराव था।

**निला सोंस :-**

राईट.

**मा. आयुक्त :-**

वो कभी भी कर सकते है।

**निला सोंस :-**

वह इसपे इम्पलीमेंट नही हो रहा है।

**मा. आयुक्त :-**

इसका संबंध नही है।

**निला सोंस :-**

ॲन्ड आय प्ले जो विखंडीत हुआ दॅट वॉज ओनली विथ द क्लॉज ऑफ २५ पर्सन्टेज बट जो अटीशर्ती थी वो सेम अटीशर्ती इस पर लागु होगी। मतलब शैक्षणिक संस्था है ऐसी कही सारी अटीशर्ती है।

**मा. आयुक्त :-**

हम अटीशर्ती फ्रेम कर सकते है इसके साथ

**निला सोंस :-**

तो क्या वह सभागृह में बताया जायेगा।

**मा. आयुक्त :-**

तुम कर सकते है तुमको जो लगता होगा।

**निला सोंस :-**

ॲक्चुअली यह विषय आपही लेके आये हो और आपही गोषवारा नही दे रहे है यह बहूत ही मतलब अनलॉजिबल....................

**दिपक खांबित :-**

मैने बोला ऑलरेडी २-५ की मिटींगमें यह सब हूआ है।

**निला सोंस :-**

इसका गोषवारा आया नही।

**दिपक खांबित :-**

ऑलरेडी धोरण निश्चित है की कौनसी संस्था उन्होने पात्रता निकष ऑलरेडी इसके हो गये है।

**निला सोंस :-**

वही जो पहले हूआ ना।

**मा. आयुक्त :-**

इनामदार साहेब ह्याच्यात मुख्य उद्देश होता त्या मॅडम बोलल्याप्रमाणे त्या लोकॅलिटीप्रमाणे हा प्लॉट पडून आहे त्याच्यात अतिक्रमण होऊ नये म्हणून आपण डे टू डे काळजी घेतो आज त्याचा वापर करायला पाहिजे तुमची पॉलिसी मी मान्य करतो की गरीबाला ह्याच्यत सगळेच शाळा आपण एकाच ठिकाणी चालवू शकत नाही. काही प्रयोग म्हणून एक खाजगी आपण बांधून घेऊ शकतो असे नाही की तुम्ही म्हणतो की त्याचा पायंडा पडेल असे नाही आपण ठरवले तर होऊ शकते नाही ठरवायचे असेल तर मग पुढे विचार करू.

**अनिल सावंत :-**

साहेब तुम्ही जे आता बोललात की................

**मा. आयुक्त :-**

मी तुम्हाला २०१८ चा शासन निर्णय देतो.

**अनिल सावंत :-**

हरकत नाही विषय तो नाही साहेब.

**मा. आयुक्त :-**

ऐकून घ्या सगळ्यांनी याचा अभ्यास करा अजून पब्लिक मार्केटमधून व्हियुप घ्या. पुढच्या सभेत आपण एकमताने ह्याच्यवर चर्चा करू.

**जुबेर इनामदार :-**

चालेल.

**अनिल सावंत :-**

हरकत नाही धोरण चांगले आहे. फक्त आपण जे बोललात की अतिक्रमण होऊ नये म्हणून आपण ही काळजी घेत आहोत साहेब ज्यावेळेला आरक्षण आपण ताब्यात घेतो टीडीआर देतो त्यावेळी कुंपन भिंत आणि माती भरावाचे पैसे आपण विकासकाकडून घेतो जर कुंपण भिंत आणि माती भराव झाला तर अतिक्रमण कसे होईल.

**मा. आयुक्त :-**

त्या वॉर्डाच्या त्या नगरसेविका आहेत तसे ३-४ प्लॉट आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

त्या वॉर्डाच्या ज्या नगरसेविका आहेत तसे ३-४ प्लॉट आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**सुरेश खंडेलवाल :-**

त्यामध्ये कमीत कमी १० तं १२  मधुन रिर्झव्हेशन आहेत ते १०-१२ स्कूल रिर्झव्हेशन आपण डेव्हलप करू शकत नाही.

**मा. आयुक्त :-**

मात्र आपण आज जरी नाही केले अजून १० वर्षात केले त्याचे कॅपिटल कॉस्ट तेवढाच वाढणार पुढे ही गोष्ट समजून घेण्याची आहे. जे काम मला ५ कोटीत आज होत आहे १० वर्षानी ते काम १० कोटीला होणार मी शासनाचा जीआर सगळ्यांना देतो तुम्ही त्याचा अभ्यास करा एक मताने हा निर्णय होत असेल तर करा नाही तरे पुढच्या सभेत ठेवा.

**जुबेर इनामदार :-**

चालेल साहेब तुम्ही हा विषय पुढच्या सभेमध्ये घ्या.

**निला सोंस :-**

साहब मेरी सुचना ॲड किजिए।

**सुरेश खंडेलवाल :-**

मॅडम यह अभी नेक्स मिटींग में।

**निला सोंस :-**

२३० आरक्षण को भी ॲड किजिए वह भी टोटली............

**मा. महापौर :-**

वह अगले मिटींग में लेंगे।

(मा. महापौरांच्या आदेशाने सदरचा विषय प्रलंबित ठेवण्यात आला.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३३, **मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडील पत्रानुसार आवश्यक कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबत.**

**मदनउदित नारायण सिंग :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत खालील काम मंजुर करुन सुरु करण्यात आलेले आहे.

1) **घोडबंदर ते जैसलपार्क रस्त्याचे बांधकाम व सुधारणा कामे (साखळी क्र. 0.00 मीटर ते साखळी क्र. 1780.00 मीटर) टप्पा-1**

**सदर रस्त्याच्या कामांसाठी आवश्यक असणाऱ्या जमिनीचे भुसंपादन व जमिन अतिक्रमण मुक्त करुन उपरोक्त रस्ता विकसित करणे आवश्यक आहे . त्यानुसार सदर 60 मीटर रूंदीच्या रस्त्यामधील जागेचे विकास हक्क प्रमाणपत्राव्दारे व खाजगी वाटाघाटीव्दारे भूसंपादन करून संबंधितांना नियमानुसार मोबदला देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे . एम.एम.आर.डी.ए. च्या पत्रानूसार सर्व आवश्यक कार्यवाही करून जागा संपादन करण्यासाठी सर्व मान्य ता देण्याचे अधिकार मा . आयुक्त यांना ही सभा प्रदान करीत आहे.**

**शानु गोहिल :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला विरोध नाही. फक्त एक प्रश्न असा आहे. खाजगी वाटाघाटी काही एजन्सी नेमलेली आहे का.

**मा. उपमहापौर :-**

हे आयुक्तांकडून.............

**मा. आयुक्त :-**

दोन प्रकार असतात. जमिन आहे तुम्ही जर देतच नाही तर कम्पलशन ॲक्युपेशन ॲक्टमध्ये येते आणि जर तुम्हाला बोलून चर्चा करुन घेतो त्याला खाजगी वाटाघाटी.............

**जुबेर इनामदार :-**

आयुक्तांबरोबर कशाला वाटाघाटी.

**मा. आयुक्त :-**

तो शब्दांचा फक्त खेळ आहे.

**मा. उपमहापौर :-**

आपण आयुक्तांकडे सगळी जबाबदारी देत आहोत त्या ठरावात.

**जुबेर इनामदार :-**

आमच्याकडे टी.डी.आर. घोटाळे टी.डी.आर माफीयास.

**मा. आयुक्त :-**

घोटाळा नाही होणार.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १३३ :-**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधि करणाकडील पत्रानुसार आवश्यक कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबत.**

**ठराव क्र. १२८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत खालील काम मंजुर करुन सुरु करण्यात आलेले आहे.

1) **घोडबंदर ते जैसलपार्क रस्त्याचे बांधकाम व सुधारणा का मे (साखळी क्र. 0.00 मीटर ते साखळी क्र. 1780.00 मीटर) टप्पा-1**

**सदर रस्त्याच्या कामांसाठी आवश्यक असणाऱ्या जमिनीचे भुसंपादन व जमिन अतिक्रमण मुक्त करुन उपरोक्त रस्ता विकसित करणे आवश्यक आहे . त्यानुसार सदर 60 मीटर रूंदीच्या रस्त्यामधील जागेचे विकास हक्क प्रमाणपत्रा व्दारे व खाजगी वाटाघाटीव्दारे भूसंपादन करून संबंधितांना नियमानुसार मोबदला देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे . एम.एम.आर.डी.ए. च्या पत्रानूसार सर्व आवश्यक कार्यवाही करून जागा संपादन करण्यासाठी सर्व मान्यता देण्याचे अधिकार मा . आयुक्त यांना ही सभा प्र दान करीत आहे.**

सुचक :- श्री. मदन उदितनारायण सिंह  अनुमोदन :- श्रीम. शानु गोहिल

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३४, **हटकेश जंक्शन येथील नाला छेदून केसिंग पाईप एच.डी.डी. पध्दतीने टाकणे व ११५४ मि.मी., ९२० मि.मी. व ६०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी अंथरणे.**

**संजय थेराडे :-**

मिरा-भाईंदर महानगरपलिका क्षेत्रातील हाटकेश या ठिकाणी चार रस्त्यांचे जंक्शन आहे. सदर ठिकाणी मुख्य जलवाहिन्या फुटपाथला लागून आहेत. त्यामुळे रस्ताची रुंदी कमी होत आहे. सदर रस्ताच्या रुंदीकरणाचे काम बांधकाम विभागामार्फत काम प्रस्तावित आहे. त्यामुळे सदर मुख्य जलवाहिन्या नाला छेदून केसिंग पाईप एच.डी..डी. पद्धतीने टाकणे व ११५४ मि.मी.,९२० मि.मी. व ६०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी अंथरणे काम करणे आवश्यक आहे. सदर मुख्य जलवाहिन्या स्थलांतरीत केल्यामुळे संबंधित ठिकाणी असलेले रस्त्याचे चार रस्त्यांचे जंक्शनच्या रुंदी वाढण्यास मदत होणार आहे.

सदर कामी रक्कम रु.१,५४,१६,५८३/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर काम करणे अत्यावश्यक असल्याने सदर कामास हि सभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे.

**रुपाली शिंदे :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. १३४ :-**

**हटकेश जंक्शन येथील नाला छेदून केसिंग पाईप एच.डी.डी. पध्दतीने टाकणे व ११५४ मि.मी., ९२० मि.मी. व ६०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी अंथरणे.**

**ठराव क्र. १२९ :-**

मिरा-भाईंदर महानगरपलिका क्षेत्रातील हाटकेश या ठिकाणी चार रस्त्यांचे जंक्शन आहे. सदर ठिकाणी मुख्य जलवाहिन्या फुटपाथला लागून आहेत. त्यामुळे रस्ताची रुंदी कमी होत आहे. सदर रस्ताच्या रुंदीकरणाचे काम बांधकाम विभागामार्फत काम प्रस्तावित आहे. त्यामुळे सदर मुख्य जलवाहिन्या नाला छेदून केसिंग पाईप एच.डी..डी. पद्धतीने टाकणे व ११५४ मि.मी.,९२० मि.मी. व ६०० मि.मी. व्यासाची जलवाहिनी अंथरणे काम करणे आवश्यक आहे. सदर मुख्य जलवाहिन्या स्थलांतरीत केल्यामुळे संबंधित ठिकाणी असलेले रस्त्याचे चार रस्त्यांचे जंक्शनच्या रुंदी वाढण्यास मदत होणार आहे.

सदर कामी रक्कम रु.१,५४,१६,५८३/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर काम करणे अत्यावश्यक असल्याने सदर कामास हि सभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. संजय थेराडे          अनुमोदन :- श्रीम. रुपाली शिंदे (मोदी)**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३५, **आरक्षण क्र. २१७ मधील महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले दवाखाना व मॅटरनिटी होम चालु करणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

**वर्षा भानुशाली :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आरक्षण क्र. २१७ मधील जागेत सध्या ओ.पी.डी. सुरु असून सदरचा भाग शहरी व उच्च भ्रु वस्तीचा आहे. तसेच महापालिकेची स्व. इंदीरा गांधी व पं.भीमसेन जोशी रुग्णालयामध्ये मॅटरनिटी होम ची सोय असून नागरीक तिचा लाभ घेत आहेत. तसेच व्होकार्ड रुग्णालयामध्ये ७५ खाटा उपलब्ध होणार आहेत. त्या प्राप्त झाल्यानंतर अजुन वाढीव सोय होणार आहे. भविष्यात आरक्षण क्र.२१७ मध्ये आवश्यकता भासल्यास आयुक्त यांनी सविस्तर माहितीसह प्रस्ताव मा. महासभेत सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

**दिपीका अरोरा :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब माहितीसह सादर करावे. कारण मॅटर्निटी होम आणि प्रसुतीगृहाचा विषय होता विकासकाला तुम्ही ओ.सी. दिली नाही. दिली आम्हाला माहित नाही आणि दिली असेल त्याने ते हस्तांतरण करायचे आधी प्रसुतिगृहाप्रमाणे लागणारे सर्व सुखसुविधा बांधकामाचे ते देणे गरजेचे होते. विकासकाने उद्वाहिका ही त्याने दिली पाहिजे. कारण हॉस्पीटल आहे मॅटर्निटी होम आहे. पालिकेने काय करायचे. साहेब पुढचा गोषवारा जेव्हा तुम्ही द्याल पुढच्या महासभेमध्ये ह्या सर्व त्याच्यामध्ये बाबी टाका. उद्वाहिका वगैरे विकासकाने दिली पाहिजे होती. त्यांनी दिली नाही मग त्याच्यावरती तुम्ही दंडाची कारवाई करणार. मॅटर्निटी होम आणि हॉस्पीटल तयार करणेसाठी जे काही योग्यरित्या बांधकाम पाहिजे होते ते त्यांनी करुन दिलेले नाही.

**मा. आयुक्त :-**

समावेशन आरक्षणामध्ये त्याचे फिजिकल इन्फ्रास्ट्रक्चर फक्त तयार करुन देण्याची तरतुद आहे. त्यातले इंटरनल ॲमिनिटी आणि ................

**जुबेर इनामदार :-**

ॲमिनिटी मी खाटा बोलत नाही साहेब.

**मा. आयुक्त :-**

नाही तुम्ही व्हेईकल म्हणत आहात ना.

**जुबेर इनामदार :-**

नाही मी खाटा बोलतच नाही.

**मा. आयुक्त :-**

तसे काही त्याच्यामध्ये नाही.

**जुबेर इनामदार :-**

मी बांधकाम बोलतो.

**सुरेश खंडेलवाल :-**

आता तुम्ही बांधकाम थोडे बोलले. तुम्ही रुग्णवाहिका सर्व बोलले. काही पण तुम्ही दोन मिनिटात चेंज करतात.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम आमचे उपमहापौर साहेब नेहमी सांगतात. आम्ही शहराच्या हितामध्ये निर्णय घेतो. शहराच्या हिताच्या विरोधात काही घेत नाही. हे आरक्षण समावेशक आरक्षणाची २५ टक्के जागा ताब्यात घ्यायला लोकांना समाजसेवकांना उपोषणे करावी लागली. त्यानंतर ४ वर्ष ही जागा ताब्यात आली नाही. त्यानंतर शासनाने ही जागा ताब्यात घेतली. २५ टक्के जागा ताब्यात घेतल्यानंतर शासनाने प्रस्ताव दिला की त्याठिकाणी मॅटर्निटी होम चालू करायला आर्थिक आणि प्रशासकीय मंजूरी द्या आणि आता सत्ताधारी ठराव करत आहेत की गरज वाटल्यास पुढे प्रस्ताव घेऊ या. म्हणजे ह्यांना त्याठिकाणी ताब्यात आलेल्या जागेमध्ये मॅटर्निटी होम हॉस्पीटल चालू करायचे नाही. हे यावरुन सिध्द होते. हा काय शहराच्या हितामध्ये निर्णय नाही. साहेब त्याचा ठराव बघा. साहेब ह्यांना आर्थिक आणि प्रशासकीय मंजूरी जर यांनी दिली नाही तर तुमच्या अधिकारात राज्यशासनाकडून मंजूरी आणा आणि ताबडतोब ते चालू करा.

**मा. आयुक्त :-**

मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो मला तिथे कुठलेही प्रॉब्लेम आला नाही ती जागा आपण पूर्ण रजिस्ट्री नॉमिनल एक पैशाने आपल्या महापालिकेच्या नावाने करुन घेतले.

**अनिल सावंत :-**

साहेब ताब्यात घेतली. मग तुम्ही मंजूरी का देत नाही.

**मा. उपमहापौर :-**

जागा ताब्यात घेतली त्याठिकाणी असे म्हटलेले आहे.....

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

साहेब त्याला मंजूरी द्या.

**मा. उपमहापौर :-**

तिकडे ओ.पी.डी. पण सुरु केलेली आहे.

**जुबेर इनामदार :-**

साहेब ह्या गोषवाऱ्यामध्ये तुम्हाला तुम्ही काही कमीपणा केलेला आहे का?

**मा. आयुक्त :-**

अजून काही त्याच्यात सुधारणा असतील तर त्याच्यात अजून सुधारणा करुन घेऊ.

**अनिल सावंत :-**

साहेब त्यांनी ठरावामध्ये लिहिलेले आहे. गरज वाटल्यास म्हणजे काय? तुम्ही लोकांच्या भावनांशी खेळता. विकासकाला वाचवण्यासाठी तिथे हॉस्पीटल सुरु होऊ नये हे तुमचे प्रयत्न आहेत का?

**मा. उपमहापौर :-**

सावंत साहेब हॉस्पीटलची इमारत आपल्या ताब्यात आलेली आहे. रिझर्व्हेशन मॅटर्निटी होमचे आहे. त्या कन्सेप्टप्रमाणे आपल्या ठराव लागेलच. तुम्ही तसा ठराव ठेवा.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

ठराव विरोधात केलेला आहे.

**अनिल सावंत :-**

मंजूरी दिलेली नाही.

**जुबेर इनामदार :-**

विरोधात ठराव केलेला आहे. आवश्यकता वाटली तरच पुढच्या महासभेमध्ये घेऊ.

**अनिल सावंत :-**

तीन हॉस्पीटल आहेत. ह्या हॉस्पीटलची गरज नाही असा अर्थ निघतो त्या ठरावाचा.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

रिझर्व्हेशन आपल्या ताब्यात आलेले आहे. त्याचे रजिस्ट्रेशन झालेले आहे. त्या ठिकाणी बोर्ड महापालिकेचे लागलेले आहेत. त्याच्यात आपली ओ.पी.डी. सुरु आहे. हॉस्पीटल पूर्ण ताब्यात आहे.

**अनिल सावंत :-**

विकासकाने तुमच्या ताब्यात दिलेले आहे. मग तिथे तुम्ही का चालू करत नाही.

**मा. उपमहापौर :-**

व्होकार्ड मधला आपण उल्लेख केलेला............

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

त्याच्यामध्ये आपण अजून १०० बेडची व्यवस्था करु शकतो. दोन्ही मॅटर्निटी होममध्ये.

**अनिल सावंत :-**

हा चालू करायचा नाही आहे का? मग कशावरून शहराच्या हितामध्ये निर्णय घेता.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

आयुक्तांनी सविस्तर गोषवारा दिलेला नाही.

**प्रविण पाटील :-**

शहराच्या हिताचे निर्णय घ्या.

**जुबेर इनामदार :-**

हा १९ तारखेला क अंतर्गत विषय आला तेव्हा.............

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

काही अपशब्द बोलू नका. जो विषय आहे त्याच्यावर बोला.

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

आता सेव्हन स्क्वेअर हॉस्पीटलचा विषय निघाला. तुम्ही व्होकार्डचा काढतात. सर्वसामान्य नागरिकांनी करायचे काय?

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

विकासकाने याला मंजूरी द्या.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंग :-**

महापौर मॅडम यह व्होकार्ड हॉस्पीटल और सेव्हन इलेव्हन की बात नही। मिरा भाईंदर में जितने भी हॉस्पीटल है उनका जो बात हुआ सबका एकसाथ विषय लेने की बात है सभी हॉस्पीटल का।

(सभागृहात गोंधळ)

**श्रीप्रकाश जिलेदार सिंग :-**

महापौर मॅडम कमिशनर साहब से एक निवेदन है की यह जो विषय लेके वापस आऐंगे तो इसके साथ में स्कुल का एक विषय लिजिए। मिरा भाईंदर में जितने भी स्कुल है उसके ही साथ में विषय लिजिए। कोई भी आंदोलन करे बाद में विषय ले इससे क्या मतलब निकलता है और जिसने भी आंदोलन किया वह मेरा दोस्त है। अच्छा किया उसने सब मिरा भाईंदर की जनता की आखे खोली उसका स्वागत करना चाहिए

**जुबेर इनामदार :-**

बहुत बढीया बोला मुन्नासिंग जी।

**श्रीप्रकाश जिलेदार सिंग :-**

एक मुद्दा लेके बैठे तो वह स्वागत करने लायक ही है। उसके बाद में व्होकार्ड आ गया। एक दुसरे पे आप क्लेम मत करीए। सेव्हन इलेव्हन का हुआ। इसिलिए व्होकार्ड पे आया। मिरा भाईंदर का जितना भी हॉस्पीटल है जो भी है उसका सबका निर्णय लिया जाए।

**जुबेर इनामदार :-**

बहुत अच्छी बात है।

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश जैन :-**

महापौर मॅडम लोगो को मालुम ही नही था। व्होकार्ड में मिलना चाहिए और आज तक नही मिल रहा है। मैं इस सभागृह में धन्यवाद यह विषय लाके पुरे मिरा भाईंदर के पब्लीक को अवगत कराया।

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश जैन :-**

वहॉं पे फ्री में इलाज होना चाहिए। वहाँ पे नही हो रहा है और मिरारोड वासियों का वह टॅक्स से व्होकार्ड हॉस्पीटल से उनके यहा मोफत में इलाज नही हो रहा है। वहाँ की पब्लीक को पैसा देने के बाद भी पुरा इलाज नही मिल रहा है मॅडम।

**श्रीप्रकाश जिलेदार सिंग :-**

महापौर मॅडम मुझे अपने दोस्त जुबेरजी को बोलना है किसीको बोलते अच्छे दिन कोई ना कोई आंदोलन के अच्छे दिन तो आए ना। अच्छे दिन हम लोगो के वजह से ही आए ना....................

**अनिल सावंत :-**

महापौर मॅडम मुन्नाजीने जे स्वागत केले आणि त्याच्यामुळे शहराला हॉस्पीटल मिळाले. मुन्नाजी हम लोग वही बोल रहे है की, वह हॉस्पीटल चालू करने के लिए आयुक्त साहबने गोषवारा दिया है और आपके ही लोग वह गोषवारा को ...............

**श्रीप्रकाश जिलेदार सिंग :-**

पुरी जानकारी मांग रहे है भाई।

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

गोषवारे में पुरी जानकारी है।

**दिनेश जैन :-**

जब यह विषय आया तो बोले पूरी जानकारी लेके महासभा में लाओ। हम लोग बोल रहे है पुरी जानकारी लेके आओ तो इनको तकलीफ हो रही है।

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

तुमची मनस्थितीच नाही..........

**श्रीप्रकाश जिलेदार सिंग :-**

वहाँ पे ओ.पीडी. चालू किया है। मानसिकता क्या नही है। ओ.पी.डी. चालू है ना।

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

माझी विनंती राहील. एका एकाने जर बोलले तर काहीतरी कामकाज होईल.

**अश्विन कासोदरिया :-**

महापौर मॅडम सदस्यो की सुनिए, लेकिन ५ साल के बाद पहली बार महासभा में इस विषय पे में आज चर्चा करने जा रहा हूँ। इस महासभा के अंदर जो भी सदस्य है मिरा भाईंदर के विकास के लिए इधर आके चर्चा करने के लिए बैठे है। लेकिन में देखता हूँ। आपस में व्यक्तिगत आरोप लगाकर एक दुसरे को निचा दिखाने के कोशिश में यह बहुत में बोलता हूँ की, दुर्भाग्य है इस मिरा भाईंदर के महापालिकाके सदस्य है और रही बात हॉस्पीटल का विषय आया तो दुसरो पे आरोप लगाने से अच्छा की कहाँ कमी है, कहाँ हॉस्पीटल के अंदर जहाँ गलती हुई है। उस विषय पे आगे चलना चाहिए की हा हमारे इधर कमजोरी यह हमारी गलती हुई है। हमें इस गलती को सुधार के वहाँ पे प्रोसेस चालू करे। जैसे मैंने व्हिडीओ भी देखा था व्हिडीओ के अंदर व्होकार्ड हॉस्पीटल पहले उमराव था उमराव का व्होकार्ड को दिया। उसको अधिकार कुछ पता नही है।

**अनिल सावंत :-**

पिछली महासभा में चर्चा हो गई। वह विषय हो गए।

(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

काल आपली चर्चा होऊन त्यामध्ये एक सामुहीक मिटींग घेण्याचे निश्चित झाले. डायरेक्टरचा फोन आला त्याच्यावर आपण निर्णय केला ना.

(सभागृहात गोंधळ)

**अश्विन कासोदरिया :-**

आयुक्त साहब जितने भी मिरा भाईंदर के हॉस्पीटल महानगरपालिका के अंडर में जितने भी है वहाँ पे हर एक सुविधा हर एक मिरा भाईंदर के जनता को मिलना चाहिए। हमेशा विरोध करके आक्रमक भुमिका विषय पे चर्चा करो। किसी पे आरोप न लगे यह तो बहुत आसान बात है। लेकिन यहाँ पे अब हम बैठे है मिरा भाईंदर का विकास करने के लिए और आज हरबार बता दो मोदी चौकीदार चोर है। यह चोर है अपना नारा भितर लगाया। में आपको बता देता हूँ मिरा भाईंदर की जनता ने जो हमने काम किया मिरा भाईंदर शहर का जो विकास का काम किया उसके लिए ६१ सिट दी है। आपको उसने घर पे बिठाया है। यह समज लो इसके बाद आरोप मत करो। आनेवाला समय मिरा भाईंदर के अंदर जो भाजपा ने...............

(सभागृहात गोंधळ)

**अश्विन कासोदरिया :-**

वह आनेवाला समय ही बताएगा। आरोप लगाने से पहले जो विकास के काम हो रहे है क्योंकी आपके पास दुसरा मुद्दा नही है।

(सभागृहात गोंधळ)

**अश्विन कासोदरिया :-**

विकास पे चर्चा करो ना इसके लिए विषय पे ही चर्चा करो। व्यक्तीगत आरोप मत लगाओ।

**दिपीका अरोरा :-**

महापौर मॅडम एक अलग अँगल से में यह विषय को रखना चाहूँगी। सेव्हन इलेव्हन उमराव इस अपार्ट फ्रॉम दॅट हम लोग वापस से चाह रहे है हमारे पास २५ बेड है। ४० बेड दुसरे मॅटर्निटी के है जो की, जब जानकारी निकाली महिला बालकल्याण के तेहत जानकारी निकाली तो ऐसा लगा की, फुल नही होते है हर वक्त हमारे पास फेस होते है और अभी आगे जो लेने का प्रस्ताव आज हमने रखा है व्होकार्ड के लिए भी वह लोग तयार है। इसमें कोऑपरेट करने के लिए आगे बेड हमे उधर से भी मिलने वाले है। सेव्हन इलेव्हन में भी ओ.पी.डी. शुरु कर दी है और आगे भी करेंगे। मेरा विषय यह है की, मॅटर्निटी हम चालू करने जा रहे है इसमें भी खर्च हम इक्वली कर रहे है। पर मॅटर्निटी के साथ में सातवे महिने में, आठवे महिने में जो डिलेव्हरी होती है, उसमें जो कमजोर बच्चे पैदा होते है उनके लिए एन.आय.सी.यू. अभी तक हमारे पास नही है। और वह एन.एफ.सी.यू. नही होने के कारण आज हालही में एक नवजिवन बच्चे का हमे दुःखद के साथ कहना पड रहा है की, इस तरह की घटना हुई एक तो ऐसा था की मैंने भी बहुत प्रायव्हेट वापिस से सर बोलेंगे जुबेरजी की वापीस व्होकार्ड लेके आए एकबार ऐसा हुआ था सर की बहुत मेहनत करने के बाद भी व्होकार्ड ने को ऑपरेट नही किया। इस्टीमेट दिया वह गरिबो को जो की बच्चो की जान बचाने के पिछे भाग रहे थे। नयानगर के फातीमा नर्सिंग होम में उनका डिलीव्हरी हुआ

था। तो यह प्रकरण मैंने खुद तीन घंटे जुस्तजु करके किस तरह से शताब्दी में उनको बेड दिलाया। किस तरह से भागदौड करके ३ घंटे में हमने वह किया बिकॉज ऑफ नॉन कोऑपरेशन भक्ती वेदांत ने फिर भी हमें हमारे अंडर न आते हुए भी उन्होंने एक मात्र वह बच्चे को वहाँ पे रखा। तो में उनको शुक्रीअदा करुंगी। पर यह जो विषय है मॅडम की यह मॅटर्निटी के पिछे दौड रहे है कहीना कही वो जो खर्च है अभी फिलहाल हम लोग एन.आय.सी.यू. की तरफ हम लोग जाए और एन.आय.सी.यू. डेव्हलप करे तो मेरे खयाल से एक बहुत बडा विषय जो मिरा भाईंदर में एक विषय है वह कम्पलीट हो जाएगा।

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर महोदय एन.आय.सी.यू. हे स्पेशलाईज फॅसिलिटी आहे आणि मॅटर्निटीच्या ठिकाणी ते असाईन असते. आपण आता जे टेंभा हॉस्पीटल शासनाला वर्ग झालेले आहे. त्याठिकाणी ही फॅसिलिटी सुरु करणेसाठी शासनाकडे आपण विनंती करु आणि कुपोषित बालकासाठी आपण ऑलरेडी एन.आर ची स्किम आपल्याकडे चालू आहे.

**दिपीका अरोरा :-**

साहेब हे जे आहे जो प्रकरण आपल्याला करायला लागतो. त्यावेळी ते मुलाची जाण वाचवायची आहे.

**मा. आयुक्त :-**

त्यासाठी आपल्याला जे टेंभा हॉस्पीटलमध्ये एन.आय.सी.यू. युनिट करणेसाठी आपण प्रयन्त करु.

**दिपीका अरोरा :-**

ठिक आहे पण मॅटर्निटीचा विषय सोडून ओ.पी.डी. चालूच आहे. तो जो खर्च आहे तो आपण इंदिरा गांधीला पण डायव्र्हट केले तर मला वाटते आपल्याला फायदेमंद होईल.

**जयंतीलाल पाटील :-**

ह्या दोन्ही हॉस्पीटलचे मालक हे ठक आहेत. सेव्हन इलेव्हन कंपनी आणि उमराव ह्या दोन्ही हॉस्पीटलचे मालक ठक आहेत. म्हणून एकमेकाला वाचविण्याचे काम चालू आहे.

**मा. महापौर :-**

दोनो हॉस्पीटल की बात नही है।

**जयंतीलाल पाटील :-**

आज विकासकाचा कुठला मुद्दा नाही. याच्यामध्ये अधिकारी कुठेतरी कमी पडतात. माझे असे क्लिअर मत आहे. अधिकाऱ्यांनी चांगले लक्ष घातले तर हे हॉस्पीटल थोडे व्यवस्थित चांगले चालू शकतात. पण अधिकारी कुठल्या प्रकारचे लक्ष घालत नाही.

**नयना म्हात्रे :-**

महापौर मॅडम त्या दिवशी राई गावातली एक मुलगी टेंभामध्ये आपल्याकडे डिलीव्हरीला गेली. त्याच्यानंतर टेंभावाल्यांनी तिला नायरला पाठविले. परत नायर हॉस्पीटल मधून तिला अडीच वाजता परत भाईंदरला पाठविली. परत टेंभा वाल्याने तिला घेतली नाही. ती प्रायव्हेटमध्ये गेली. तुझ्या बच्चुला हे झाले, तुझ्या बच्चुला ते झाले असे करुन एवढी तिला घाबरवली तिच्या आईचे एकदम हातपाय गळून गेले की आता माझ्या पोरीचे काय होईल. म्हणजे अशा गोष्टी पण घडता कामा नये. कारण ते हॉस्पीटल आपल्या गरिबांसाठी आहे. पैसेवाले लोक तिकडे डिलेव्हरीला जाणारच नाही. याच्यावर दखल घेतली पाहिजे.

**गिता जैन :-**

आयुक्त साहेब सगळ्यात पहिला जेव्हा जेव्हा हॉस्पीटलचा विषय येतो. तेव्हा तेव्हा याबाजूने व्होकार्डवर हल्ला होतो. व्होकार्डने सेव्हन इलेव्हन करायचा आणि कोणी हा विचार करायचा नाही की आपण हे सगळे जे काही करत आहोत हॉस्पीटल किंवा काही करत आहोत ते आपण शहराच्या नागरिकांसाठी करत आहोत. मला वाटते हे आपआपसात भांडण न करुन अश्विनने चालू केले तेव्हा मला असे वाटले होते की कुठेतरी न्युट्रली बोलणार. साहेब मी न्युट्रली सांगते आपली टेंभा मधली का बेड भरत नाही. का इंदिरा गांधीमध्ये भरत नाही. कारण तिथे डॉक्टर पेशंट घेतच नाही. थोडेसे कॉम्पलीकेशन वेगळे साहेब दोन तीन केस तर अशा आहेत रस्त्यात नॉर्मल डिलीव्हरी झाली. जाताना तरी त्यांना इथे घेतले नाही. कॉम्पलीकेटेड आहे म्हणून तर त्यामागचे कारण बघा कारण इथे बरेच माणसे साहेब मिरा भाईंदर शहर मुळात अमिराचे शहरच नाही आहे. लोअर मिडल क्लास आणि मिडल क्लास तुम्ही जर टेंभाला चांगली सुविधा दिली. तुम्ही जर सेव्हन इलेव्हनमध्ये जर चांगली सुविधा दिली, इंदिरा गांधीमध्ये चांगली सुविधा दिली. तर मला वाटते लोअर मिडल क्लास सुध्दा प्रायव्हेटला जाण्यापेक्षा तिथे जास्त जायचे पसंत करणार. साहेब मी महापौर असताना इंदिरा गांधीमध्ये १० प्रायव्हेट डॉक्टरांनी सर्व्हिस देणेची इच्छा व्यक्त केली. त्यांनी तिथे दिली ते दोन आठवडे तिथे गेले. डॉ.एस.एन.अग्रवाल कदाचित सगळ्यात सिनियर

मोस्ट डॉक्टर आपल्याकडे डॉ. अग्रवाल आहेत. त्यांनी मला कम्पलेंट दिली की तिथला स्टाफ आम्हाला कोऑपरेटच करत नाही. बाहेरचे डॉक्टर तिथे येऊ देत नाही आणि त्यांनी एकसारखी मोनोपॉली चालते. त्यांनी जे करायचे तेच खरे. मग ते काय करतात तिथले डॉ. प्रायव्हेटला परत रेफर करतात की, तुम्ही आमच्या प्रायव्हेट क्लिनिकला या आणि आम्ही तिथे तुमची हे करु. परंतु ती जी पध्दत चालू आहे. दॅट इज रॉंग. मी सांगतच नाही की तिथे तुम्हाला बेडची गरज नाही. तुम्ही तिथे हॉस्पीटल करायच. दुसरे काही बोलू द्या साहेब आपल्याला जे आरक्षण आहे तेच करावे लागणार. तुम्ही ते चेंज करु शकत नाही. तिथे मॅटर्निटीच करावे लागणार. कारण ते आरक्षणच मॅटर्निटीचे आहे. तुम्ही तिथे दुसरे काय करणार तिथे दुसरे करुच शकत नाही. आरक्षण चेंज करु शकत नाही. म्हणजे ते बोलणे ही योग्य वाटत नाही की ते आरक्षण चेंज करा आणि निधी कुठेतरी वळवा. मी दिपीकाशी ॲग्री आहे. कारण एन.आय.सी.यू. आपल्याकडे नाही आहे. ते ही एक प्रायव्हेट संस्था रेडी झालेली पण जसे मी सांगितले आपल्याकडे ती मनस्थिती नाही की प्रायव्हेटला तुम्ही द्या साहेब ते निशुल्क सेवा करत होते. त्यांनी ती तयारी दाखविलेली की आम्ही ते १२ युनिट तुम्हाला डोनेट करु. तुम्हाला जर पाहिजे तर तुम्ही त्याची देखभाल करा. आपल्याकडे डॉ. पानपट्टे इथे आहेत की नाही मला माहित नाही. त्यांना नाकारले की आपल्याकडे ते वर्ग करण्याची क्षमता नाही. त्यावर आपली मनस्थिती काय असते की आपण ड वर्ग महापालिका. आपण ते करु शकत नाही. कधी आपण ती मनस्थिती पॉझिटिव्हली ठेवलीच नाही. की आपण हे करु शकतो. दोनतर दोन एन.आय.सी.यू. ची आपण त्या काचेची पेटी इथे आणायची फक्त दोन आणून तरी बघा साहेब. आपण ते ही करत नाही. काल ही सगळी चर्चा होत होती. त्यात मला आढळून आले इथून आक्षेप होतो तिथुन आक्षेप होतो. तुम्ही कमिटी बसविलेली आहे. हे पॉईंट ही लक्षात घ्या. म्हणून सांगत आहे फक्त डायलेसिस होते. असे जे आक्षेप होतात आपला करारनामा मी वाचला त्या करारनाम्यात काय कुठे नाही की, तुम्ही काय करायचे तुम्ही एवढे परसेंटेज करायचे. कमिटी ठेवलेली आहे साहेब मला वाटते एखाद्या कमिटीने ते ही रिकमेंड करा की एखाद्या हद्य विकाराचे एवढे परसेंटेज ठेवा. आपण त्यांना रिक्वेस्ट करु शकतो. करारनाम्यामध्ये नाही पण त्यात तुम्ही ठेवले की ह्दय विकारासाठी एवढे परसेंटेज ठेवा. आपण फक्त डायलेसिस चालले आहे. ते ही कुठे तरी कमी होणार. आता कमिटी आहे त्यांना तुम्ही ते रिकमन्डेड करा. मल्टीस्पेशालिटी कशासाठी असते. फक्त डायलेसिससाठी नसते ते ही करा. सामान्य जनतेला त्यात सगळी सोयीसुविधा मिळाली पाहिजे. जी आपण तिथे देतो. पण आपण हे भांडून भांडून फक्त प्रायव्हेट न जाता एक दुसऱ्यावर आक्षेप न करता साहेब पॉझिटिव्ह आपण तिथे काय करु शकतो. आणि मला वाटते ह्या गोषवाऱ्याच्यापूढे सभेला यायची गरजच नाही. तुम्ही मॅटर्निटीसाठी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मागितलेली आहे. तुम्ही तिथे आरक्षण बदलु शकणार नाही. तिथे मॅटर्निटी करायचीच आहे तर ह्या सभेतच का नाही पास करुन घेतात तुम्ही आर्थिक आणि प्रशासकीय मान्यता.

**धृवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम दिपीका मॅडम आणि गिता जैन यांनी जो मुद्दा मांडला तोच मुद्दा मला मांडायचा होता. आरक्षण क्र. २१७ मधील महापालिकेच्या ताब्यात असलेले दवाखाना, मॅटर्निटी होम चालू करणे करीताच सेव्हन इलेव्हन कंपनीने ती जागा महापालिकेला हस्तांतर केलेली आहे. मॅटर्निटी होम चालू करायचे नाही असा आमचा मानस नाही. मॅटर्निटी चालू केलीच पाहिजे साहेब ह्या शहरामध्ये आपण टेंभा हॉस्पीटलमध्ये मॅटर्निटी होम आहे. आपल्या इंदिरा गांधी रुग्णालयामध्ये सुध्दा मॅटर्निटी होम आहे. तुम्ही तिकडची परिस्थिती जाऊन बघितली तिथे बेड अक्षरशः रिकामे असतात. बघुन घ्या.

**अनिल सावंत :-**

इंदिरा गांधी हॉस्पीटलचे चुकीचे आहे रेकॉर्ड घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

फक्त मॅटर्निटी होम सुरु करायची आणि खर्च करायचा पण जी मॅटर्निटी होम सुरु आहेत. त्याच्यामध्ये आपण आपली फॅसिलिटी वाढवली पाहिजे. जसे दिपीका मॅडम म्हणतात एन.आय.सी.यू. चालू केले पाहिजे. तसेच गिता मॅडमने सांगितले साहेब तिथे अक्षरशः तिकडचे डॉक्टर पेशंट ॲडमिट करुन घेत नाही. ही आमच्या हाताची केस बाहेर आहे. तुम्ही पटकन यांना शताब्दी मध्ये घेऊन जा. साहेब अक्षरशा तिथे बेड रिकामे असतात आणि तिथे डॉक्टर काम करत नाही. साहेब आपण ती व्यवस्था सुधारली पाहिजे. आपण ती व्यवस्था सुधरवत नाही. त्याच्यावरती उपाययोजना करत नाही. शहराचे नामवंत डॉक्टर सांगतात की, याच्यामध्ये आपण आणखीन चांगले करु शकतो. परंतु तिकडचे डॉक्टर आपल्याला कोऑपरेट करत नाही. साहेब याच्यावरती आपण विचारविनिमय केला पाहिजे. दुसरे म्हणतो मॅटर्निटी होम सुरु करा. आणि कोणाचा प्रेशर आला की लगेच त्यांनी गोषवारा द्यायचा. त्याच्या अगोदर प्रशासनाने पण

बधितले पाहिजे की सत्य काय आहे ते. महापालिकेचे टेंभा रुग्णालय सुरु आहे. मिरारोडला रुग्णालय सुरु आहे. तिकडची परिस्थिती बघा ना. तिथे जाऊन आपले डॉक्टर पडवळकरांनी बसले पाहिजे. तिकडच्या पेशंटशी बोलले पाहिजे. तिकडच्या डॉक्टरांना विचारले पाहिजे की तुम्ही पेंशट का रिजेक्ट केले. साहेब नॉर्मल डिलीव्हरीच्या पेशंटला पण ते लोक रिजेक्ट करत आहेत. आणि तिथे पाठवून देतात. साहेब खाली फुकट वादविवाद प्रशासनाच्या तर्फे निर्माण करतात. आणि दुसरे नगरसेवक आपआपसामध्ये भांडतात.
(सभागृहात गोंधळ)

**मा. आयुक्त :-**

मला याच्यावर आक्षेप आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

आम्ही म्हटले की प्रशासनाने पहिला.............

**मा. आयुक्त :-**

प्रशासनाने कोणतेही वाद करत नाही. आपण फार सुज्ञ आहात. प्रशासनापेक्षा आपण जाणकार आहात.

**धृवकिशोर पाटील :-**

मॅडम प्रशासनाने विषय दिलेला आहे. आम्ही ठराव केलेला आहे की प्रशासनाने व्यवस्थित जे मॅटर्निटी होम सुरु आहे त्याचा पूर्ण अभ्यास करावा. ह्या शहराला ती गरज आहे. इमरजन्सी आहे त्याप्रमाणे पुन्हा प्रस्ताव सादर करा. आम्ही थोडे विरोध करत आहोत. खाली फुकट इकडून आरोप तिकडून आरोप साहेब काय म्हटले होते. आम्ही विरोध केलाच नाही महापौर मॅडम आम्ही पॉझिटिव्ह ठराव केलेला आहे.

**प्रविण पाटील :-**

आयुक्त साहेब एवढे बोलून बोलून कुठे आले बघा. विषय काय आहे आणि धृवकिशोर पाटील कुठे गेलेले.

**मा. महापौर :-**

तुम्ही काय विषय आणत आहेत त्याच्यावर बोला.

**प्रविण पाटील :-**

त्याच्यामध्ये हा विषय परिपूर्ण आयुक्तांनी गोषवारा दिलेला आहे. त्याच्यामध्ये काय कमी आहे का ते आयुक्तांनी सांगावे आणि अत्यावश्यक सेवा आहे. शासनाचे निर्देश आहेत. प्रशासनाने त्याच्यावर सगळा अभ्यास करुन निर्णय दिलेला आहे. टेंभा हॉस्पीटल आणि ह्या हॉस्पीटल यांची गरज काय आहे. विषय कुठला आहे. विषयांतर तुम्ही करता.

**धृवकिशोर पाटील :-**

तिथे ते पेशन्ट ॲडमिट आहेत. ते नॉर्मल डिलीव्हरीचे पैसे घेतात. त्यांना रिजेक्ट करतात. ते तुम्हाला चालते.
(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

तिथ बेड खाली असताना पुन्हा आपण एक नविन मॅटर्निटी होम सुरु करतो.
(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

पहिला जे मॅटर्निटी होम सुरु केलेले आहे त्याच्यावरती आपण देखरेख केली पाहिजे. त्याची इम्प्रुव्हमेंट केली पाहिजे. तिथे आपण नविन फॅसिलिटी सुरु केली पाहिजे.

**प्रविण पाटील :-**

तो वेगळा विषय झाला. विषय जरा तुम्ही वाचा. तुम्ही ठराव काय केलेला आहे तो निट वाचा. चालढकल करण्याचा विषय आहे.

**मा. महापौर :-**

तुम्ही तुमचा ठराव वाचा.
(सभागृहात गोंधळ)

**हेतल परमार :-**

मला फक्त माझा नॉलेजसाठी पाहिजे ही गोष्ट झालेली आहे. व्होकार्ड हॉस्पीटलमधील पण मला जनरल पण विचारायचे आहे की मी १० वर्ष झाली ॲज ॲक्टर काम करते आणि ऑल ओव्हर इंडियामध्ये मी ई.सी. कमिटी मेंबर आहे. एक्झीक्युटीव्ह मेंबर जिथे पूर्ण जेवढे पण इंडस्ट्रीज आहेत, जेवढे पण ॲक्टर्स

आहेत त्याच्यातली ११ लोकांची कमिटी मधली मी आहे. आणि मिरा भाईंदरमध्ये आपले अडीच हजार ॲक्टर्स लोक आहेत. त्यातले एक भाऊ आहेत. त्यांचे वडील व्होकार्ड हॉस्पीटलमध्ये अर्धरात्रीला त्यांची डेथ झाली. त्या डेथ झाल्यानंतर तिकडे त्यांना त्याची जी ............

**प्रविण पाटील :-**

महापौर मॅडम विषय कुठला आहे.

**हेतल परमार :-**

ही गोष्ट इथे लागू होते. पहिला तुम्ही ऐकायची मनस्थिती ठेवा.

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

विषयांतर होत आहे. आयुक्तांनी परिपूर्ण गोषवारा दिलेला आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

तुमचा विरोध असेल तर ठराव मांडा.

(सभागृहात गोंधळ)

**हेतल परमार :-**

मला हे सांगायचे होते की, तुमचे कम्प्युटर सिस्टिम अग्रवाल हॉस्पीटलचे कुठल्याची हॉस्पीटलचे खराब असेल तर ती डेथ बॉडी रात्री नऊ वाजता त्यांच्या हातात देतात. ते चुकीचे आहे की बरोबर आहे?

**अनिल सावंत :-**

त्याच्यावर जाऊन केस करा. हा महासभेचा विषय नाही.

**हेतल परमार :-**

मी आयुक्तांबरोबर बोलते.

**अनिल सावंत :-**

त्यांच्या केबिनला जाऊन विचारा.

**मा. उपमहापौर :-**

सर्व सदस्यांना विनंती आहे आपण ह्या विषयावरती बरीच चर्चा झालेली आहे.

**हेतल परमार :-**

सर पण मला एक नॉलेज पाहिजे की कम्प्युटर सिस्टीम अगर खराब असेल तर आपण दोन दिवस बॉडीला ठेऊ शकतो का हॉस्पीटलला. तुमच्या हॉस्पीटलमध्ये सिस्टीम खराब असेल तर तुम्ही बॉडीला दोन दिवस, तीन दिवस तुमचे कम्प्युटर जोपर्यंत ठिक होत नाही तुम्ही बॉडीला तुमच्या ताब्यात ठेवणार का असे काही नियम आहेत का?

**सुरेश खंडेलवाल :-**

दोन तास ठेवू शकत नाही. त्याच्यावर तक्रार करा.

**मा. उपमहापौर :-**

व्होकार्ड हे इंड्यूज्वल आहे काही ठिकाणी आपल्याला..........

**हेतल परमार :-**

मी जनरल विचारत आहे कुठल्याही हॉस्पीटलमध्ये असे सर्क्युलर असणार तर बॉडीला परत नाही देत का? तर मला नॉलेज पाहिजे.

**मा. उपमहापौर :-**

आपल्या महापालिकेच्या सर्व हॉस्पीटलवरती महापालिका क्षेत्रातील सर्व हॉस्पीटलची महापालिकेचा कंट्रोल नाही. परंतु ह्या संदर्भात आपल्या काही अडचणी असल्या तर आयुक्त महोदयांच्या किंवा डॉ. संभाजी पानपट्टे साहेबांशी आपण संपर्क करुन त्या त्या याच्याशी आपण बोलता येऊ शकते. ह्या सभागृहामध्ये विषय आला व्होकार्ड की आमच्यावरती हल्ला झालेला आहे. सेव्हन इलेव्हनचा विषय आला की आमच्यावरती हल्ला झालेला आहे असा गैरसमज करुन घेण्याचे काम नाही. हे दोन्ही रिझर्व्हेशन १८३ आणि रिझर्व्हेशन नं. २१७ एक मॅटर्निटी होम आणि एक हॉस्पीटल ह्या दोन रिझर्व्हेशनवरती डेव्हलपमेंट झालेले आहे. विकासकाने अमुक एक हिस्सा महापालिकेला देणे क्रमप्राप्त असते. तसे ॲग्रीमेंटमध्ये नोंद आहे. आपण आज भांडलो म्हणजे हिस्सा घेता येत नाही. नाही भांडलो म्हणजे हिस्सा घेणार अशातला भाग नाही. व्होकार्डची जी दायीत्व आहे ते मागच्या ठरावाप्रमाणे प्रशासन त्यांच्याशी चर्चा करणार आहे. मागे चर्चा झाली त्या पध्दतीने सेव्हन इलेव्हलनचा एक भाग आपल्याला दिलेला आहे. काय सुरु करावे, काय नाही यासंदर्भातला एक विषय होता. मॅटर्निटी होमचे एक रिझर्व्हेशन आहे त्यातक कुठचेही प्रकारचे

चेंज होणार नाही. एक ठराव असा आलेला आहे की कमिशनरने रितसर म्हणजे जी आवश्यकता आहे त्याची संपुर्ण डिटेल घेऊन तो ठराव आम्हाला आवश्यकतेप्रमाणे आपण त्याची पूर्तता करु. त्याला विरोध करायचे काही काम नाही. आपला जर ठराव असेल तर तो ठराव आपण मांडावा. कारण हा विषय संध्याकाळ पण झाली तरी एका बाजूने व्होकार्ड बचाओ एक बाजूने.......

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

आम्हाला कोणाला वाचवायची गरज नाही.

**मा. उपमहापौर :-**

आपण ठराव मांडावा आणि प्रशासनाने परत हे विषय..........

**अनिल सावंत :-**

आयुक्त साहेबांनी गोषवारा दिलेला आहे आणि त्यावेळी जो सत्तापक्षाकडून जो ठराव झाला त्यामध्ये इंदिरा गांधी हॉस्पीटल आणि टेंभा हॉस्पीटलमध्ये व्यवस्थित व्यवस्था नाही म्हणून ह्या ठिकाणी सुध्दा करु नये. ते हॉस्पीटल अगोदर सुधारावे असा त्यांचा प्रस्ताव आहे. पानपट्टे साहेब इथे आहेत त्यांना विचारतो की इंदिरा गांधी हॉस्पीटलची परिस्थिती काय आहे? किती खाटा खाली राहतात. थोडक्यात माहिती द्या. तिथे डॉक्टर नाहीत साहेब तिथे बसायला ४०० ते ५०० ओ.पी.डी. होतात. डेली पानपट्टे साहेब सांगा. इंदिरा गांधी हॉस्पीटल किती खाटा खाली राहतात?

**मा. उपमहापौर :-**

आपल्याकडे अजून १०० कॉट होतील. एवढी व्यवस्था ते आपल्याला सांगतील.

**गिता जैन :-**

माझे सांगणे फक्त एकच आहे. आज जे रिजन आहे का तिथे चालत नाही म्हणून इथे बनवायचे नाही तर उद्यापासून.........

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, इंदिरा गांधी हॉस्पीटलला आणि टेंभा हॉस्पीटल आपल्याकडे भरपुर बेड आहेत. काही आपत्कालीन परिस्थितीमध्ये जर नसेल पण बेड असतात साहेब तिथे जर प्रॉब्लेम आला तर आम्ही शिफ्ट करतो.

**अनिल सावंत :-**

इंदिरा गांधी हॉस्पीटलला किती बेड आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

बेड आहेत.........

**अनिल सावंत :-**

प्रसुतीसाठी टोटल बेड किती आहेत इंदिरा गांधी हॉस्पीटलला?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

२५ आहेत.

**अनिल सावंत :-**

त्यातले किती बेड खाली असतात?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

बऱ्यापैकी तिथे ऑक्युपन्सी असते.

**अनिल सावंत :-**

आम्हाला तेच पाहिजे.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

तिथे साहेब काही व्यवस्थित सोय नसते. वेळी सुध्दा डॉक्टर एवढे चांगले होते सिजरींगच्या केसेस केलेल्या आहेत. तिथे आणि तो मॅटर्निटी होम व्यवस्थित चालू आहे. उगाच बोंबाबोंब करायची.

**मा. उपमहापौर :-**

महापालिकेच्या डॉक्टरांची निश्चितपणे चांगले काम आहे आणि आपण ही ते स्विकारले त्याबद्दल आभार.

**मर्लिन डिसा :-**

महापौर मॅडम तुमच्या परवानगीने बोलते, हे कधीपासून मॅटर्निटी होम आणि हॉस्पीटलचा विषय चालू आहे. दिपीका मॅडमने एन.आय.सी.यू. चा विषय आणला खूप चांगला आहे. ह्या शहरासाठी गरज

आहे. मला एक विचारायचे आहे. पानपट्टे साहेबांना मेडिकल डिपार्टमेंट जे पण आहे आपल्याकडे शहरात बर्न युनिट आहे का? कुठे काही आग लागली मनुष्याला, स्त्रीला, मुलांना कोणाला आग लागुन भाजले. मुलाला गरम पाण्याने भाजला असे काही असेल तर त्याच्यासाठी इमरजन्सी सर्व्हिसेस आपल्या शहरात आहेत का?

**मा. महापौर :-**

नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो, तसे काही युनिट आपल्याकडे काही टेंभाला आम्ही प्रपोज केले होते.

**जुबेर इनामदार :-**

टेंभा हॉस्पीटलमध्ये तसे करा साहेब आपल्याकडे जागा भरपूर आहे. खरोखर महत्वाचा मुद्दा आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्याच्यामध्ये तो वॉर्ड आहे साहेब.

**दिनेश जैन :-**

धृवकिशोर पाटील साहेब हेच बोलले की पहिले जे आपले हॉस्पीटल आहेत त्याच्यामध्ये जे कमी आहे त्याला करा नंतर आपण नविन करा.

**जुबेर इनामदार :-**

तशा आपण सुचना घेऊ.

**मर्लिन डिसा :-**

साहेब माझ्या घरातील बहिणीची छोटी बेबी ५ वर्षांची आहे. तिच्या अंगावर गरम पाणी पडले. आम्ही भक्तीवेदांत हॉस्पीटलला गेलो. सगळे हॉस्पीटलमध्ये कुठे पण सर्व्हिसेस नाही. रात्री लिलावतीला पोहोचलो. १२.३० ला आम्ही बर्न हॉस्पीटल न्यु बॉम्बेला गेलो. तोपर्यंत एवढीशी त्या चिमुकलीचा जीव ती काही ससटेन करु शकली नाही. ही एवढी गांर्भियाची गोष्ट आहे. तर हे बेसिक नेसेसिटी आहे. त्याच्यावर लक्ष द्या.

**मा. उपमहापौर :-**

न्यु बॉम्बेला आहे, गोरेगावला आहे. आपल्या जवळपास कमी आहेत. न्यु बॉम्बे सर्वात उत्तम एक नंबरचे आहे.

**मर्लिन डिसा :-**

माझी रिक्वेस्ट आहे की तुम्ही जिथे जेवढे देऊ शकता ते देऊन टाका.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**जुबेर इनामदार :-**

माझे मित्र धृवकिशोरजी आताच प्रशासनावर ताशोरे ओढत होते. प्रशासनाला मी सांगु इच्छितो की तुम्ही १७ गुण संपूर्ण आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

तुम्ही तुमचा ठराव मांडा.

**सुरेश खंडेलवाल :-**

आताच थोड्या वेळापूर्वी प्रशासनाने गोषवारा दिला होता. ते शाळेचा मग तुम्ही त्याला का ॲक्सेप्ट केले नाही. कधी तुम्ही स्वतः बोलतात गोषवाऱ्यावर तुम्ही सांगतात की सर ॲग्री व्हा. महापौर मॅडम मला काय चालले आहे हे मला समजत नाही. महापौर मॅडम मला एक बोलायचे आहे की नयना ताई मॅडमने बरोबर बोलले की सर्वांना................

**जुबेर इनामदार :-**

नाहीतर आयुक्तांनी त्यांना सांगावे पुढची स्थायी समिती तुम्हाला आम्ही देऊ. त्यांचे भरपूर प्रयत्न चालले आहेत. त्यांच्या नेत्यांना खुश करायचे.

**सुरेश खंडेलवाल :-**

मी एकदा पण बोललो नाही व्होकार्डबद्दल तुम्ही एवढा मोठा स्टेटमेंट आणि तुम्ही एवढी मोठी भुमिका घेतली..........

**जुबेर इनामदार :-**

मला ठराव मांडायचा आहे. सदस्य उभा राहिलेला आहे.............

**सुरेश खंडेलवाल :-**

तुम्ही आता ठराव मांडा.

**जुबेर इनामदार :-**

मी माझे निवेदन केलेले आहे. मी ठराव मांडणार आहे.

**जुबेर इनामदार :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील मौजे गोडदेव स.क्र./हि.क्र. नवीन २६/४, २७/५, २४/३ जुना ३३४/४, ३३१/५, ३३८/३ या जागेमधील आ.क्र. २१७ (दवाखाना व प्रसुतिगृह) या नियोजित बांधकामास मे. सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांना बांधकाम प्रारंभपत्र देण्यात आले आहे. बांधकाम प्रारंभपत्रातील अटीनुसार नियोजित इमारतीतील २५% बांधकाम क्षेत्र महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करावयाचे आहे. दि. ०७/०७/२०१८ रोजी झालेल्या नोंदणीकृत करारनाम्यानुसार मे. सेव्हन इलेव्हन कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांनी सदर इमारतीतील ४३३.०८ चौ. मी. क्षेत्र महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केले आहे. महानगरपालिकेच्या ताब्यात आलेल्या सदर क्षेत्रामध्ये नागरी आरोग्य केंद्र व प्रसुतिगृह सुरु करावयाचे आहे.

महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झालेल्या बांधकाम क्षेत्रामध्ये तळमजल्यावर नागरी आरोग्य केंद्र तसेच पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर प्रसुतिगृह चालू करणे प्रस्तावित आहे.जागेची उपलब्धता पाहता सदर ठिकाणी पंधरा खाटांचे प्रसुतिगृह सुरु करण्यात येईल.

नागरी आरोग्य केंद्र चालू करण्यासाठी तळमजल्याच्या जागेमध्ये आवश्यक अंतर्गत बदल (ज्यामध्ये रुग्णतपासणी कक्ष, स्टाफ रुम, लसीकरण कक्ष, औषधवाटप कक्ष, प्रयोगशाळा इ. स्थापन करणे अंतर्भूत आहे) करणे आवश्यक आहे. तसेच प्रसुतिगृहासाठी एक प्रसुतिकक्ष व शस्त्रक्रियागृह तयार करणे आवश्यक आहे.

प्रसुतिगृहासाठी उद्वाहनाची आवश्यकता असून त्याची उपलब्धता करुन द्यावी लागणार आहे. याशिवाय गरजेनुसार आवश्यक ते बांधकाम विषयक बदल / कामे सदर ठिकाणी करावी लागणार आहे.

नागरी आरोग्य केंद्र व प्रसुतिगृह चालू करणेकामी उपकरणे, साहित्य, खाटा, शस्त्रक्रियागृहाकरीता लागणारे साहित्य, उपकरणे, इ. उपलब्ध करुन द्यावी लागणार आहेत. सदर कामी अंदाजित **रु. ३०,००,०००** एवढा खर्च अपेक्षित आहे.

नागरी आरोग्य केंद्र व प्रसुतिगृहासाठी आवश्यक फर्निचर, कपाटे, इ. साठी रु.२५,००,०००, उद्वाहन व्यवस्थेसाठी रु.३०,००,००० व विद्युतविषयक कामांसाठी रु.८,९७,६८० असा एकूण **रु.६३,९७,६८०** एवढा खर्च अपेक्षित आहे.

नागरी आरोग्य केंद्र व प्रसुतिगृहासाठी आवश्यक अधिकारी / कर्मचारी यांची खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे पदे मंजूर करण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविणे आवश्यक राहील.

| अ.क्र. | नागरी आरोग्य केंद्रासाठी आवश्यक अधिकारी / कर्मचारी (वेतनश्रेणी) | प्रसुतिगृहासाठी आवश्यक अधिकारी / कर्मचारी (वेतनश्रेणी) |
|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी – ०१ पद (वेतन बँड १५६००-३९१००- ग्रेड वेतन ५४००) | प्रभारी वैद्यकीय अधिकारी – ०१ पद (वेतन बँड १५६००-३९१००-ग्रेड वेतन ६६००) |
| २. | परिचारिका – ०२ पदे (वेतन बँड ९३००-३४८००- ग्रेड वेतन ४२००) | बालरोग तज्ज्ञ – ०१ पद (वेतन बँड १५६००-३९१००-ग्रेड वेतन ५४००) |
| ३. | औषध निर्माण अधिकारी – ०१ पद (वेतन बँड ५२००-२०२००- ग्रेड वेतन २८००) | भूलतज्ज्ञ – ०१ पद (वेतन बँड १५६००-३९१००-ग्रेड वेतन ५४००) |
| ४. | प्रसविका – ०५ पदे (वेतन बँड ५२००-२०२००- ग्रेड वेतन २४००) | वैद्यकीय अधिकारी -०४ पदे (वेतन बँड १५६००-३९१००- ग्रेड वेतन ५४००) |
| ५. | लिपिक – ०१ पद (वेतन बँड ५२००-२०२००- ग्रेड वेतन १९००) | परिसेविका – ०१ पद (वेतन बँड ९३००-३४८००-ग्रेड वेतन ४३००) |
| ६. | शिपाई – ०१ पद (वेतन बँड ४४४०-७४४०- ग्रेड वेतन १३००) | अधिपरिचारिका – १२ पदे (वेतन बँड ९३००-३४८००- ग्रेड वेतन ४२००) |

| | | |
|---|---|---|
| ७. | | औषध निर्माण अधिकारी – ०१ पद (वेतन बँड ५२००-२०२००- ग्रेड वेतन २८००) |
| ८. | -- | लिपिक – ०१ पद (वेतन बँड ५२००-२०२००- ग्रेड वेतन १९००) |
| ९. | -- | शिपाई – ०१ पद (वेतन बँड ४४४०-७४४०- ग्रेड वेतन १३००) |
| **एकूण पदे** | ११ | २३ |

नागरी आरोग्य केंद्राच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या वेतनापोटी अंदाजित रु.४१,८९,२९६ एवढा खर्च व प्रसुतिगृहाच्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या वेतनापोटी रु.१,१२,०३,००८ एवढा वार्षिक खर्च अपेक्षित आहे. तसेच साफसफाईकरीता ०३ पाळयामध्ये अंदाजे एकूण १५ सफाई कर्मचारी / आया यांची आवश्यकता असून याकरीता रु.४५,००,००० वार्षिक खर्च अपेक्षित आहे. तथापि, राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियाना अंतर्गत उपलब्ध मनुष्यबळातून नागरी आरोग्य केंद्र चालू करण्यात येत आहे. सदर मालमत्तेची रंगरंगोटी व इतर कामे अंतिम टप्प्यात आहेत.

अशाप्रकारे आरोग्य केंद्र व प्रसुतिगृह सुरु करण्यासाठी भांडवली कामांसाठी सुरुवातीच्या एकवेळच्या खर्चापोटी एकूण रु. ९३,८७,६८० खर्च अपेक्षित आहे. तर वेतन व साफसफाई कामांसाठी वार्षिक रु. १,९८,९२,३०४ आवर्ती खर्च अपेक्षित आहे.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता तयार करण्यात येणाऱ्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात याकरीता तरतूद उपलब्ध करण्यात येईल.

सदरचा विषय आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे. ते त्या ठिकाणी त्वरीत सुरु करण्यास उपाययोजना करावी. तसेच श्रीम.दिपीका अरोरा यांनी केलेली सुचनांचा समावेश करण्यात यावा असा मी ठराव मांडत आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सचिव महोदय दोन ठराव आलेले आहेत. मतदान करा.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १३५ साठी दोन ठराव आलेले आहेत. पहिला ठराव सुचक श्रीम. वर्षा भानुशाली, अनुमोदन श्रीम. दिपीका अरोरा. दुसरा ठराव सुचक श्री. जुबेर इनामदार, अनुमोदन श्री. हरिश्चंद्र आमगावकर. प्रथम दुसरा ठराव मतदानास पुकारतो. सुचक श्री. जुबेर इनामदार यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत. सुचक श्रीम. वर्षा भानुशाली यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने जे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. ह्या ठरावाच्या विरोधात असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. तटस्थ कोणी असेल त्यांनी हात वर करायचे आहेत.

**मा. महापौर :-**

सुचक श्रीम. वर्षा भानुशाली यांनी मांडलेल्या ठरावाच्या बाजूने ४३, विरोधात १५, तटस्थ ० इतकी मते पडलेली आहेत. सुचक श्रीम. वर्षा भानुशाली यांनी मांडलेला ठराव बहुमतांनी मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. १३५ :-**

**आरक्षण क्र. २१७ मधील महानगरपालिकेच्या ताब्यात आलेले दवाखाना व मॅटरनिटी होम चालु करणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. १३० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आरक्षण क्र. २१७ मधील जागेत सध्या ओ.पी.डी. सुरु असून सदरचा भाग शहरी व उच्च भ्रु वस्तीचा आहे. तसेच महापालिकेची स्व. इंदीरा गांधी व पं.भीमसेन जोशी रुग्णालयामध्ये मॅटरनिटी होम ची सोय असून नागरीक तिचा लाभ घेत आहेत. तसेच व्होकार्ड रुग्णालयामध्ये ७५ खाटा उपलब्ध होणार आहेत. त्या प्राप्त झाल्यानंतर अजुन वाढीव सोय होणार आहे. भविष्यात आरक्षण क्र.२१७ मध्ये

आवश्यकता भासल्यास आयुक्त यांनी सविस्तर माहितीसह प्रस्ताव मा. महासभेत सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्रीम. वर्षा भानुशाली अनुमोदक :- श्रीम. दिपीका अरोरा**

| अ.क्र. | ठरावाच्या बाजूने | अ.क्र. | ठरावाच्या विरोधात | तटस्थ |
|---|---|---|---|---|
| १ | मेहता डिंपल विनोद | १ | भोईर राजु यशवंत | |
| २ | वैती चंद्रकांत सिताराम | २ | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | निरंक |
| ३ | पाटील धृवकिशोर मन्साराम | ३ | पाटील प्रविण मोरेश्वर | |
| ४ | गेहलोत हसमुख मोहनलाल | ४ | शिर्के अनंत गेणू | |
| ५ | सिंह मदन उदितनारायण | ५ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | |
| ६ | भानुशाली वर्षा गिरधर | ६ | सावंत अनिल दिवाकर | |
| ७ | शाह रिटा सुभाष | ७ | इनामदार जुबेर अब्दुल्ला | |
| ८ | गोहिल शानू जोरावर सिंह | ८ | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | |
| ९ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | ९ | कदम अर्चना अरुण | |
| १० | पाटील वंदना मंगेश | १० | डिसा मर्लिन मर्विन | |
| ११ | अरोरा दीपिका पंकज | ११ | सपार उमा विश्वनाथ | |
| १२ | नाईक विविता विवेक | १२ | परदेशी गिता हरीश | |
| १३ | भावसार वंदना संजय | १३ | पाटील संध्या प्रफुल्ल | |
| १४ | बेलानी हेमा राजेश | १४ | बांड्या एलायस दुमिंग | |
| १५ | भोईर विणा सुर्यकांत | १५ | जैन गीता भरत | |
| १६ | सोनार सुरेखा प्रकाश | | | |
| १७ | मुखर्जी अनिता बबलू | | | |
| १८ | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | | | |
| १९ | म्हात्रे सचिन केसरीनाथ | | | |
| २० | म्हात्रे परशुराम पद्माकर | | | |
| २१ | म्हात्रे मोहन गोपाळ | | | |
| २२ | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | | | |
| २३ | तिवारी अशोक सुर्यदेव | | | |
| २४ | अग्रवाल सुशील गोपीकिशन | | | |
| २५ | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | | | |
| २६ | शाह सीमाबेन कमलेश | | | |
| २७ | रकवी वैशाली गजेंद्र | | | |
| २८ | कांगणे मिना यशवंत | | | |
| २९ | परमार हेतल रतिलाल | | | |
| ३० | म्हात्रे नयना गजानन | | | |
| ३१ | भोईर जयेश भानुदास | | | |
| ३२ | थेराडे संजय अनंत | | | |
| ३३ | विराणी अनिल रावजीभाई | | | |
| ३४ | जैन दिनेश तेजराज | | | |
| ३५ | गजरे दौलत तुकाराम | | | |
| ३६ | मांजरेकर आनंद दत्ताराम | | | |
| ३७ | कासोदारिया अश्विन शामजीभाई | | | |
| ३८ | दुबे मनोज रामनारायण | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **३९** | **व्यास रवि वासुदेव** | | | |
| **४०** | **खंडेलवाल सुरेश जगदीश** | | | |
| **४१** | **पांडेय पंकज सूर्यमणि** | | | |
| **४२** | **भोईर गणेश गजानन** | | | |
| **४३** | **पारधी सुजाता यशवंत** | | | |

**ठराव बहुमताने मंजूर**

सही/-
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

२ के खाली विषय आपण सुरुवातीला मान्य केलेला आहे. तो मी पुकारतो. राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर खासदार निधी व महापालिका निधीतून फुटओव्हर ब्रिज बांधणे कामाबाबत.

**प्रविण पाटील :-**

प्रकरण २ के प्रस्ताव ठराव टाईप करणे.

**हरिश्चंद्र आमगांवकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या खासदारांनी सदर फुट ओव्हर ब्रिज रद्द करावे म्हणून पत्र दिलेले आहे. साहेब हा दोन क चा प्रस्ताव तुम्हाला प्रशासनाने दिलेला आहे. आमचे सन्मा. सदस्य आपल्या खासदार साहेबांनी पत्र दिलेले आहे की सदर फुट ओव्हर ब्रिज मेट्रोच्या लाईनमुळे बाधित होत असल्याने सदरचा फुट ओव्हर ब्रिज रद्द करावा असे यांच्या खासदार साहेबांनी पत्र दिलेले आहे आणि तुम्हाला माहित नाही परिपूर्ण माहिती तुम्ही घेत नाही.

**प्रविण पाटील :-**

ते पत्र वाचून दाखवा काहीही बोलू नका. त्याच्यामध्ये अशी माहिती आहे त्या पत्राला वळण केलेले ते दाखवतो. मेट्रो येणार आहे आणि फुट ओव्हर याची दोघांनी पाहणी करुन नंतर घ्यावी. तुम्ही सांगितले रद्द करायचे कुठले पत्र आहे?

**धृवकिशोर पाटील :-**

तुमच्या खासदरांचे पत्र आहे तुम्ही पुन्हा जे पैसे दिले होते ते आर.टी.जी.एस द्वारे पुन्हा वर्ग करावे असे डायरेक्ट आदेश दिलेला आहे.

**प्रविण पाटील :-**

ते पत्र वाचून दाखवा.

**धृवकिशोर पाटील :-**

जिल्हा नियोजन विभागाने मॅडम डायरेक्ट पत्रच दिलेले आहे की जे पैसे आम्ही तुम्हाला दिले होते ते पैसे ताबडतोब खात्यामध्ये वर्ग करावे म्हणून असा पण आदेश आहे.

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

पत्र वाचून दाखवा पत्र कधीचे आहे आणि हे पत्र कधीचे आहे? हा प्रशासनाने दिलेला विषय आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

१९ जानेवारी आहे की नाही.

**प्रविण पाटील :-**

हा प्रशासनाचा आजचा विषय आहे. १९ जानेवारी नंतर हा आजचा विषय आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

साहेब ती तारीख १९ जानेवारी आहे आणि आपल्याकडे जे पत्र आहे ते ४ फेब्रुवारीला पत्र आहे. ४ फेब्रुवारी नंतर येते १९ जानेवारी अगोदर येते. ४ फेब्रुवारी २०१९.

**प्रविण पाटील :-**

हा विषय कोणी दिलेला आहे? हा विषय प्रशासनाने दिलेला आहे ना.

**जुबेर इनामदार :-**

राजकारणाचा भाग होऊ नये. महापौर मॅडम असे काही असते आणि असे काही झालेले असेल तर प्रशासनाकडे त्याचे उत्तर प्राप्त होते. झालेला बदल प्रशासनाने आधी सांगितले पाहिजे होतेकी हे करता येत नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

सदर पत्र जिल्हाधिकारीकडून आम्ही मागवून घेतलेले आहे.

**जुबेर इनामदार :-**

प्रशासनाने सांगितले पाहिजे होते.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

प्रशासनाने खुलासा करावा.

(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

हे पत्र मी वाचून दाखवतो. मा. खासदार श्री. राजेंद्र विचारे, ठाणे लोकसभा मतदार संघ यांनी संदर्भिय पत्र १ स्वयं सो. मध्ये प्रशासकीय मंजूरी दिलेल्या कामापैकी खालील काम रद्द करणेची शिफारस केलेली आहे. त्यांनी काय म्हटलेले आहे की राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर फुट ओव्हर ब्रिजचे काम हे सदर मेट्रोलाईनमध्ये बाधित होत असल्याने खासदार यांचे शिफारशीनुसार खालील कामास दिलेले प्रशासकीय मंजूरी या आदेशाने रद्द करणेत येत आहे. आणि तसेच आदेशित करणेत येत आहे की समोरील निधी वितरण आदेशातील सदर कामावर वितरीत केलेल्या निधीचा पहिला हफ्ता ३७ लक्ष ४५ हजार प्रशासकीय..........

**प्रविण पाटील :-**

मॅडम प्रशासनाने याच्यावर खुलासा करावा.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

प्रशासन खुलासा करत आहे बसुन घ्या.

(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

साहेब प्रशासनाने हा प्रस्ताव दिलेला आहे आणि याला संपूर्ण सभागृहाने मान्यता दिलेली आहे. महापौरांची मान्यता नाही. सभागृहानी मान्यता दिलेली आहे. आम्ही मान्यता दिलेली आहे ना. आम्ही मान्यता दिल्यानंतर हा पुन्हा आपल्यावरती पलटू नये म्हणून आम्ही डायरेक्ट जिल्हा नियोजन कमिटीकडून पत्र आणलेले आहे. याची परिपूर्ण माहिती घेतली. ही माहिती आपण घ्यायला पाहिजे होती साहेब पण ही आपण घेतलीच नाही. ही माहिती आम्ही घेतली साहेब आमचे खासदार आहेत. आमच्या खासदाराने जर एखादे निवेदन दिलेले आहे आणि एखादे काम जर सांगितले आहे आणि ते काम करणेसाठी आपले आद्य कर्तव्य आहे. परंतु ते कामामध्ये आपण ते करण्यामध्ये कामचुकारपणा केलेला आहे.

**प्रविण पाटील :-**

धृवकिशोर साहेब प्रस्ताव कोणी आणलेला आहे. प्रस्ताव आणला कोणी?

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

आमदारांचे पत्र दाखवा उत्तर घेणेसाठी तुम्ही दिलेले पत्र असेल त्याची आम्हाला एक कॉपी दाखवा.

**धृवकिशोर पाटील :-**

आम्ही तिकडून पत्र घेतले.

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

ते पत्र खोटे आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

प्रशासन याच्यावर खुलासा करत आहेत.

**दिपक खांबित :-**

प्रशासनामार्फत हा फुट ओव्हर ब्रिज बांधण्यासाठी प्रस्ताव दिलेला होता. १९-१-२०१९ च्या महासभेपूढे आम्ही हा के खाली विषय दिला होता की याला जो खर्च होणार आहे याला मान्यता मिळावी म्हणून म्हणजे महापालिका तथापी ४-२-२०१९ रोजी पत्र आलेले आहे. जिल्हा नियोजन समितीमार्फत आणि त्याच्यामध्ये असे म्हटलेले आहे की हे काम रद्द केलेले आहे. त्याच्यात असे म्हणणे होते मा. खासदार श्री. राजेंद्र विचारे, ठाणे लोकसभा मतदार संघ यांनी सन २०१५-१६ मध्ये प्रशासकीय मंजूरी दिलेल्या कामांपैकी खालील काम रद्द करणेची शिफारस केलेली आहे आणि त्याअनुषंगाने त्यांनी ते काम रद्द केलेले आहे. आणि आपल्याकडे ३७-४५ लाख रुपये पुन्हा मागितले आहेत. तर ते आपण त्यांना वर्ग करतो. ते आता नविन काम सुचविलेले आहे. ह्या बाबतीमध्ये त्यामुळे हा प्रशासनामार्फत हा विषय मागे घेतो.

**अनिल सावंत :-**

अगोदर मागे का नाही घेतला. ४ तारखेला तुम्हाला पत्र आले हे सभागृहाचा विषय पुकारल्यानंतर निदर्शनास तुम्ही का आणले नाही? सचिवांनी विषय पुकारल्यानंतर ताबडतोब तुम्ही हे निदर्शनाला का आणले नाही.

(सभागृहात गोंधळ)

**दिपक खांबित :-**

आपल्याकडे जसे आधी विषय पुकारण्यात येईल तेव्हा मागे घेण्याची पध्दत आहे असे सुरुवातीला विषय मागे घेण्याची प्रचलित पध्दत नाही. त्यामुळे आम्ही तुम्हालाती माहिती दिली आणि विषय मागे घेतला.

**अनिल सावंत :-**

साहेब विषय मागे घ्यायची पध्दत नाही हे सोडून द्या. सचिवांनी विषय पुकारला. त्याबाबतीत तुमच्या जवळ करस्पॉनडन्स आले ती माहिती तुम्ही सभागृहाला का दिली नाही? सभागृहाला अंधारात का ठेवले?

**धृवकिशोर पाटील :-**

तसे नाही जोपर्यंत पिठासीन अधिकारी आदेश देत नाही तोपर्यंत कोणताही अधिकारी इथे कधी करत नाही. पिठासीन अधिका-यांच्या आदेशानेच......................

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

इनामदार साहेब वास्तवतः सभाशास्त्राप्रमाणे ही पहिली माहिती यायला पाहिजे होती. आपल्याला ते अभिप्रेत होते. त्यानंतर एखादी अशी घटना घडत असेल तर प्रशासनाने सदरची बाब तातडीने निदर्शनास आणली पाहिजे.

**मा. महापौर :-**

अजून एक सर्व्हेक्षणाचा विषय आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

याच्या अगोदर मी एक अभिनंदन ठराव मांडतो.

**जुबेर इनामदार :-**

तहकुब सभेमध्ये अभिनंदन, शोक प्रस्ताव मांडता येणार नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

आम्हाला हा अभिनंदन ठराव ठेवायचा आहे.

**मा. उपमहापौर :-**

ह्या विषयावर सातत्याने आदरणीय नगरसेवक मुन्ना सिंग यांचा एक विषय होता. कमिशनर साहेबांनी त्यांना कमिटमेंट दिली होती की, त्यांचे सर्व स्वच्छ सर्व्हेक्षणमध्ये ज्या इमारतींची सोसायटींची नोंद झालेली होती ज्यांना बक्षिस जाहिर झाली होती त्यांची ही सभा संपल्यानंतर आपण जाहिर करु. म्हणून सांगितलेले आहे. तेव्हा त्यांनी आयुक्त साहेबांनी सांगितल्यानंतर ते घोषणा त्यांना करता येईल.

**नगरसचिव :-**

स्वच्छ सर्व्हेक्षण स्वच्छ महाराष्ट्र अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात १ जानेवारी २०१८ ते २८ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत वॉर्ड स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा निकाल मा. पिठासिन अधिकारी यांच्या मान्यतेने जाहिर करणेत येत आहे. या स्पर्धेचा निकाल पहिले ३ क्रमांक प्राप्त असलेले वॉर्डचे नगरसेवक व स्वच्छता निरिक्षक यांना मा. महापौर यांचे हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यांत येणार आहे. प्रथम क्रमांक वॉर्ड क्र. २ त्यांना मिळालेले गुण १५०० पैकी ११६५. वॉर्ड क्र. २ चे

सदस्य आहेत १. श्री. रोहिदास शंकर पाटील, २. श्रीम. शानु जोरावर सिंह गोहिल. ३. श्रीम. मिना यशवंत कांगणे, ४. श्री. मदन उदित नारायण सिंह. या वॉर्डचे स्वच्छता निरिक्षक आहेत श्री. अभय सोनावणे. ह्या चारही सदस्यांनी कृपया मंचावर यायचे आहे. स्वच्छता निरिक्षक अभय सोनावणे यांनी सुध्दा यायचे आहे. द्वितीय क्रमांक वॉर्ड क्र ५ त्यांना मिळालेले गुण १५०० पैकी १११५, वॉर्ड क्र. ५ चे सदस्य १) श्रीम. पाटील वंदना मंगेश २) श्रीम. मेघना दिपक रावल ३) श्री. शाह राकेश रतिशचंद्र ४) श्री. सिंग श्रीप्रकाश जिलेदार, स्वच्छता निरिक्षक श्री. अभय सोनावणे ह्या चारही सदस्यांनी व स्वच्छता निरिक्षक यांनी मंचावर यायचे आहे. तृतीय क्रमांक आहे वॉर्ड क्र. २१. मिळालेले गुण १५०० पैकी १०१५. सदस्यांची नावे आहेत १. श्री. अनिल रावजीभाई विराणी, २. श्री. मनोज रामनारायण दुबे, ३. श्रीम. सिमाबेन कमलेश शहा, ४. श्रीम. वंदना संजय भावसार. स्वच्छता निरिक्षक आहेत श्री. शाम चौगुले.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

महापौर मॅडम यह इनाम का सर्टिफिकेट तो दिया। इनाम कहाँ घोषित किया, इनाम कहाँ मिला।

**शानु गोहिल :-**

महापौर मॅडम, साहेबजी इनामची रक्कम आहे ती आम्हाला कधी मिळाणार आहे आमच्या वॉर्डला.

**श्रीप्रकाश जिलेदार सिंह :-**

कितना मिलेगा घोषित किया क्या?

**धृवकिशोर पाटील :-**

**मिरा भाईंदर क्षेत्रातील घोडबंदर येथील पुरातन शिवकालीन किल्ल्याचे डागडुजी / सुशोभिकरण करणेबाबत मा.महापौर श्रीम.डिम्पल मेहता व मा.आमदार श्री.नरेंद्रजी मेहता यांनी मा.ना.श्री.विनोदजी तावडे, शिक्षण व सांस्कृतिक मंत्री यांना निवेदन देऊन विनंती केली होती. त्यानुसार मा.मंत्री महोदय यांचे समवेत त्यांचे दालनात दि.22/11/2018 रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली होती . सदर बैठकीमध्ये पुरातत्व विभागाचे अधिकारी देखील उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये किल्ल्यासोबत आजुबाजुची 07.68 हेक्टर जागा देण्याचे त्यावेळी मान्य केले होते.**

**दि.26 जानेवारी 2019 रोजी भाईंदर पुर्व नवघर गाव येथे संपन्न झालेल्या स्वातंत्र सैनिकांच्या स्मारक भूमीपुजन समारंभाच्या वेळी मा . महापौर यांनी आपल्या भाषणामध्ये शिक्षण व सांस्कृतिक मंत्री मा.श्री. विनोदजी तावडे यांना संबोधित करतेवेळी मिरा भाईंदर शहरातील घोडबंदर येथील पुरातन शिवकालीन ऐतिहासिक किल्ला संगोपनार्थ लवकरात लवकर दिला जाईल असे जाहिर केले होते.**

**त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासन , पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्र.मवया/2017/प्र.क्र.85/सां.का.3 दि.12/02/2019 अन्वये घोडबंदर किल्ला राज्य संरक्षित किल्ला म्हणून महाराष्ट्र वैभव-राज्य संरक्षित स्मारक योजने अंतर्गत सदर किल्ला मिरा भाईंदर महापालिकेच्या ताब्यात देवून मा. मंत्री महोदय यांनी दिलेला शब्द पाळला आहे.**

**याबद्दल या सभागृहाच्या वतीने शिक्षण व सांस्कृतिक मंत्री मा.श्री. विनोदजी तावडे व मा. आमदार श्री. नरेंद्र मेहता यांचे ही सभा अभिनंदन करीत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

साहेब हा अभिनंदनचा ठराव मांडला. गेल्या जवळ जवळ ८ वर्षापासून मा. आमदार प्रताप सरनाईक आहेत. त्याचा पाठपुरावा आमदार साहेब करत होते..........

**प्रविण पाटील :-**

अभिनंदन ठरावामध्ये प्रताप सरनाईक साहेबांचे पण नाव घ्यावे. दोन्ही आमदारांचे सहकार्य आहे.

**हरिश्चंद्र आमगावकर :-**

साहेब ठरावामध्ये आमदार प्रताप सरनाईक साहेबांचे पण नाव टाका.

**मा. उपमहापौर :-**

ठिक आहे.

**प्रविण पाटील :-**

पानपट्टे साहेब तुम्हाला एक सुचना आहे. आता जे दोनवर आले तुम्ही स्वच्छ निरिक्षक म्हणून दिले आमची अशी विनंती आहे की मिरा भाईंदरमध्ये सगळे वॉर्ड असे आहेत.

**मा. उपमहापौर :-**

माझा गावात जास्त कष्ट मीच करत आहे याची पण नोंद घ्या.

**प्रविण पाटील :-**

तुमचे पण अभिनंदन.

**शानु गोहिल :-**

पानपट्टे साहेब आपल्याला निवेदन आहे. इनामची रक्कम घोषित करा ना साहेब.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

पहिले बक्षिस ३० लाख, दुसरे २० लाख आणि तिसरे १५ लाख.

**अभिनंदन ठराव क्र. १३१ :-**

**मिरा भाईंदर क्षेत्रातील घोडबंदर येथील पुरातन शिवकालीन किल्ल्याचे डागडुजी / सुशोभिकरण करणेबाबत मा.महापौर श्रीम.डिम्पल मेहता व मा.आमदार श्री.नरेंद्रजी मेहता यांनी मा.ना.श्री.विनोदजी तावडे, शिक्षण व सांस्कृतिक मंत्री यांना निवेदन देऊन विनंती केली होती. त्यानुसार मा.मंत्री महोदय यांचे समवेत त्यांचे दालनात दि.22/11/2018 रोजी बैठक आयोजित करण्यात आलेली होती . सदर बैठकीमध्ये पुरातत्व विभागाचे अधिकारी देखील उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये किल्ल्यासोबत आजुबाजुची 07.68 हेक्टर जागा देण्याचे त्यावेळी मान्य केले होते.**

**दि.26 जानेवारी 2019 रोजी भाईंदर पुर्व नवघर गाव येथे संपन्न झालेल्या स्वातंत्र सैनिकांच्या स्मारक भूमीपुजन समारंभाच्या वेळी मा . महापौर यांनी आपल्या भाषणामध्ये शिक्षण व सांस्कृतिक मंत्री मा.श्री. विनोदजी तावडे यांना संबोधित करतेवेळी मिरा भाईंदर शहराती ल घोडबंदर येथील पुरातन शिवकालीन ऐतिहासिक किल्ला संगोपनार्थ लवकरात लवकर दिला जाईल असे जाहिर केले होते**

**त्याअनुषंगाने महाराष्ट्र शासन , पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग शासन निर्णय क्र.मवया/2017/प्र.क्र.85/सां.का.3 दि.12/02/2019 अन्वये घोडबंदर किल्ला राज्य सं रक्षित किल्ला म्हणून महाराष्ट्र वैभव-राज्य संरक्षित स्मारक योजने अंतर्गत सदर किल्ला मिरा भाईंदर महापालिकेच्या ताब्यात देवून मा. मंत्री महोदय यांनी दिलेला शब्द पाळला आहे.**

**याबद्दल या सभागृहाच्या वतीने शिक्षण व सांस्कृतिक मंत्री मा.श्री. विनोदजी तावडे व मा. आमदार श्री. नरेंद्र मेहता यांचे ही सभा अभिनंदन करीत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदन :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सभा संपली असे मी जाहिर करते.

(सभा संपल्याची झाल्याची वेळ सायं. ५.५० वाजता)

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका